म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६०३

# महाजनांची कविता.

## भाग पहिला.

REFBK-0014070
REFBK-0014070

दे. ल. महाजन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ......३५८६५...... दि: ८।१०५४
क्रमांक ......२५०२३...... नों दि: ९।७।६२

शारदाश्रमाचें दुसरें पुस्तक.

# महाजनांची कविता.

## भाग पहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम .... वि....
क्रमांक .... नों. दि. ....

लेखक

देवीदास लक्ष्मण महाजन.

प्रस्तावनालेखक

प्रो. लक्ष्मण शास्त्री लेले, पुणें.

REFBK-0014070

संपादकः—

यादवसुत.

कृष्णाकुमार.

[कि. कागदी २.] [कि. कापडी २॥]

मुद्रकः—
दामोदर रघुनाथ मित्र,
मनोरंजन छापखाना,
मुंबई नं. ४

[ सर्व अधिकार ग्रंथकर्त्यांचे स्वाधीन ]

प्रकाशकः—
गणेश अनंत सराफ,
श्रीदत्त मुद्रणालय,
नांदेड ( निजाम )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३५८५५ दि: [illegible]
क्रमांक १६०३ नों: दि: [illegible]

# अनुक्रमणिका.


| | नांव. | प्रकाशनस्थल. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| | संपादकीय मनोगत | | ६ |
| | अभिप्राय | | १३ |
| | पुस्तक परिचय | | १७ |
| | कन्यादान | | २१ |
| | —१— | | |
| १ | शारदावंदन | ... | १ |
| २ | कवितादेवी | ग्वाल्हेर संमेलन–अहवाल, विहंगमाला | २ |
| ३ | शांकरि वंदन | ... | ४ |
| ४ | जयति शांकरि | ... | ४ |
| ५ | अंत बघसि कां असा | ... | ९ |
| ६ | लपंडाव | ... | १० |
| ७ | एकांत गीत | हिरकणी | १२ |
| ८ | खरा साक्षी | कीर्तन मासिक | १४ |
| ९ | एकांतवास | ,, | १५ |
| १० | दोषाविष्करण | मंदार–पुष्प–माला | १६ |
| ११ | सौंदर्योपासना | ... | १७ |
| १२ | धिःकार या जीविता | लोकमित्र | १८ |
| १३ | अभंगोपासना | ... | १९ |
| १४ | करुणा | ... | २३ |
| १५ | अनन्य शरणागति | ... | २४ |
| | —२— | | |
| १६ | सृष्टिकाव्य | काव्यकौमुदी | २५ |
| १७ | वर्षर्तूतील उषःकाल | ... | २६ |
| १८ | चेंडुफळी | मंदार–पुष्प–माला | २७ |
| १९ | तेजोभंग | ,, | २९ |

| | नांव. | प्रकाशनस्थल. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २० | कांचनमृग | ... | ३१ |
| २१ | कोपाग्निज्वाला | ... | ३२ |
| २२ | मेघास | राजहंस | ३३ |
| २३ | भांडवलशाही | ,, | ३४ |
| २४ | गगनास | ... | ३६ |

—३—

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | जागृति | कीर्तन मासिक | ३८ |
| २६ | उषा-रवि-विवाह | ... | ४० |
| २७ | पोपटाची परवशता | ... | ४४ |
| २८ | जनसेवा हीच ईश्वरसेवा | मनोरंजन | ४८ |
| २९ | राष्ट्रप्रेम | ... | ५० |
| ३० | केवढें आश्चर्य हें ! | ... | ५५ |
| ३१ | ऐसें जिणें कशाला | ... | ५६ |
| ३२ | नशिबाचा खेळ | ... | ५६ |
| ३३ | आतां कुठें | मंदार-पुष्प-माला | ५७ |
| ३४ | भारत भू माय | ... | ५८ |
| ३५ | विटंबना | ... | ५९ |
| ३६ | नामदेवाचा निर्धार | नामदेवाचें काव्यमय चरित्र | ६० |
| ३७ | ऋतुजागृति | ,, | ६१ |
| ३८ | सीतेचा निरोप | विहंगमाला | ६२ |
| ३९ | गोवर्धनोद्धरण | कीर्तन मासिक | ६४ |
| ४० | सिंहगड | ... | ७० |
| ४१ | कृतज्ञतेचे अश्रु | कीर्तन मासिक | ७३ |
| ४२ | साशंकित शारदा | सांई लीला | ७५ |
| ४३ | गडकरी | ... | ७७ |
| ४४ | आधुनिक काळ व कवि | लोकमित्र | ७८ |
| ४५ | आर्या सती | ... | ७९ |

| नांव | प्रकाशनस्थल | पृष्ठ |
|---|---|---|
| ४६ वाचनालय ... | ... ... ... ... | ८० |
| ४७ श्रीकृष्ण संशोधन ... ... | गोग्रास ... | ८१ |
| ४८ गोमातेची पृच्छा ... ... | ,, ... | ८३ |
| ४९ सहानुभूति ... ... | धर्मजागृति ... | ८४ |
| ५० अंगाई गीत ... ... | अरुणोदय माला ... | ८५ |
| ५१ तिळगूळ ... ... ... | ... ... ... | ८५ |

—४—

| नांव | प्रकाशनस्थल | पृष्ठ |
|---|---|---|
| ५२ मातृहृदय ( पूर्वार्ध ) ... | मातृहृदय ... | ८७ |
| ५३ ,, ( उत्तरार्ध ) ... | ,, ... | ९० |
| ५४ एकांत व मृत्यूचें मागणें ( अन्यदर्शन ) ... | ... ... | ९९ |
| ५५ हृद्गत कथन ... ... | ... ... ... | १०९ |

—५—

| नांव | प्रकाशनस्थल | पृष्ठ |
|---|---|---|
| ५६ महाराष्ट्र गीतांजलि ... ... | काव्यरत्नावलि ... | ११२ |
| ५७ मानसविहार ... ... | ... ... ... | ११७ |

—६—

| नांव | प्रकाशनस्थल | पृष्ठ |
|---|---|---|
| ५८ नरवानर ... ... ... | ... ... ... | १३२ |


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .......... दि: ..........
क्रमांक .......... नों. दि. ..........

# संपादकीय मनोगत.

आपलीं मुलें कर्तीं सवरतीं झालीं ह्मणजे आईबापांना कोणत्याहि प्रकारची काळजी वाटेनाशी होते. लग्न कार्यासारख्या महत्त्वाच्या प्रसंगीं देखील सर्व जबाबदारी ते त्यांच्यावरच सोंपवून देतात. आणि साहजिकच आहे, कोणता भाग्यवान् आपल्या मुलांच्या कर्तबगारींत धन्यता मानणार नाहीं? मुलांच्या सर्व उड्या आईबापांच्याच जीवावर असतात ही गोष्ट खरी असली तरी आपलेपणा हा कांहीं और असतो.

गु. महाजनांची कविता अर्थात् कविकन्यका आतां बरीच उपवर झाली असून वरसंशोधनाची जबाबदारी त्यांच्यावर पडली आहे. कार्यबाहुल्यामुळें हें दगदगीचें काम त्यांना अशक्य असल्यामुळें मी व यादवसुत या उभय शिष्यजनांनीं कर्तव्य जाणून भगिनी प्रेमाखातर तें बिकट कार्य हातीं घेतलें आहे. वस्तुतः या रसमंजरीचा विवाह केव्हांच होऊन जावयाचा परंतु आम्ही स्वकीय जनांपासून–रसिकवर्गापासून मोगलाईंत फार दूर राहात असल्यामुळें अर्थातच तसें होऊं शकलें नाहीं. आपल्या जातीचीं माणसें फार नसलीं ह्मणजे विवाहाला काय काय अडचणीं उत्पन्न होतात हें सर्वांच्या पूर्ण परिचयाचें आहे. शारदाबिलाचा कायदा नसतांहि आपोआप प्रौढविवाह प्रचारांत येऊं लागतात, तशांतलाच हाहि प्रकार आहे.

वधू प्रौढ असल्यामुळें कदाचित् ती हल्लींच्या पद्धतीप्रमाणें कॉलेजांत शिक्षण घेतलेली असेल असें पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. ती सुशिक्षित आहे पण तिचें शिक्षण 'वाचनालयां'त झालें आहे. खेळाची ती चाहती आहे पण हॉकी, टेनीस किंवा क्रिकेट या पाश्चात्य खेळांशीं ती मुळींच परिचित नाहीं. लपंडाव, चेंडुफळी असे खेळ तिला आवडतात. हरिभजनाकडे तिचा ओढा असला तरी 'राष्ट्रप्रेम' तिच्या अंतःकरणांत जागृत आहे. "**राष्ट्रभावना मरून गेली किती शतकांपासुनी। चाटितां काय वर्ण घेउनी॥**" असा ती बिनदिक्कतपणें स्वजनांना प्रश्न घालिते. तिचें राष्ट्रप्रेम आंधळें नाहीं. "पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाळ" या

तत्त्वाला मोहून त्याच त्या पूर्वींच्या भाकडकथा ती वर्णित बसत नाहीं. " **कसें तरी मी हिंदभूमिचें अज्ञ मूढ लेंकरूं। ह्मणुनि का वृथाभिमानें मरूं** " ही तिची भावना असल्यामुळें शेजारच्या देखील प्रगत राष्ट्रांतील नवे नवे अनुभव सांगून ती 'जागृती'चें कार्य साधीत असते. '**भां**डवलशाही'चीं पाळेंमुळें किती खोल रुजलीं गेलीं आहेत याचा तिनें विचार केला आहे. प्रत्यहीं मृत्युमुखीं पडणारी विधवांची संतती पाहून तिचें अंतःकरण तिळ-तिळ तुटते, आणि ह्मणूनच पंढरीच्या वारकऱ्यांना ती विठोबाचा सोहळा कधीं विचारीत नाहीं, परंतु

**आस्तिकानों ! जा पंढरीस आतां**
**पहा प्रत्यंतर राउळास जातां**
**बालहत्त्या-प्रतिबंध व्हावयाला**
**मीहि बघतों करि साह्य कोण त्याला**"—मातृहृदय पृ. ९८

असा रोखठोकपणें प्रश्न विचारल्याखेरीज तिला राहवत नाहीं.

विचाराच्या दृष्टीनें ती जितकी गंभीर आहे तितकीच स्वरूपानेंहि सुंदर आहे. रेखीव बांधा, नीटनेटकी राहणी, थोडेसेच पण ठळक अलंकार यामुळें ती फार खुलून दिसते.

अलंकारिक भाषेचा आडपडदा थोडासा दूर सारून असें ह्मणतां येईल कीं, गु. महाजनांच्या कवितेचे विषय अर्वाचीन असले तरी रचना पंडिती थाटाची आहे. यमक हा त्यांच्या लीलेचा प्रांत आहे. त्यासाठीं शब्दांची व्यर्थ धडपड नाहीं, कष्टपणा नाहीं कीं कांहीं नाहीं. सहज, मधुर व यमक प्रचुर प्रौढ रचना हे तीन्ही गुण एकसमयावच्छेदेंकरून त्यांच्या कवितेंत पहावयास सांपडतात. उ.

**" अभय दे वर दे वरदायिनी**
**हृदय-मंदिर-मंचक-शायिनी**
**नत सदा तव दास पदा नमी**
**नच कदा वरतों वरदान मी**"—जयति शांकरि. पृ. ९

किंवा

**विद्याप्रेम जयातें तद्‌धिक जरि 'घे' ह्मणे 'स्वपद' कमला**
**पद्‌कमलास वदे दे, " सरस्वति ! तुझें कृपाख्य पदक मला"**
—गडकरी पृ. ७७

या सारखे कितीतरी उतारे देतां येतील. अर्थात् सर्वच ठिकाणीं भाषेचा हा थाट नाहीं, तथापि त्यांच्या सहज रचनेंतहि भाषाप्रभुत्वाची साक्ष पटल्याखेरीज राहत नाहीं.

रचना प्रौढ असो कीं सोपी असो त्यामुळें काव्यप्रवाह कधींच अडखळत नाहीं. संथपणा हा त्याचा स्वभाव आहे. मनांतल्या भावना मग त्या आत्मवृत्तीपर असोत कीं परवृत्तीपर असोत, आरशांतल्याप्रमाणें शब्दांत प्रतिबिंबित करण्याची कला म्हणजेच काव्य. महाजनांना ही कला पूर्णपणें साधली आहे. उ. 'लपंडाव' या कवितेंत विश्वभवानीचा ध्यास लागलेल्या कविमनाची दर्शनेच्छा सफल न झाल्यामुळें तो कसा हळहळत आहे हें चित्र मोठ्या समरसतेनें वाचणाऱ्याच्याहि अंगावर शहारे आणील इतकें कवीनें भावनामय रेखाटलें आहें.

**"भडकली पहा तव विरहाग्नीची ज्वाला**
**रोधूनि तरी ठेव ही अश्रुंची माला**
**ती ज्वाला शमते किंवा माला जळते**
**तव सकरुण दृष्टिहि वळते, तेंही कळतें**
**खेळसी लपंडावातें—कुठवरी**
**ही दशा पाहसी माते—कुठवरी**
**नैराश्य असें नशिवातें—कुठवरी**
**तनुमनें जाहल्या दास तुझा विकलांग**
**तें काय फेडिसी सांग जिवाचा पांग."**—लपंडाव. पृ. १२

किंवा याच मनःस्थितींत लिहिलेली "अंत बघसि कां असा" (पृ. ९) ही कविता वाचून पाहण्यासारखी आहे. "हा! सीते! हा! लक्ष्मणा!" हा श्रीरामचंद्रासारखा कांचनमृगानें काढलेला आर्तध्वनि ऐकून सीतेच्या पोटांत धस्स झालें, व तिनें लक्ष्मणाला त्याच्या साह्यासाठीं धांवून जाण्यास आज्ञा केली. परंतु लक्ष्मणाला हें खरें वाटेना. कारण, विश्वप्रतापी भगवान् श्रीरामचंद्रावर कोणी चाल करून येईल ही कल्पनाच अशक्य होती. ह्मणून तो तिकडे जाण्यास कासकूस करूं लागला. या त्याच्या वर्तनानें सीतेच्या मनांत भलताच विकल्प येऊन

**"त्वां इच्छिला स्वयें वध बंधु-स्त्री-काय-हेतु-लाभ-रतें**
**कीं प्रेरिलें वनीं वद, कथुनीया काय हें तुला भरतें"**–सीताहरण.

असा ती घाणेरडा आरोप करते. लक्ष्मण आपल्या शुद्ध हृदयाची साक्ष पटविण्याची पराकाष्ठा करतो, परंतु तें तिला पटत नाहीं. शेवटीं अनन्य शरणागत होऊन तो तिला ह्मणतो—

" तूं जें करशिल ती दया दया
कासया बघूं मी नयाऽनया ॥ धृ० ॥

*           *           *

पान्हा सोडो कीं नच सोडो
अथवा शिंगांनीं हुंदाडो
किंवा धेनू पदिं लाथाडो
वत्स वांछितें पया पया । तूं जें० ॥
पुत्रापरि मज अंकीं बसवीं
पापी ह्मणुनी पायीं तुडवीं
रुचेल जें तव मानस घडवीं
लक्ष्मण—सुत धरि न या भया । तूं जें० ॥

ही त्याची अंतरींची सात्त्विक तळमळ पाहून कसलाहि पाषाणहृदयी माणूस विरघळल्याशिवाय राहणार नाहीं.

कल्पनेच्या बाबतींत कवि धाडशी नसला तरी त्याची समर्पकता व प्रयोजकता हे दोन गुणच इतके विशेष आहेत कीं, त्यामुळें कित्येक वेळां जुन्या कल्पनाहि भट्टींतून काढलेल्या सोन्याप्रमाणें चमकदार व मनोहर दिसूं लागतात. 'सविकल्प' समाधींत कवितादेवीचें दिव्यदर्शन झाल्यानंतर ती कशी दिसली हें प्रतिभासंपन्न शब्दांनीं उत्प्रेक्षेवर उत्प्रेक्षा करीत कवीनें मोठ्या बहारदार रीतीनें वर्णन केलें आहे.

" कविहृदयाच्या क्षीराब्धींतुनि उद्भवली इंदिरा
पातली रसिकाच्या मंदिरा
कीं स्वर्गींची रंभा किंवा तिलोत्तमा अप्सरा
घरेवर आली बिंबाधरा
वरावयासी उमा चिकित्सक रसिक हलाहलधरा
जन्मली विचार-शैलोदरां

पाहुनी कर्कशा तमोमयी यामिनी
चैतन्यमयी कीं मेघाची दामिनी
चमचमा चमकली चंचल सौदामिनी
निज प्रभेनें झाली, झाली बुधचेतोहर्षिणी
नवरसजल-धारा-वर्षिणी

*　　　*　　　*

षड्विकार जे का राक्षस त्यांलागुन
लय पावतांहि दे जी नवरसजीवन
कच-भक्तिरसाचें करित्ये संरक्षण
उशना कविची तीच काय ही सुखमय संजीवनी
देवयानि कीं चिरंजीविनी " —कवितादेवी. पृ. ३

" मेघा का न ह्मणूं तुज राम " या अशोकवनांत असतांना दिङ्मूढ झालेल्या सीतेनें केलेल्या प्रश्नांतील कल्पना जितकी हृदयस्पर्शी तितकीच मनोरम आहे. मेघाचें व श्रीरामचंद्राचें साम्य कवीनें मोठ्या कुशलतेनें दाखविलें आहे. विशेषतः

" सुवर्ण मृग जो नक्षत्रांत
गुंतुनि तच्छर-संधानांत
तुझाहि झाला दिसतो घात
शून्य प्रांत हृदयाचा "—मेघास. पृ. ३४

या साम्यानें तर वर्णनाचा कळस करून सोडला आहे. 'सृष्टि-काव्य' 'चेंडुफळी' 'मातृहृदय' किंवा 'जयति शांकरि' या कविता कल्पनेच्या दृष्टीनें मुद्दाम वाचून पाहण्यासारख्या आहेत.

कवितेंतले विषय साधे पण मोठ्या कुशलतेनें गुंफलेले असतात. त्यांत तत्त्व-शोधनाची जिज्ञासा नाहीं किंवा जगांतल्या मोठमोठ्या प्रमेयांचें विशदीकरणहि नाहीं. रसिक-मनोरंजनाची इच्छा असली तरी परमार्थसाधन, व राष्ट्रीय-सामाजिक चळवळीचें उद्बोधन हा तिचा विषय आहे. 'Art for art's sake' हें पाश्चात्यांचें तत्त्वज्ञान तिला आवडत नाहीं. " **जेणें परमार्थ वाढे । अंगीं अनुताप चढे । भक्तिसाधन आवडे । या नांव ग्रंथ ॥** " हें समर्थांचें लिहिणेंच तिला रुचतें आणि पटतें देखील. " **पहिलें तें हरिकीर्तन ! दुसरें तें राजकारण** " ( दासबोध ) हा तिचा दंडक

आहे. प्रस्तुत पुस्तकांत मुख्यतः या दोन प्रकारच्याच कविता आहेत. सृष्टि-वर्णनात्मक किंवा शृंगारप्रधान कविता महाजनांनीं लिहिल्याच नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. सृष्टिवर्णनाकडे एखादेवेळीं त्यांची लेखणी वळते; नाहीं असें नाहीं. परंतु त्यांतहि तिला ध्यानीं मनीं भरून राहिलेलीं अंतःकरणांतलीं किंवा समाजांतलींच दृश्यें दिसूं लागतात. तेजोभंग, भांडवलशाही किंवा मातृहृदय या दीर्घ काव्यांतील कथानकांच्या पार्श्वभागीं घातलेलीं सृष्टिवर्णनें वाचून पहा. शृंगाराबद्दल तर

**“ स्त्री–मुखाकडे जी दृष्टि एकदां वळली**
**ती पुन्हांहि वळली ह्मणजे पुरती चळली”**

अशी त्यांची ठाम समजूत असल्यामुळें त्या विषयाची त्यांची एखादीहि कविता नसावी यांत आश्चर्य नाहीं.

भाषांतराच्या बावतींत कवि पूर्ण मुरलेला आहे. दुसऱ्याचे विचार आपलेसे करून तितक्याच सरस रीतीनें मांडणें किती कठीण असतें हें ज्यांना भाषांतराचा अनुभव आहे त्यांना सांगण्याची आवश्यकता नाहीं. प्रस्तुत काव्य-संग्राहांतील ‘ जनसेवा हीच ईश्वरसेवा ’ ही कविता व कवि विनायकाची ‘राजा भोज’ ही कविता ली हंटच्या एकाच ‘Abu ben Adam’ या इंग्रजी कवितेचीं भाषांतरें असलीं तरी त्या दोघींत महदंतर आहे. तुलनेच्या दृष्टीनेंच पाहिल्यास ‘जनसेवा हीच ईश्वरसेवा’ ही कविताच सरस ठरेल.

‘महाराष्ट्र–गीतांजली’ व मानसविहार हे दोन्ही ग्रंथ छापत आहेत व ते लवकरच स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध होतील. तथापि रसिकांच्या सोईसाठीं मुद्दाम या संग्रहांत त्यांतील कांहीं वेंचे दिले आहेत. महाराष्ट्र–गीतांजली वंगकविसम्राट् श्री. रवींद्रनाथ ठाकूर यांच्या गीतांजलीचें रूपांतर असून मानसविहार हा ग्रंथ श्री. गोस्वामी तुलसीदासजींच्या रामायणाचें भाषांतर आहे. आजपर्यंत अनेक इंग्रजी ग्रंथांचीं मराठींत अनेक भाषांतरें झालीं असतील, परंतु श्री. जामदारांखेरीज कुणालाहि या अद्वितीय हिंदी काव्यग्रंथाची आठवण होऊं नये ही मराठीच्या रसिकांना खरोखर उणें आणणारी गोष्ट होती. प्रस्तुत भाषांतर मूळाला धरून व सहज भाषेंत लिहिलें असल्यामुळें हिंदी वाङ्मयाच्या चाहत्या मराठी रसिकवर्गाची फार मोठी सोय झाली आहे. असो.

आधुनिक वाङ्मयांत गु. महाजनांच्या कवितेचा ठळक विशेष पहावयाचा झाल्यास रसिकांनीं आख्यानरत्न–मालेंतून प्रसिद्ध होत असलेलें त्यांचें आख्यान-वाङ्मय अवश्य वाचून पहावें. श्रीसंत दासगणूनंतर त्यांच्या तोलाचीं आख्यानें कोणींच लिहिलीं नाहींत. विषयाची निवड, आख्यानाची रचना व प्रसंगांची मांडणी या सर्वच दृष्टींनीं तीं अत्यंत यशस्वी आहेत. दोन तीन वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालेलें त्यांचें "नामदेव–चरित्र" रसिकांच्या स्मरणांत असेलच. आख्यानांना खंडकाव्याप्रमाणेंच वाङ्मयांत स्वतंत्र स्थान आहे व तेंहि एक काव्यकलेचें अंग आहे इकडे बहुतेकांचें दुर्लक्ष्यच दिसतें. हरिदास, कीर्तन आणि आख्यान ही शब्द–त्रिपुटीच लोकांच्या नजरेंतून पूर्ण उतरली असून त्याविषयीं त्यांना किंमत वाटेनाशी झाली आहे. कारण कांहीं असलें तरी या स्वराज्योन्मुख नव्या युगांत ही उदासीनता केव्हांहि अनिष्ट आहे. प्रस्तुत पुस्तकाशीं या गोष्टींचा तितका जवळचा संबंध पोंचत नसल्यानें एवढाच इषारा येथें पुरा आहे. एकंदर आख्यान वाङ्मयाचा स्वतंत्र व सविस्तर इतिहास आह्मांस लिहावयाचा आहे त्यावेळीं अर्थात्‌च या गोष्टींचा विचार करूं.

मनुष्यस्वभावच असा आहे कीं, स्वतःचा किंवा स्वतःच्या नात्यागोत्यांतल्या माणसासंबंधींचा विषय निघाला म्हणजे बोलावें तितकें थोडेंच वाटतें. तथापि प्रस्तुत विवाहप्रसंगीं सुदैवानें उभय पक्षांकडील सन्मान्य पंडित व मराठी भाषेचे अभिजात टीकाकार विद्वद्वर्य श्री. प्रो. लेलेशास्त्री उपाध्याय लाभले असल्यामुळें त्यांच्यापुढें आम्हांला अधिक कांहीं बोलण्याची आवश्यकताच वाटत नाहीं. आमच्या विनंतीला मान देऊन त्यांनीं प्रकृतिच्या अस्वास्थ्यांतहि 'पुस्तक–परिचय' लिहून दिल्याबद्दल रा. महाजनांबरोबर आम्हीहि त्यांचे अत्यंत आभारी आहों.

तसेंच पुस्तकप्रकाशनाच्या बाबतींत आमचे प्रकाशक. श्री. गणेश अनंत सराफ व मनोरंजन प्रेसचे चालक श्री. दा. र. मित्र यांनीं लवकर व सुंदर काम करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचेहि आभारी आहों. विशेषतः माझे सन्मान्य स्नेही यादवसुत (श्री. राजेश्वर यादव मुळावेकर,) यांनीं माझ्याशीं सहकार्य करून जबाबदारीनें हें काम पार पाडलें याविषयीं मी त्यांचा फार कृतज्ञ आहें.

नांदेड,
वर्षप्रतिपदा १८५३.

आपला नम्र,
कृष्णाकुमार.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३५६६७... दि: ...२३१८२४...
क्रमांक ...२८०३... नों: दि. ...२१२८...

# दोनच अभिप्राय पहा !

## संतकवि दासगणू.

'**महाजनांची कविता**' हा ग्रंथ मी समग्र वाचून पाहिला. कविता चांगली–उत्तम साधली आहे. यांत कांहीं कविता तर हृदय हालवून सोडणाऱ्या आहेत. शिवाय कविता **म**हाजनांची आहे तेव्हां तिचें बाह्यांग व अंतरंग हीं दोन्हीं **म**हाजन या नांवाला शोभण्यासारखीं झालीं आहेत.

श्रीतुकाराम बीज १८५२. दासगणू.

## कविवर्य चंद्रशेखर.

**गोदातीरीं नांदेड** येथें राहणारे कविवर्य रा. रा. **देवीदास लक्ष्मण महाजन**, हे मराठी वाङ्मयाच्या वाचकांस चांगले परिचयाचे आहेत. यांनीं कीर्तनांतील आख्यानें, हा श्राव्य काव्याचा जो एक भाग, त्यामध्यें अनेक सुरस आख्यानांनीं बरीच भर घातली आहे. आणि आधुनिक कीर्तनकार कथांतून यांचीं श्रवणरमणीय आख्यानें गात असतात असेंहि ऐकतों. अर्थात् भाविक जनसमाजासहि हे कवि सुश्रुत आहेत.

प्रस्तुत कविवर्य '**महाजनांची कविता**' ह्या नांवानें आपला काव्य–संग्रह आज स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध करीत आहेत. त्यांनीं ह्या ग्रंथाची प्रस्तावना लिहिण्याविषयीं मला विचारिलें होतें. पण हें काम कसलेल्या विद्वानाचें असतें. सबब, तें त्या वर्गांतील एखाद्या महाशयांस सोंपवावें, असें मीं सांगितलें. त्यावरून तें त्यांनीं प्रोफेसर लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांस करून देण्याविषयीं विनंति केली, व ती त्यांनीं मान्यहि केली आहे, अर्थात् रा. **महाजनासारख्या कविश्रेष्ठांस प्रो. लेले यांजसारखे काव्य विषयांतील अधिकारसंपन्न प्रस्तावना-लेखक लाभले, हा योग सोनें व सुगंध या सारखाच समजावयाचा !** प्रोफेसर महाशय, हे रा. **म**हाजन यांच्या काव्यांतील गुणवैशिष्ट्य हंसक्षीरन्यायानें विशद करून

सांगतीलच. तेव्हां, आतां तेथें माझ्या अभिप्रायाचें वस्तुतः प्रयोजन नाहीं! पण, मीं प्रस्तावना लिहिण्याचें नाकबूल केलें. आणि अभिप्रायहि दिला नाहीं, तर कविवर्य मजवर रागावतील. माझ्यावर त्यांचा जिव्हाळ्याचा प्रेमभाव आहे. त्यांत ह्या मौनानें विरजण पडेल, व तसें करणें मला इष्ट नाहीं. हें जाणून मी हा प्रांजल अभिप्राय देण्याचा हिय्या करितों. पुनः हा अभिप्राय आटोपशीर व थोडक्यांत देण्याविषयीं रा. महाजन यांची सूचना आहे. तीहि ध्यानांत घेऊन लिहिणें क्रमप्राप्त आहे.

ह्या पुस्तकाचा मोहोरेदार कागद, गोड नवा टाईप, आणि अथपासून इतिपावेतों संशुद्ध छपाई, वगैरे बाह्यांग सर्वथा सुंदर व मोहक आहे. ही गोष्ट त्याचे संपादक कविद्वय श्रीयुत **यादवसुत** व **कृष्णाकुमार** ह्या उभयतांस तर श्रेयस्कर आहेच, पण त्याजबरोबर ती मुद्रण कलेंत नांवाजत असलेल्या, व महाराष्ट्र–प्रसिद्ध अशा '**मनोरंजन**'छापखान्यासहि अभिनंदनीय आहे, हें येथें नमूद करण्यास मला संतोष वाटतो.

अंतरंगांत प्रवेश करितांच '**'शारदावंदन,' 'कवितादेवी,' 'शांकरीस्तव,' ह्या संगीतकानें मन उल्हसित होतें.** आणि इतस्ततः संचार करितां, विषयांची विविधता, लहान लहान चटकदार चुटके, तऱ्हेदार वृत्तें व चाली, **भाषेवरील हुकुमत, सहज सुंदर यमकें, हा साहित्याचा थाटमाट आश्चर्यचकित करून सोडितो.** विशेषतः **'मानसविहार'** हा तुळसीदासकृत रामायणाच्या विहारिणी टीकेंतील कांहीं प्रसंगाचा अनुवाद ह्मणून जो वेंचा रा. महाजन यांनीं गोविला आहे, त्यांत **मूळांतील तुलसीदासांच्या दोह्यांतील सहज रम्यता प्रतीत करून कविवर्यांनीं आपलें रचनाकौशल्य व्यक्त केलें आहे! दोह्यांची साथ ओव्यांनीं किती बहारीची होऊं शकते, ह्याचें प्रस्तुत वेंचा हें प्रत्यक्ष प्रमाण आहे. ह्याप्रमाणें ह्या संग्रहांतील सर्व चुटके वाचनीय आहेत.** आतां कित्येक बाबतींसंबंधानें भिन्न रुचीच्या लोकांचे मतभेद होऊं शकतील, ही गोष्ट निराळी आहे. पण, **एकंदरीनें हा काव्यसंग्रह मराठी भाषेंत नमुनेदार ह्मणून संग्राह्य आहे;** व तो वाङ्मयांत चिरस्थायि केल्याबद्दल कविवर्य महाजन आणि या ग्रंथाचे संपादक प्रशंसेस पात्र आहेत.

आतां वर सांगितलेल्या गुणांस दृष्ट होऊं नये ह्मणून थोडेंसें गालबोट लावणें अप्रासंगिक होणार नाहीं. व तें लावल्याबद्दल रा. महाजन यांस विषाद न वाटतां उलट कौतुकच वाटेल अशी आशा आहे. पा. ६ श्लो. १० '**नभिं सुरम्य शशी बहु भाजतो**' ही कल्पना गौण आहे ! पान ३१–३२ 'कांचनमृग' हा वेंचा अपूर्ण वाटतो. पान ३३ "मेघास" ह्या चुटक्यांत 'करुनि घात इंद्र धनुचा' येथें **घात** या शब्दाऐवजीं '**भंग**' हा शब्द समर्पक झाला असता. 'गोवर्धनोद्धरण' ह्या वेंच्यांत 'कालेन्द्राच्या कोपें झाला वर्षाव '**आपदापाचा**' हा शब्द त्या खालील 'पापाचा' ह्या यमकासाठीं घडिलेला क्लिष्ट, नीरस, व मोरोपंती आहे ! पान ८०–८१ 'वाचनालय' हा वेंचा सम्यक् दृष्टिकोनानें लिहिला गेला नाहीं. पान ८७ मातृ-हृदय श्लोक १ पहिला स्वतनयावरी **पांघरी** हा प्रयोग व्याकरणशुद्ध नाहीं. येथें स्वतनयास '**पांघरवी**' असें प्रयोजक क्रियापद पाहिजे. स्वतः **पांघरणें** व दुसऱ्यास **पांघरविणें** हा प्रयोग शुद्ध होईल.

ह्याप्रमाणें त्या पुस्तकांतील काव्यांतून क्वचित् दोष दिसून येतात. ते बारकाईनें शोधून दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं काढून टाकण्याविषयीं रा. महाजन यांस माझी नम्र सूचना आहे.

बडोदें ता. २५–२–३१. **चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे.**

# महाजनांचीं इतर पुस्तकें.

**१ श्रीनामदेव महाराजांचें काव्यमय चरित्र**—पुण्याच्या दक्षिणाप्राइज कमिटीकडून पहिल्या प्रतीचें बक्षिस मिळलेलें मोंगलाईंतील पहिलेंच पुस्तक. सर्व रसिकांच्या आदरास पात्र झालें असून प्रति थोड्याच शिल्लक आहेत. किं. ५ आणे.

**२ मातृहृदय**—महाजनांच्या सुंदर गद्यकाव्यासह स्वतंत्र छापलेलें किं. ४ आणे.

**३ महाराष्ट्र गीतांजली**—( छापत आहे ) काव्यरत्नावलींतून प्रसिद्ध होत असलेले वंगकविसम्राट् श्री. **रवींद्रनाथ ठाकूर** यांच्या गीतांजलीचा अनुवाद. या पुस्तकास श्री. **रा. गो. कानडे,** ( वाङ्मय-विशारद ) यांची मार्मिक व विवेचक प्रस्तावना आहे. नांवें नोंदवा.

**४ मानसविहार ( प्रथमसोपान )** श्री. तुलसीदासांच्या रामायणावरील विहारिणी टीकात्मक समूळ ओवीबद्ध ग्रंथाचा प्रथम खंड छापत आहे. नांवें नोंदवा.

---

## कीर्तन विषयक वाङ्मयाचें प्रकाशन करणारी मोंगलाईंतील पहिली व एकच

# आख्यान–रत्न–माला.

**( सं. दे. ल. महाजन. )**

या मालेनें आतांपर्यंत १९ पुस्तकें प्रसिद्ध करून त्यांत जवळजवळ ३००० च्या वर कीर्तनविषयक गद्यपद्य वाङ्मय उपलब्ध करून प्रकाशित केलें आहे. प्रवेश फी १ रु. ६ पुस्तकांची आगाऊ वर्गणी २ रु. १० आणे ( ट. ह. सह. ) फुटकळ ८ आणे. बृहन्महाराष्ट्रांत मराठी भाषेच्या सर्व भागांत मालेचा प्रसार होत आहे.

याशिवाय संतकवि दासगणू यांचे सर्व ग्रंथ व कीर्तनविषयावरील पुस्तकें आमचेकडे मिळतात.

**गणेश अनंत सराफ.**

श्रीदत्त प्रेस मु. पो. नांदेड. ( निजाम स्टेट )

# पुस्तकपरिचय.

हिंदु लोकांच्या मनाला आनंद देऊन त्यास उल्लसित करणाऱ्या कांहीं गोष्टी **नि**जामशाहींत आहेत. **कृ**ष्णा, **गो**दावरी यांच्यासारख्या, हिंदूंनीं पवित्र मानलेल्या नद्या, **नि**जामांच्या राज्यांतून वाहात आहेत. **नां**देड, **गा**णगापूर, **मा**तापूर (माहूर), **तु**ळजापूर, **जो**गाईचें आंबें, **पै**ठण इत्यादि, हिंदूचीं प्रसिद्ध क्षेत्रें, मोंगलाईत इतस्ततः विखुरलीं आहेत. **ए**कनाथ, **रा**मदास अशांसारखे संत–कवि, **मु**क्तेश्वर **वि**ठ्ठलादि पंडितकवि, **ज**नार्दन पंतांच्या योग्यतेचे वैराग्यशाली गृहस्थवर्य यांची **नि**जामशाही जन्मभूमि आहे. किंबहुना **जुन्या मराठी वाङ्मयाचे बहुतेक आचार्य निजामशाहींतलेच होत** असें ह्मटल्यास अत्युक्ति होणार नाहीं.

मराठी ग्रंथकार व कवि यांची ही निजामशाहींतील परंपरा अद्यापि अखंडित आहे ही गोष्ट कोणास अभिनंदनीय वाटणार नाहीं? **नां**देड येथील आख्यानरत्नमालेचीं पुस्तकें ज्यांनीं वाचलीं असतील त्यांना हें आमचें विधान मान्य होईल.

या मालेच्या द्वारें व **का**व्यरत्नावली आणि इतर मासिक पुस्तकें यांतूनहि **नां**देड येथील कवि रा. रा. **देवीदास लक्ष्मण महाजन** यांची कविता वेळोवेळीं प्रसिद्ध झाली आहे. यामुळें रा. **म**हाजन हे कवि ह्मणून यापूर्वींच मराठी काव्यवाचकांच्या चांगले परिचयाचे झालेले आहेत. रा. **म**हाजन केवळ कवि नसून हरिदासहि आहेत; व त्यांतहि विशेष गोष्ट अशी कीं ते स्वतः आख्यानें रचून त्यांवर कीर्तनें करतात! असें सव्यसाचित्व विरळ! रा. **म**हाजन यांचें **नामदेवचरित्र** आमच्या अवलोकनांत आलेलें आहे. या त्यांच्या सुंदर कृतीनें त्यांच्याविषयीं आमच्या मनांत आदर वसत आहे. रा. **म**हाजन यांच्या कंठातलें माधुर्य त्यांच्या **ना**मदेवचरित्रांतहि सर्वत्र दिसून येतें.

कित्येक आधुनिक कवींनीं आपण स्वतः किंवा दुसऱ्याकडून आपल्या काव्यांचे संग्रह प्रसिद्ध केले आहेत. **मो**गरे, **के**शवसुत, **मा**धवानुज, **न. चिं. के**ळकर, **श्री. कृ. को**ल्हटकर, **ना**गेश, **रें**दाळकर इत्यादिकांचे काव्यसंग्रह आमच्या पाहण्यांत आहेत. असल्या संग्रहापासून वाचकांस तसा कवींसहि फायदा होतो. कवीची पुष्कळ ठिकाणीं विखुरलेली कविता अशा संग्रहामुळें

वाचकांस एकत्र वाचावयास मिळते; हा वाचकांस फायदा. तसेंच स्वतःची कविता संग्रहीत झाल्यानें ती चिरंजीविनी होण्याचें भाग्य कवीला लाभतें. आपलें अपत्य चिरंजीवि व्हावें असें कोणत्या कवीला वाटत नाहीं ? त्यांतूनहि कवीचे ग्रह उच्च असल्यास अशा संग्रहामुळें त्याला यश व लक्ष्मी यांचाहि लाभ होतो.

प्रस्तुत पुस्तक रा. महाजन यांच्या आजपर्यंत अनेक ठिकाणीं प्रसिद्ध झालेल्या कांहीं कवितांचा संग्रह आहे. याला '**महाजनांची कविता, भाग पहिला**' असें नांव दिलें आहे. आम्ही याचा वाचकांशीं थोडा परिचय करून द्यावा अशी रा. महाजन यांनीं उत्कट इच्छा प्रदर्शित केली. या कारणानें प्रस्तुत पुस्तकाविषयीं खालीं चार शब्द लिहिण्यास आम्ही प्रवृत्त झालों आहों. वस्तुतः कवीला स्वतःलाच आपल्या कृतिसंबंधानें जितकें मार्मिकपणानें, व्यापक दृष्टीनें, पूर्णत्वानें, व समरसतेनें लिहितां येईल तितकें दुसऱ्याला, उघड कारणास्तव, लिहितां येणें कठीण. किंबहुना अशक्यच आहे. तथापि कवीला आपल्या काव्याविषयींच्या कांहीं गोष्टी संकोचास्तव सांगतां येत नाहींत हेंहि खरें आहे. अशा गोष्टींचा तिऱ्हाईत गृहस्थास असंकोचपणें परामर्श घेतां येतो. ह्मणून असलें नाजूक काम कित्येक कवि इतरांवर सोपवितात! हा नवीन प्रकार हळुहळू बद्धमूल होऊं लागला आहे. याच्या बरेवाईटपणाची चर्चा करण्याचें हें स्थल नव्हे. असो.

लौकिक विवाहांत पिता, कन्या व वर हें त्रितय मुख्य असतें. अक्षत धुकारणारा उपाध्याय याला जोडला तर हें चतुष्टय बनतें. साहित्यप्रांतांतल्या अलौकिक विवाहांत वरील त्रितयांतल्यासारखे कवि, कविता व रसिक असे तिघे असतात. याला प्रस्तावनाकाररूप उपाध्याय जोडले तर याचीहि चौकडी होते. पहिल्या चौकडींत वधूवरांविषयींचा सर्व विचार त्यांच्या वडील माणसांनीं केलेला असतो, त्यांतील उपाध्यायाकडे फक्त एकच काम; व तें हें कीं अमक्याचा मुलगा वर, अमक्याची मुलगी वधू, अमुक अमुक तिथीला अमक्या मुहूर्तावर लग्न, असें इष्टमित्रांना अक्षत देऊन सांगायचें. दुसऱ्या चौकडीच्या अलौकिक विवाहांत रसिकरूप वराचे गुण गृहीत धरलेले असतात. कवितावधूचा परिचय करून देण्याकरितां मात्र त्यांतल्या उपाध्यायाला ( अर्थात् प्रस्तावनाकाराला ) तिचें थोडेंबहुत वर्णन करावें लागतें. या वर्णनावरून तिच्या पित्याची ( कवीची ) योग्यता अनुमित व्हावयाची असते. लौकिक विवाहां-

तील वधू विवाहप्रसंगीं प्रायः कन्या-संज्ञेला पात्र असून ती जन्मभर एकाच पतीशीं संलग्न होते. अलौकिक विवाहांतील कविता (वधू) प्रौढ असून अनेक-रूपांनीं (आवृत्त्यांनीं) नटते व एकसमयावच्छेदानें अनेक रसिकांच्या प्रणयास पात्र होत असते. वरील दोन्ही विवाहप्रकार पाहतां दुसऱ्या ह्मणजे अलौकिक विवाहांत कवितावधू बरीच दीर्घायु असून तिच्या पतींच्या ( रसिकांच्या ) दीर्घकालीन पर्यायानें ( परंपरेनें ) तिला अखंड सौभाग्य प्राप्त होत असतें.

रा. महाजन यांच्या कविता-कन्येच्या सौभाग्याविषयीं आतां थोडें लिहितों. प्रस्तुतच्या कविता-संग्रहांत ९९ व्या पृष्ठावर असें एक पद्य आहे—

**'प्रेम प्रसाद तैशी प्रतिभा उत्कृष्ट काव्य-गुण जे हे,**
**सहज प्रसाद त्यांतुन या तव काव्यास लाधला आहे.'**

हें पद्य रा. महाजन यांनीं मोंगलाईतील बालकवीला उद्देशून लिहिलें आहे. आम्ही तेंच पद्य रा. महाजन या प्रौढ कवींस, त्यांच्या कृतीवरील आमच्या अभिप्रायचें स्थूल गमक ह्मणून, अर्पण करतों.

रा. महाजन यांच्या कवितेवर जुन्या वाङ्मयव्यासंगाची बरीच छाप आहे. संस्कृत छंद, प्राकृत वृत्तें, पद, लावणी, चतुर्दशपदी इत्यादि विविध रचना-प्रकारांचा तिनें अवलंब केला आहे. तसेंच कित्येक इंग्रजी काव्येंहि त्यांनीं अनुवादिलीं आहेत. तरी त्यांचें मराठीचें वळण विकृत झालेलें दिसत नाहीं. त्यांची भाषा प्रायः प्रसन्न, मधुर, सरळ व शुद्ध आहे. पुस्तकाचें नांव इंग्रजी वळणावर जाणें, चतुर्दशपदीसारखा इंग्रजी रचना-प्रकार योजण्याचा मोह पडणें इत्यादि गोष्टी आंग्लवाङ्मयव्यासंगाच्या प्रभावाच्या सूचक आहेत. प्रस्तुत कवि प्रत्यक्ष निजामशाहींत असून त्याच्या वाणीवर उर्दूनें आपला प्रभाव गाजविला नाहीं याचें थोडें आश्चर्य वाटतें. परकीय भाषेंतील शब्द मराठी वाङ्मयांत प्रसंगानुसार आल्यास तो आम्ही दोष मानीत नाहीं. अस्सल मराठी वळण कायम ठेवण्याचें धोरण कवीनें राखलें ह्मणजे पुरें. वामनी श्लोक, मोरोपंती आर्या, एकनाथी भागवत, बाणाची कादंबरी, जयदेवाचें गीत गोविंद, परशु-रामपंतांचें नवनीत हा जुना संप्रदाय. मोगरे-टिळक मायदेव-रेंदाळकर काव्यसंग्रह हा नवीन पंथ! चतुर्दशपदी ( सॉनेट ) निव्वळ अकारण अनुकरण होय! अष्टपदीसारख्या सुंदर रचनेविषयीं केवढें अज्ञान किंवा उपेक्षा! चतुर्द-शपदींतील यमकप्रकार शुद्ध विचित्रलीला होय!

## महाजनांची कविता.

या पुस्तकांतील कवितांचे विषय देव, सृष्टि, मानव, भावना इत्यादिक विविध आहेत. **या पुस्तकांतलें कोणतेंही प्रकरण टाकाऊ नाहीं. सर्वच पुस्तक एकवार तरी वाचण्यालायक आहे.** भाषांतर असो, टीका असो, स्वतंत्र वर्णन असो, दुसऱ्याच्या आधारानें लिहिलेलें कथानक असो किंवा एखादा चुटका असो **सर्व ठिकाणीं कवीची वाणी लीलेनें विहार करीत असल्याचें दिसून येतें.**

कवीची यमकाची आवड व ती जुळविण्याची हौस 'साशंकित शारदा,' 'गोवर्धनोद्धरण,' 'तेजोभंग,' इत्यादि प्रकरणांत विशेष प्रकट झाली आहे. राष्ट्रीय भावना, कौटुंबिक वत्सलता, देवतारति यांच्या ओलाव्यानें कांहीं कवितांना रमणीयत्व आलें आहे. गडकरी, केशवसुत, टिळक वगैरे आधुनिक काव्यप्रणेत्यांविषयीं रा. महाजन यांनीं मोठें प्रेम या संग्रहांत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रकट केलें आहे. गडकरी व केशवसुत यांची नांवें प्रत्यक्ष घेऊन कवीनें त्यांचें गौरव केलें आहे. 'माझी जन्मभूमि' या टिळकांच्या कवितेची आठवण होईल अशी '**सृष्टिकाव्य**' नांवाची एक सुंदर कविता यांत आहे. प्रस्तुतचा कवितासंग्रह समग्र वाचण्याची ज्या काव्यवाचकांस फुरसत नसेल त्यांनीं निदान यांतील **देवी, जयति शांकरि ! लपंडाव, सौंदर्योपासना, सृष्टिकाव्य, उषारविविवाह, पोपटाची परवशता, राष्ट्रप्रेम, नामदेवाचा निर्धार, धेनुजागृति, श्रीकृष्णसंशोधन, मातृहृदय** एवढीं मनोहर प्रकरणें तरी वाचावीं; अशी आमची त्यांस आग्रहाची शिफारस आहे. कवीच्या कृतीचें वाचन व परिशीलन हीच कवीची खरी संभावना होय. रा. महाजन कवि यांच्या प्रस्तुतच्या कृतीचा अशा प्रकारें रसिक परामर्श घेतील अशी आशा आहे. '**महाजनांची कविता**' ही महाजनांची कविता आहे असे उद्गार रसिक वाचकांच्या मुखांतून किंवा लेखनींतून बाहेर पडल्यास कवीच्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न होईल, त्याच्या मनाला समाधान वाटेल व उत्तरोत्तर अधिक सुंदर काव्यप्रणयन करण्याविषयीं त्याला प्रोत्साहन मिळेल यांत शंका नाहीं.

सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें. १४-२-१९३१. — **लक्ष्मणशास्त्री लेले.** ( प्रोफेसर, सर प. कॉलेज. )

# कन्यादान.

आजन्म कुमारी कन्या न रहावी  परंपरा ठावी आर्यांची ही
त्याही विवाहांत भेद वेगळाले  पक्ष दोन झाले जुने नवे.
कन्यादान होणें तिच्या कौमार्यांत  तो पक्ष जुन्यांत मोडतसे
मोडितात बालविवाहाची रीत  परंतु सांप्रत सुधारक
कविसंप्रदाय यासी अपवाद  संक्षेपें विषद करितों मी
कन्यादान त्यांचें कविता-कन्यका  अर्पावी रसिका हेंचि होय
मात्र ही कवींची पद्धति प्राचीन  आणि अर्वाचीन विपरीत
प्राचीन कवींची कविता-कन्यका  कुमारी रसिकावांचूनिया
अर्वाचीन कवि सांप्रत मोडीती  पूर्वीची पद्धति विवाहाची
कौमार्या आधींच कविता कन्यका  अर्पिती रसिका अट्टाहासें
रूढ झाली बालविवाहाची रीत  दिसते सांप्रत काव्यप्रांतीं
मीच होऊं कैसा यास अपवाद  ठेवितील शब्द बंधु माझे
ह्मणूनी अर्पितों माझी ही कन्यका  स्वीकारीं रसिका! प्रेमभावें
बाला किंवा प्रौढा मी न सांगूं शकें  स्वयेंचि रसिकें जाणावें तें

—दे. ल. महाजन.

# पुरस्कार.

'**पहांट–तारा**' प्रसिद्ध झाल्यानंतर एक वर्षाच्या अल्पावधींतच '**महाजनांची कविता**' शारदाश्रमाचें द्वितीय पुस्तक ह्मणून प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे याबद्दल आश्रमाला अत्यंत आनंद होत आहे. आपला हा काव्यसंग्रह आश्रमातर्फे पुरस्कृत करण्याची आह्मांला परवानगी दिल्याबद्दल आम्ही श्री. महाजनांचे व संपादक-द्वयाचे अंतःकरणपूर्वक आभारी आहों.

कविवर्य महाजनांची ही कृति '**पहांट–ताऱ्या**'च्या उदयानंतरच्या प्रभातकालाची रम्य प्रभा ठरो !

शारदाश्रम-नांदेड
नाथषष्ठी
शके १८५२

रसिकांचा नम्र,
**व्य. शारदाश्रम.**

## कविवर्य देवीदास लक्ष्मण महाजन.



प्रेमळतेची लीलामूर्ति । प्रसन्नतेची वा संपूर्ति । स्नेहलतेची सुंदर ज्योती । केवळ विशुद्धात्मा
रसिकवर देवीदास । **नांदेडचा** कविता विलास ॥ ...**अनंततनय** ( **तिलकविजय अ. ६** )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ३५८५५ वि: ०१०५

# महाजनांची कविता.

## भाग पहिला.

—१—

### शारदा—वंदन.

पद ( रा. असावरी ता. एका )

नमन शारदे ! तुजसि
पदनतजानें मति—वितरण—गुण—विशारदे ! न० धृ०

वीणा पुस्तक करांत
संगीत नि काव्य त्यांत
'ध्वनि' समान उभयतांत
तोष फार दे न० १

वाहन तव तो मयूर
वीणाऽधिष्ठित मयूर
हृन्मंदिरिं कवि मयूर
धरियला मुदें न० २

देवि ! सरस्वति ! बोधिनि !
विद्यारत—मति—शोधिनि !
दास विनवि अनुरोधिनि
बनुनि सुयश दे न० ३

# कविता देवी.

पद ( चाल–भला जन्म० )

कविता नाम्नी दिव्य देवता रसिकमनोमोहिनी
निर्झरी प्रशांत रस वाहिनी ध्रु०

कवि हृदयाच्या क्षीराब्धींतुनि उद्भवली इंदिरा
पातली रसिकांच्या मंदिरा
कीं स्वर्गींची रंभा किंवा तिलोत्तमा अप्सरा
धरेवरि आली बिंबाधरा
वरावयासी उमा चिकित्सक रसिक हलाहल धरा
जन्मली विचार–शैलोदरा
चाल—पाहुनी कर्कशा तमोमयी यामिनी
चैतन्यमयी कीं मेघाची दामिनी
चमचमा चमकली चंचल सौदामिनी
निजप्रभेनें झाली–झाली बुध–चेतोहर्षिणी
नवरस जलधारावर्षिणी १

कविचंद्राची प्रकटे ज्योत्स्ना लाभ द्यावया फुका
अनवरत चकोर–रसकामुकां
दयाघनाची, शांत कराया तप्त रसिकचातकां
वृष्टि ही दुःख–तपन–घातका
स्वर्गंगेची, शब्द–तारकायुता अशी धार का
अर्थमय तेजस्तनुधारका

चाल— कवि भगीरथाची यत्न सफलता खरी
वर्षते जणूं का रसिक–चंद्रशेखरीं
तद्वर्णनिं होते कुंठित मम वैखरी
अरसिकतेच्या अवर्षणातें स्वजलें संमर्दुनी–
भूवरी अवतरली स्वर्धुनी २

कल्पक कविच्या नंदनवनिंची कल्पतरूची लता
पावली काय इथें व्यक्तता
निर्विकल्प त्या ब्रह्माची कीं गुणक्षोभिणी स्वतां
पावली माया साकारता
चहु वाणींचा चतुर्मुखी कवि, सरस्वती तत्सुता
मूळ जी सकळहि सारस्वता
चाल—षड्विकार जे का राक्षस त्यांलागुन
लय पावतांहि दे जी नव रसजीवन
कच–भक्तिरसाचें करित्ये संरक्षण
उशना कविची तीच काय ही सुखमय संजीवनी
देवयानि कीं चिरंजीविनी ३

---

## शांकरी–वंदन.

पद ( रा. मालकंस ता. त्रिवट )

वंदन पदकमला शांकरि!
जे हरिती नत जन–दुरित–मला वं० धृ०

स्वर्गंगोदक स्नानें तुज नभः पात्रीं स्नापुनि
विश्वजननि ! मी धवल चंद्रिका
लेपिन तनुला वं० १

सप्तर्षी सुम, तारकाऽक्षता वाहुनि, घेउनि
शशी नीराजन, ओवाळिन तव
मूर्ति सुविमला वं० २

विश्वंभर चिच्छक्ति चिन्मयरूपा दावुनि
जय श्रीदेवी ! दास पदीं घे
भवि बहु श्रमला वं० ३

---

## जयति शांकरि !

श्लोक ( वृत्त–द्रुतविलंबित )

जयति शांकरि ! मंगलकारिके !
जयति शुंभ–निशुंभ–विदारिके !
जयति अष्टभुजे ! गिरिबालिके !
जयति भक्त–जन–प्रतिपालिके ! १

सकल सुंदरता जगतांतली
पदतलांत तुझ्याच समावली

अरुण तो मनिं लाजुनि पांगळा
तव पदाश्रित हा जणुं जाहला २
नख न तें शशिची जणुं कोर ती
रत जिथें मदनासह ती रती
विकच अब्जदलें चरणांगुलि
करिति गुंजन सद्भ्रमरावली ३
हिमगिरीवरि जेविं जलौघ तो
पदिं तसा तव अंचळ लोळतो
रुचिरता, शुचिता, कमनीयता
मज तिथें दिसते रमणीयता ४
धवलता विधुची जणुं अंबरीं
भरुनिया विलसे तव अंबरीं[1]
विरलता—अथवा वद—लोपवूं
यश तसेंच तुझें ह्मणुनी स्तवूं ५
गगन सूक्ष्म जसें धरि गोलकां
कटिवरी धरिसी बहु बालकां
गमति ते नरकेसरि साजले
ह्मणुनियां वन—केसरि लाजले ६
सदयता समता हृदयांतुनी
परम वत्सलता भरली स्तनीं
विमल बालगणां नव जीवना
स्थल दुजें न दिसे मज याविना ७

1 वस्त्रांत.

कमलनाल तसे भुज शोभती
असिलताब्ज जिथें नित लोभती
वधिति जे मधुकैटभ दानवां
सुखविती गतवैभव मानवां ८

कथिति कीं मजला भुज हे असें—
'न अबला, जननी प्रबला असे'
अभयता स्वपदाश्रित–मस्तकीं
वितरि ती तव दक्षिण हस्तकीं ९

नभिं सुरम्य शशी बहु माजतो
हनु तुझी बघुनी मग लाजतो
अधरिंची मधुरा तव जी सुधा
वितरितो परिचारक तो मुदा १०

हृदय–सिंधु उचंबळुनी निका
उसळली जणुं मौक्तिक–मालिका
सुबकशी तव ती वदनांतली
दिसतसे मजला रदनावली ११

सरलता, ऋजुता जगिंची निकी
जननि ! गे ! भरली तव नासिकीं
वितरि जो जगिं जीवित वायु तो
सतत या स्थलिं विश्रम पावतो १२

विकसिताब्ज तशी नयनाकृति
भृकुटि भव्य धनूपरि वक्र ती

कुटिलता परि ती कुटिलांप्रति
करुण कोमलता स्वजनांस ती १३

श्रवणयुग्म न गे! जणुं दूत ते
त्वरित आर्तरवा परिसाविते
बघुनि ती श्रुति–मौक्तिक कुंडलें
गगनिं शुक्रसम ग्रह लाजले १४

कचकलाप दिसे वरि खालते
क्षितिज भव्य तसें तव भाल तें
उगवल्या सविल्यांतिल रक्तिमा
लघु दिसे तुलितां तव कुंकुमा १५

कचकलाप म्हणे, ‘भ्रमरा! फुका
असिसि रम्य तरी भ्रमतोस कां?’
गणुनि तुल्यगुणी परि येउनी
भ्रमर तो खिजला, थिजला मनीं १६

सुललिते! लवही तुज वर्णितां
बघ कशी बनली मति कुंठिता
सहज मुग्धपणा वरिते परा
मग टिकेल कशी अपरा गिरा? १७

हृदयिं तूं असतां मग कां महा–
निशिदिनीं छळितो मज काम हा?
कधिं तरी करुणा करिशील तूं?
हृदयिं बालक हा धरिशील तूं? १८

हृदय हें फुटुं दे तुटुं दे क्षणीं
जरि न तूं बघसी कमलेक्षणि !
त्यजुनि निष्ठुरता स्वमनांतली
पतित हा करि पावन भूतळीं १९

कथुं कुणा मनिंची विमनस्कता
असिसि तूंच जगज्जननी स्वतां
तनय हा जरि मोकलिसी असा
समज मी पुरता बनलों पिसा ! २०

स्वमनिं होऊनि मी विषयाकुला
निशिदिनीं स्तवितों जरि मी तुला
परि असंगतता, विपरीतता
नच गमे मुळिंही मजला स्वतां २१

मदन—किंकर मी, गणुनी जरी
बघ उपेक्षिसि तूं मजला तरी
समज कल्पवरी पतितास या
कठिण सद्गति—लाभ मिळावया २२

विषय—लोलुप मी ह्मणुनीच का
विषयिं वाहत जाउंच दे फुका
विरमलों, रमलों भ्रमलों जरी
जननि ! विश्रम दे चरणावरी २३

मम मनीं तव दर्शन—लालसा
विषय अन्य गमे मज कालसा

करुनिया स्वरूपामृतवर्षण
कधिं तरी वद देशिल दर्शन ? २४

अभय दे, वर दे ! वरदायिनी !
हृदय–मंदिर–मंचक–शायिनी !
नत सदा तव दास पदा नमीं
न दुसरें वरितों वरदान मी २५

श्लोक ( वृत्त-पृथ्वी )

तुझी विमल मूर्ति ही हृदयिं राहुं दे राहुं दे
समस्त युवतींमधें तुजसि पाहुंदे पाहुंदे
तुझ्या भजनिं कष्ट हे तनुसि साहुंदे साहुंदे
तुझ्यास्तवचि अश्रु हे नयनिं वाहुंदे वाहुंदे २६

---

## अंत बघसि कां असा ?

[ चाल–रामकृष्ण नरहरे० ]

अंत बघसि कां असा ? आइग ! अंत बघसि कां असा ?
धेनु कधीं कां दूर लोटिते दूधपित्या पाडसा
माझ्या मनिंचा ठसा, आइग ! माझ्या मनिंचा ठसा
जननीलागीं प्राणप्रिय बहु बालक वेडापिसा
शाश्वत सुखलालसा, मम मनीं, शाश्वत सुखलालसा
राजहंस–पद मिळेल कैसें परि मजसम वायसा ?
न्याय जाहला तसा, आइ ग ! न्याय जाहला तसा
अजापालमोहानें न्यावा छावा चोरुनि जसा

धरूं भरंवसा कसा ? आइग ! धरूं भरंवसा कसा ?
हांक मारुनी दीर्घरवानें पडे कोरडा घसा
यास्तव मन्मानसा, आइ ग ! यास्तव मन्मानसा
निष्ठुर होउनि नकोस पाहूं लावुनि यापरि कसा
दे भक्तीच्या रसा, आइ ग ! दे भक्तीच्या रसा
क्रूर दरारा मग काळाचा दासासी कायसा ?

---

## लपंडाव.

पद ( चाल-भूपती खरें. )

कां असा खेळसी लपंडाव हा सांग
मग फिटेल कैसा मम जीवाचा पांग ? धृ०

हे भोंवतालचे कीर्तिधनाचे व्याप
पाहुनी त्रासलें मन्मन आपोआप
पसरला चहुंकडे मोहानल हा सारा
सोसे न मनाला अशिव तयाचा वारा
त्यांतून पडे दृष्टीस यदा सौंदर्य
शमदमास चित्तीं तिळही नुरतें धैर्य
चाल–कावरा बावरा होतों–तेधवां
जरि शोध तुझा मी घेतों–तेधवां
सद्बोध लयाला जातो–तेधवां
या पापभीरुचें सहज थरारे अंग
मग फिटेल कैसा सांग जिवाचा पांग ? १

शिरुनियां हृदय–मंदिरीं बसुनि एकांतीं
तव मूर्ति चिंतुनी मिळविन मी सुखशांति
ही आशा धरुनी होतों जैं उद्युक्त
तैं अनुभव येतो मजला त्या व्यतिरिक्त
लावून घेतलें दृढतर नेत्रकपाट
या बाह्य सृष्टिची बंदच केली वाट
चाल–बाहेर खेळ जो होता–चालला
प्रतिबिंबित होउनि चित्ता–चालला
विश्वास परि लया आतां–चालला
अंबिके ! इथेंही तुझा न लागे थांग
मग फिटेल कैसा मम जीवाचा पांग ? २

लावून घेतलें मी मजकडुनि कवाड
लपलीस जाउनी तरि ही दाराआड
या तुझ्या वियोगें हृदय दुभंगुनि गेलें
वद राहतील हे प्राण कशास भुकेले ?
हा प्रेमाश्रूंचा लोंढा आला–आला
दारांत सारखा पूरच त्याचा झाला
चाल–कासाविस होती प्राण–सारखे
लागलें तुझें तें ध्यान–सारखें
छळुं नको असें, मनिं आण–सारखें
ओढून जरी घेशील असा अनुराग
तरि फिटेल कैसा सांग जिवाचा पांग ? ३

करिशील अजुनिही अशीच डोळेझांक
तरि समज जाहली सकल सुखाची राख
भडकली पहा तव विरहाग्नीची ज्वाला
रोधून तरी ही ठेव अश्रुची माला
ती ज्वाला शमते किंवा माला जळते
तव सकरुण दृष्टिच वळते, तें ही कळतें
चाल—खेळसी लपंडावातें—कुठवरी ?
ही दशा पाहसी माते !—कुठवरी ?
नैराश्य असें नशिबातें—कुठवरी ?
तनुमनें जाहल्या **दास** तुझा विकलांग
मग काय फेडिसी सांग जिवाचा पांग ? ४

---

## एकांत गीत[1].

साक्या.

तोच सुखी नर खरा ! जयाच्या आशा, चिंता साऱ्या
वडिलार्जित अन्नोदकिं केवळ मर्यादित असणाऱ्या
निजसत्तेच्या भूमीवरती घडतो ज्यास निवास !
समाधान आपुल्या वायुंतच घेतां श्वासोछ्वास
दुभतीं ज्याचीं खिल्लारें हीं शेतें सुपीक असती
गृहीं मेंढरें सदा अंगभर वस्त्रें ज्याला देती

---

१. Ode on Solitude पोप कवि.

उष्णमास तो येतां ज्याचीं झाडें देती छाया
तींच पुढें उपयोगा येती शीतकालिं शेकाया
तासांमागुनि दिवस तशीं ती दिवसांमागुनि वर्षें
कशीं चाललीं–धन्य तोच–ज्या कचित्कल्पना स्पर्शे
देह निरोगी, मनीं शांतता, दिवसां स्थिरता गात्रीं
स्वप्नाभासाविरहित येते गाढ झोंप ज्या रात्रीं
विश्रांतिश्रम समान मिश्रित, नच बाधा व्यापाची
निरतिशयानंदप्रद तैशी पापभीरुता ज्याची
या सर्वांचा लाभ लाभला अलभ्य जो इतरांला
परमेशाच्या ध्यानीं परि जो तशांत तन्मय झाला
दिसो, कुणाहि न कळो, असें हें जीवित द्यावें देवा !
मरणहि येतां मजसि, कुणाचा अश्रुबिंदु न ढळावा
विश्वांतुनि अज्ञात ठेव मज, दान हेंचि दे मोठें
चिन्ह एकहि न कुणास सांगो स्मशान माझें कोठें

*   *   *

आंग्लविभूषण पोपकवीची जी निस्वार्थी वृत्ति
दानाआधीं तिची प्रेरणा करि तूं माझ्या चित्तीं

# खरा साक्षी.

( शा. वि. )

सारी संपुनियां तमोमय निशा आला उषःकाल हा
झाला तो अरुणोदय प्रथम, त्यामागूनि येई अहा !
तेजोगोल रवि प्रभा पसरवी विश्वा करी जागृत
त्यायोगें व्यवहार लौकिक जनीं चालेचि अव्याहत.
कर्तव्यीं रत मानवास करुनी अस्तास जातां रवि
आली घोर निशा पुन्हां किततरी तारे नभीं दाखवी
चंद्राची अति शीतल प्रकटली ज्योत्स्ना, सुधा देतसे
सारें विश्व असें चमत्कृतियुत प्रत्यक्ष नेत्रां दिसे
साक्षी या उपरोक्त दृश्य विषयां त्वच्चर्मचक्षुद्वय
आहे मुख्य परंतु याच शरिरीं साक्षी खरा अद्वय
झाला हा अनुभूत खेळ अवघा या जागृतीचा खरा
आतां स्वप्नदशेंत काय घडतें तें तूंच पाहीं नरा !
येतां स्वप्नदशा समूळ अवघे जाऊनि तेथें लया
होई सर्वहि कल्पनामय पुरें, साक्षीहि तैसा तया
स्वप्नीं जागृतिच्यापरी अनुभव प्रत्यक्ष येतो जरी
आहे तें परि कल्पनामय; नसें सत्यत्व त्यामीतरीं
स्वप्नाचा क्षण जाउनी सकलही पावे सुषुप्तीं लया
तेथें दृश्य नि कल्पना तिळभरी राहे न कल्पावया
सारें शून्य, गमे न दृश्य म्हणुनी द्रष्टाहि तो कासया ?
ऐसें वाटतसे परि भ्रमहि तो जाई विचारें लया

साक्षी मुख्य न एकदेशि असला जो या शरीरीं वसे
ब्रह्मांडीं भरुनी दशांगुलि वरी जो राहिलेला असे
पाही ज्यापरि 'वस्तु–भाव' अवघा तैसें 'अभावा' प्रती
भावाभाव बघून जागृत सदा 'आत्मा' तया बोलती
सांगे गर्जुनि वेद 'तत्वमसि' या मंत्रास जीवाप्रती—
"तें तूं ब्रह्म असूनि काय वरिसी अज्ञान हें निश्चितीं
उत्पत्ति, स्थिति वस्तुचा लय तसा आत्मा तुझा जाणता
आहे अद्वय पूर्ण चित्स्वरुप तो साक्षी खरा तत्त्वतां"

---

## एकांतवास.

( चाल–भूपती खरें तें )

'एकांतवास हा पसंत साधूसंतां'
परि अनुभव त्याचा येइल काय असंता ? धृ०
एकाचा निरसे चंचलतेचा भार
परि दुसऱ्याचें मन करी स्वैरसंचार
कामाचा जेता होई–संत जो
क्रोधाला लत्ता देई–संत जो
लोभाला विलया नेई–संत जो
हे त्रिविध वृत्तिचे वैरी जित एकानें
परि अन्या नेती निरयि निजद्वारानें १
एकाला लागे ध्येयवस्तुचें ध्यान
दुसऱ्याला नुरते जागृतिचेंही भान
एकास होतसे नूतन–काव्य–स्फूर्ति
दुसऱ्याला दिसते मृतदेहाची मूर्ति

शास्त्रीय शोधही लावी–संत जो
कर्तव्य रेखितो भावी–संत जो
गुह्य जें प्रकट तें दावी–संत जो
ही परंपरेनें आत्मोन्नति एकाची
परि उलट अधोगति होत असे दुसऱ्याची २
हा भेद केवढा संताऽसंतांमाजी
एकांत एक परि भिन्नपथींचा वाजी
जो आत्मसंयमी, त्यास असे हितकारी
परि विषय-लंपटा नेई निरयद्वारीं
हा अनुभव माझा देवा ! संप्रती
मज वाटे त्याचा हेवा–संप्रती
मंदिरीं, स्मशानीं ने वा–संप्रती
तुज देविदास कर जोडुनि भावें विनवी
एकांत नको, सत्संग तेवढा घडवीं ३

## दोषाविष्करण.

( शा. वि. )

जो जो दोष अतीव गर्ह्य ह्मणुनी अन्यास मी देतसे
तो तो आत्मनिरीक्षणांत मजला माझ्याच ठायीं दिसे
देतो ताप ह्मणून फेंकुनि दिला पाषाण सूर्यावरी
गेला कोठवरी म्हणून बघतां माझ्याच येतो शिरीं

# सौंदर्योपासना.

पद ( चाल-भला जन्म हा० )

सौंदर्याची तुजसि लालसा बापा ! वेड्या ! मना !
विसरुनी विश्वंभर वामना धृ०
विषयसुखाची चटक सारखी कशी तुला लागली
विवेकीं वृत्ति न तव जागली
आड येउनी अधःपात तव करावया लागलीं
सर्वेही पापें तीं मागलीं
शील-रक्षणापायीं वेड्या ! शक्ति तुझी भागली
झाली गोष्ट न ही चांगली
चाल—लावण्य तुला दिसतांच भोंवतीं जरा
चांचरे वृत्ति तव जीव होय बावरा
वैराग्य, विवेक स्पर्शति नच अंतरा
शीघ्र संचरे निमिषभरांतचि कुश्चलशी कामना
आवरे दुर्धर मग काम ना १

चिच्छक्तीचे पाय चिंतणें, उपाय हा यापुढें
जयानें शाश्वत सुख आतुडे
सृष्टिसुंदरी नटेल किति ती विश्वजननिच्यापुढें
तिचें सौंदर्य किती बापुडें
या सदुपायें विषयकर्दमीं वृत्ति कदापि न बुडे
भवाचा वृक्ष समूळचि खुडे

चाल—सोपान सुगम हा मोक्ष-मंदिरा भला
या उपासनेचा पंथ सुखद लाभला
पाहिजे हृदयिं परि निश्चयेंच बिंबला
**दास** ह्मणे हा शक्तिदेविचा मार्ग मुळीं वाम ना
त्याविना दुजें सौख्य धाम ना २

---

## धिःकार या जीविता !

( शार्दूल विक्रीडित. )

आधीं वृत्ति मदीय भिन्न विषयीं होत्ये यदा घाबरी
एकांतीं मज तेधवां क्षणभरीं विश्रांति वाटे बरी
थोडासा व्यवहार दूर करितां एकांत तो सांपडे
तेव्हां काय करूं ह्मणून दुसरें मोठेंच कोडें पडे.
देवाचें प्रिय नामरूप हृदयीं प्रेमादरें आठवूं
किंवा शोधुनि मित्र त्यां जिवलगां पत्रें तरी पाठवूं
पाहूं ग्रंथहि ऐतिहासिक जिथें खोटेपणा अल्प ना
किंवा काव्य करूं कशाहि करुनी कांहींतरी कल्पना
हें कांहींहि नको; बराच थकलों आतां जरा झोंपतों
ऐशा याच विवंचनेंत नुसत्या एकांत तो संपतो
नाहीं ध्यान, न पत्रलेखन तसें ना ग्रंथ, ना काव्य तें
लीला ही भवितव्यते ! तव अशा दावी असंभाव्यते

* * * *

नाहीं स्वार्थ, परार्थ ना, क्षणभरी निद्रा न ये सेवितां
देवीदास ह्मणे खरोखर अशा धिक्कार या जीविता.

---

# अभंगोपासना.

१

गुंतुनीया प्रपंचांत असा चालली वाहत
प्रेम जडो तुझे पायीं हीच चिंता चित्त वाही
जन्म जरी गेला वायां पुन्हां कैची नरकाया ?
**दास** भाकितों करुणा दाव अंबिके ! चरणा

२

नाना तरंग उठती चित्ता आंदोलनें देती
कैसें बिंबेल निष्कंप जगन्माते ! तुझें रूप ?
विषयाची वावटळ कैसें राहील निर्मळ ?
वाहो कृपातरंगिणी मळ जाईल धुवोनी
सर्व सोडोनीया किंतु माझा पुरवावा हेतु
वत्स हंबरडा फोडी **दास** ह्मणे घाल उडी

३

तेल घालुनी डोळ्यांत नित्य राहतों जागृत
परि चुकवुनी डोळा काम करितो घोटाळा
कोण जाणे निमिषांत कैसा होतो अधःपात
आतां कोणा हांका मारूं माते ! तुझें मी लेंकरूं
देईं देईं भरंवसा तुझ्या हतभागी **दासा**

४

'तृप्ति विषय-सेवनीं नाहीं कल्पांतीं,' ह्मणोनी
संत बोलले बोलले मन सेवीत चाललें
काय कारणापासोनी कार्य राहतें सोडोनी

विषयाची—आनंदाची तूंच अधिष्ठात्री साची
**दास** ह्मणे गूढ कोडें मज कैसें उलगडे

५

वृक्ष साहे फलभारा सुटे सोसाट्याचा वारा
पहा क्रूरता केवढी तया उन्मळूनी पाडी
कष्टें शरीर आपुलें जरी गुणें शृंगारिलें
मोहाचा तो झंझावात करी वेगें अधःपात
**दास** ह्मणे अधिष्ठानीं माते ! रहा तूं निर्वाणीं

६

निश्चित निर्व्याप प्रशांत हें मन
कधीं तुझें ध्यान करील गे !
याचा मज नाहीं मुळीं भरंवसा
होईल तो कैसा परिणाम
वाहवेल कैसें जीविताचें तारूं
काय तरी करूं अनुमान ?
तूंहि नको होऊं मनीं उदासीन
आळवितों दीन **दास** तुझा

७

कवित्वाची टाकसाळ
जोडी अक्षरांची माळ
नित्य कंठीं ऐसा काळ
आला आळ कवीचा १

गेलों वायां गेलों वायां
भासे सुखाची ही छाया
वारीं आपुली ही माया
करी दया अंत्रिके ! ध्रु०

कवि ऐसें नांव गाजे
हें तो अहंतेचें ओझें
चित्त व्हावें शुद्ध माझें
याच काजें स्तवितों २

एक लागो तुझें ध्यान
दुजें कांहीं नुरो भान
हेंचि देईं वरदान
इच्छा दीन दासाची ३

८

कांहीं घडेना साधन
तुझ्या पायाचें चिंतन
मुखीं नामाचें स्मरण
माझें मन नावरे १

आतां धांवाधांव करी
कामक्रोधादिक अरी
अनीतीची ही कुठारी
दासावरी घालिती ध्रु०

ग्रंथ शोधुनी पाहिले
सार काढूनिया आलें

तुझीं चिंतुनी पाउलें
नत झालें पाहिजे २

म्हणूनिया काकूळती
तुज येतों मी संप्रति
कृपा करी जेणें रीतीं
पदीं मति स्थिरावे ३

गुंतुं देऊं नको भवीं
रूप आपुलें दाखवीं
प्रेमामृताची ती चवी
तूं चाखवीं **दासा**ला ४

९

तुझें वेडें पिसें पोर होऊं पाहे सेवा चोर
वेठीं धरूनियां तया लाव माते ! सेवावया
नित्य विषयाचें ध्यान चिंती कीर्ति, मान, धन
झाला शांतीसी विन्मुख होय कोठोनीया सुख ?
**दास** म्हणे धांव झणीं बाळ लावावया स्तनीं

१०

माते ! चित्तशुद्धिसाठीं किती करूं आटाआटी
कांहीं केल्या वृत्ति स्थिर होत नाहीं क्षणभर
हरिनाम संकीर्तनीं काळ पाहिला वेंचोनी
प्रति सत्कर्माच्या पाठीं जडे अभिमान पोटीं
**दास** तुझ्या लागे पायीं रहा येऊनी हृदयीं

११

कोण जाणे माझ्या अंतरींचें दुःख
हीच रुखरूख लागलीसे
ह्मणुनियां तुज भाकितों करुणा
पदिं लोटांगणा घालूनिया
आग भडकोनी गेली हृदयांत
कोण करि शांत दयामृतें
पुरविली पाठ विषय–विकारें
जन्माचें मातेरें झालें माझ्या
आतां तरी माते ! न व्हावें निष्ठुर
नको लोटूं दूर दीन **दासा**

## करुणा.

**पद** ( चाल-श्रीगुरुचे चरण )

सोडूं कसा सांग तुझ्या चरणपंकजातें
ध्याति सदा प्रेमभरें विधिहरिहर ज्यातें ॥ धृ० ॥
संसारीं व्याप बहुत पापपुण्यसंगें
तेणें सुखशांतिसहित समाधान भंगे
विटुनि तया मानस हें तव भजनीं रंगे
वश होऊं देउं नको मदमत्तगजातें १
ध्यान तुझ्या मूर्तीचें चित्तिं जडो आतां
तुच्छ गमो त्यापुढती कनक–कीर्ति–कांता
नारीगण भासो मज निजभगिनी, माता
**दास** ह्मणे पाव जननि ! आयु वृथा जातें २

# अनन्य शरणांगति !

पद ( चाल—निजरूप हिला० )

[ आपल्याविषयीं जानकीनें नसता विकल्प करून विनाकारण आपल्या अंगावर आग पाखडली व कितीहि सांगितलें तरी आपल्या शुद्ध हृदयाची कांहीं केल्या तिला खात्री पटेना त्यावेळीं तिच्या वात्सल्याला मुकलेला लक्ष्मण पुत्रभावनेनें अनन्य शरणांगतिपूर्वक आत्मनिवेदन करितो. ]

तूं जें करिशिल ती दया दया
कासया बघूं मी नयाऽनया तूं० धृ०

गडगड करुनी मेघ गडगडो
अग्निज्वाला वीज कडकडो
अंगावरती कोसळुनि पडो
चातक चिंती पया पया तूं० १

पान्हा सोडो कीं नच सोडो
अथवा शिंगांनीं हुंदाडो
किंवा धेनू पदिं लाथाडो
वत्स वांछितें पया पया तूं० २

पुत्रापरि मज अंकीं बसवीं
पापी म्हणुनी पायीं तुडवीं
रुचेल जें तव मनास घडवीं
लक्ष्मण-सुत धरि न या भया तूं० ३

## —२—

# सृष्टि—काव्य.

[ मंदार—माला. ]

वंदू तुला सत्कवींच्या कवीला कराया मनःकामना—पूर्तिला.
पाही तुझ्या सृष्टि—काव्यास जेव्हां स्फुरे कल्पना तैं कविस्फूर्तिला
'काव्योदधीतें तुझ्या प्राशितों मी' अगस्ति प्रतिज्ञा करी कोणता ?
'वाचीन संपूर्ण काव्यास ऐशा' कशी कल्पना मी करूं नेणता ?
ऐसें अनाद्यंत जें काव्य तें त्वां महाकाल—वृत्तामधें गोंविलें
बुद्धिप्रधानांस या योजनेनें अनंता ! स्वसामर्थ्य हें दाविलें
'अज्ञेय' जें भासतें तत्त्ववेत्त्यां दिसे गूढशा गुंजनाचें बळ
ज्ञाता ह्मणे 'ज्ञेय मानीं तया मी' जरी बुद्धिसामर्थ्य तें दुर्बल
त्वां योजिलें 'कल्प' 'विश्रांति' घ्याया तसे 'पाद' त्याच्यांत 'मन्वंतरें'
दीक्षा 'यतीची' दिली 'मृत्यु' लागीं; तसे 'अब्द' हीं ऱ्हस्वदीर्घाक्षरें
नाना चमत्कार सृष्टींत जे जे तुझे ते 'अलंकार' काव्यांतले
दुःखा सुखा मूळ जें का विकारां रसांचेंच सामर्थ्य हें त्यांतलें

*　*　*　*　*

काव्यासवें पूर्ण तादात्म्य पावे, तया नाठवे काव्य—कर्ता कवि
आधींच तो काव्यरूपें नटोनी रसांची रसज्ञांस दावी चवी
तैसी तुझ्या सृष्टि—काव्यांत आह्मां जरी ईश्वरा ! होइना त्वत्स्मृति
मानून घे काव्यरूपें कवीशा ! असे चालली ही तुझीच स्तुति

# वर्षर्तूंतील उष:काल.

[ चालः—उघडि नयन० ]

ऊठ ऊठ रसिकवरा ! उषःकाल आला
अवलोकुनि मन्मनास मोद खचित झाला.

घेउनियां धवलपत्र
काढिति जन कृष्णचित्र
नवल त्यांत न अणुमात्र
उषःकाल करि विचित्र
कृष्णपत्रिं रेखितसे धवल चित्रमाला.

सजल जलद नभिं पसरुनि
करिती वर्षाव अवनिं
राजमार्ग संमार्जुनि
जाती मग हळु वितळुनि
सृष्टिसती नटुनि सजुनि करि स्वागताला

नव दंव मौक्तिकमाला
घालुनि कंठीं विमला
हरित शालु वेष्टियला
चढत लालि वदनाला
मंदानिल कोमल तनु हलवित विनयाला

पक्षि करिति किलकिलाट
सूर्याचे गमति भाट
सृष्टीचा बघुनि थाट
परिचय ते करिति दाट
जागविती प्राणिजात सुखकर समयाला

देउनियां धन्यवाद
विरचुनियां काव्यछंद
दावुनि आशा–प्रमोद
सत्वरि व्हायास फलद
होवो ! हा जागृतिचा समय भारताला !

---

## चेंडुफळी.

पद ( चाल–भूपती खरें तें )

निमिषार्ध न पडतां खंड, न चुकतां वेळ
चालला कुणाचा चेंडुफळीचा खेळ धृ०
क्षितिजाच्या मागें आपणास लपवून
हे कोण देतसे चेंडु असा उडवून
हा खेळ मजेचा नयनमनोहर भारी
या मुळेंच आहे निसर्ग शोभा सारी
चाल–सोन्याचा पूर्वदिशेचा–कंदुक
पश्चिमेकडील रुप्याचा–कंदुक
कोणता असे कोणाचा–कंदुक
विश्वाच्या नेत्रीं तेज असे एकाचें
प्रेमामृत भरलें त्याचपरी दुसऱ्याचें १
सामान्य जनांचें लक्ष्यच तिकडें नाहीं
परि रसिक कवींना त्याविण न रुचें कांहीं
लागला तयांना तोच एकटा छंद
व्यवहार तयांचे झाले सारे बंद

शीतोष्णादिक हें द्वंद्व लयाला गेलें
क्रीडनें तयांचें चित्तच चोरुनि नेलें
चाल-तनु मात्र भूवरी वागे-त्यामुळें
चित्तास समाधी लागे-त्यामुळें
द्वैताचे तुटले धागे-त्यामुळें
लवणाचा पुतळा गेला पोहायाला
आनंद-सागरीं झाला-समरस झाला २

इतरांस वाटलें वेडेपण हें त्यांचें
पाहती कराया संशोधन सत्याचें
ते अरसिक सारे कनककश्यपू झाले
प्रऱ्हाद कवींना छळावयाला आले
प्रतिनिधी तयांनीं दिले दोन निवडून
ते गुप्तपणें जातात नभांत उडून
चाल-ते दुष्टपणानें मानी-मातले
ब्रह्मांड पालथें त्यांनीं-घातलें
त्या सूर्यशशीच्या स्थानीं-पातले
चेंडूंस तयांनीं हळुंच गिळंकृत केलें
छे-ब्रह्मांडांतिल काव्य लयाला नेलें ३

# तेजोभंग.

( पृथ्वी )

हळूंच निरखी निशा उपवरा शशी एकला
विमूढ मनिं जाहली बघुनि निर्मला तत्कला
स्वजीवित गमे तिला सुखद त्यासवें कंठितां
तदीय चिरसंगमीं ह्मणुनि होय उत्कंठिता
जडे जंव परस्पर प्रणय एकमेकांवरी
प्रदोष–समयीं निशा प्रिय सुधाकराला वरी
द्विजें ह्मणुनि अष्टकां विषयिं बोधिली दक्षता
उभारिति दिगंगना उडुगणस्वरूपाक्षता
करी निज निवेदन स्वरुपभक्ति जैं यामिनी
उरे पतिच होउनी समरस प्रिया कामिनी
शशी–पतिसवें निशा रमत पौर्णिमेच्या दिनीं
तिच्यापरि विलासिनी सकल जाहली मेदिनी

*  *  *  *

नशीब फिरलें तिचें प्रतिपदा यदा पातली
शशीस रुचली कृति प्रकट पूर्ण पापांतली
निशा स्वमनिं आतुरा प्रिय पतीस भेटावया
विलंब करि चंद्रमा परत मंदिरीं यावया
बृहस्पति–पतीस जी तिळहि मात्र तारा न भी
शशीसह जडे तिचा प्रणयभाव सारा नभीं
प्रवेश गुरुच्या गृहीं तनय–भावनेनें करी
तदीय गृहिणी–करें प्रणय–पत्र तो स्वीकरी

विदग्ध मनिं जाहला सुरगुरु प्रकोपानलें
करील परि काय तो जरि न कृत्य हें मानलें
पतीस दयिता दिसे दयित–कीर्ति संहारिणी
कलंक जडतो कुला निपजतां स्त्रिया जारिणी

'विलंब तरि कां असा' धृति न ही विचारावया
" निशा जरि पुसे मला, 'गृहिं विलंब कां यावया'
कथूनि तरि काय तें हृदय शांतवूं मी तिचें "
परस्पर खुपे असें कठिण शल्य हें भीतिचें

यशासि मळवील तो वरुनि पातकी कामना
अशी प्रथम वाटली तिळ न मात्र शंका मना
परंतु वरचेवरी विरह वृद्धिला पावला
कुसंशय तिच्या मनीं पुढति मात्र डोकावला

शशी–तनु कलंकिता, विभव–खंडिता पाहुनी
विकल्प रजनी–मनीं उठत एक एकाहुनी
पति–प्रणय लोपला, कुठुनि सौख्य लाभे तरी ?
उदास कविता दिसे रसिक रुष्टतां अंतरीं

निराश बनली निशा बघुनियां क्षयी इंदुला
झणीं मुकत चालली पति–कृपा–सुधा–बिंदुला
दिसे गति न चांगली ह्मणुनि घाबरे यामिनी
विचार पुढचा करी तंव पतिव्रता कामिनी

तनूस दंव बिंदुनीं प्रथमता तिनें न्हाणिलें
कसूनि धवलांबरा व्रत समासिला आणिलें

पुनश्च मग ठेवुनी दशदिशांस साक्षीस ती
त्वरें पतिपुढें निघे अरुण–वन्हिमाजी सती
कितीतरि पतिव्रता निज गुणांत नांवाजल्या
परंतु रजनी सती बघुनि त्या मनीं लाजल्यां
बृहस्पतिसवें नभीं सुर तदा तिला पाहती
प्रवंदुनि तिच्यावरी उडुगणाक्षता वाहती

*   *   *

नसे प्रकटली उषा उजळतांचि दाही दिशा
महा खडतर व्रतें धवल होय कृष्णा निशा
न बिंब रविचें तिची तिलकयुक्त सौभाग्यता–
करी प्रकट यामिनी–चिर–सुवासिनी–योग्यता

व. ति.

निस्तेज चंद्र बनला रविच्या प्रभावीं
आला तयास कळुनी निज नाश भावी
त्याचें तयास फळलें व्यभिचार–कर्म
तेजोहर प्रथित हा ह्मणुनी अधर्म.

---

## कांचनमृग.

**पद** ( चाल–लाल शाल जो० )

रम्य मनोहर कांचन मृग तो विहरतसे त्या कांतारीं
दुडदुड धांवुनि मागें पुढतीं, दूर, समीप उड्या मारी   धृ०
कांति तनूची सुवर्णवर्णी स्पर्धा करि रवि–तेजाची
शोभा अतितर अभिनव अनुपम गति तैसी चंचल भारी   १

रत्नखचित तीं श्रृंगें दोन्हीं तेज अलौलिक त्यांवरती
शुक्लकृष्ण वर्णद्वय विलसित वदनाकृति विस्मयकारी २
इंद्र–धनूपरि विविध वर्णी तें पुच्छ विराजे पाठिवरी
मणिमय मोहक चमचम चमकति पळतां पाद खुरें चारीं ३
मान करोनी किंचित् वरती सीतेवरि रोंखुनि दृष्टी
विशाल नयनें मधुनी मधुनी निरखुनि पाही माघारी ४

---

## कोपाग्निज्वाला.

( 'हा सीते हा लक्ष्मणा' अशी वाणी ऐकून घाबरलेली सीता, लक्ष्मण आपल्या जवळून हालत नाहीं असें पाहून संतापली. त्यावेळीं ती सती यज्ञवेदीं-तील पवित्र अग्निज्वालेसारखी भासली. )

पद ( चाल–चंद्रकांत राजा० )

क्रोधानल परि सतिच्या अंगीं संचरला जेव्हां
यज्ञाग्नीपरि वंद्य, पवित्र न होइल कां तेव्हां ध्रु०
उभारिला कर रागें, फुगली नासिकाहि फार
उत्तुंग स्तनयुगुल; तयाचीं शृंगें हीं चार १
रामानुज जरि लक्ष्मण परि तो अधिकचि मानानें
पदद्वयानें ताडन अनुचित कीं त्यायोगानें २
ह्मणुनि योजिलें वाक्ताडन तें तिनें निर्विवाद
पदद्वयासह धरितां जिव्हा, हेच तीन पाद ३
बुद्धिभेद होतांच तयानें मस्तक भडकोन
दुभंगलें जें; त्या अग्नीचीं शीर्षें तीं दोन ४

कर्ण, नेत्र, मुख, नासापुट या ज्या ज्या द्वारांनीं
क्रोधाग्नीची ज्वाला भडके श्वासोच्छ्वासांनीं— ५

युगुळ तयांचें षट्क, मुखासह गणना ती सात
रक्तवर्ण त्या क्रोधाग्नीचे सोष्ण हेच हात ६

शिर वेणीनें, कंचुकिनें तें हृदय तिचें शुद्ध,
कटिहि वल्कलें; अनलज्वाला अशी त्रिधा बद्ध ७

विकल्पमेषावरी तेधवां होउनि आरूढ
दग्ध कराया आली दीरा करुनी दिङ्मूढ ८

---

# मेघास—

[ अशोक वनांत शोक करीत बसलेल्या सीतेच्या अंगावर आकाशांतून चार थेंब पडले तोंच तिनें वर पाहिलें; घनश्याम रामाशीं तन्मय झालेल्या तिच्या दृष्टीला रामाकृति मेघ दिसला पण तो राम नसून मेघ आहे, असें कळूनहि ती म्हणते—]

**पद** ( चाल-माझा राम पाहि० ]

मेघा ! कां न म्हणूं तुज राम, श्याम तुझ्यासम जो धृ०

जन्म तुझाही रविवंशांत
निष्प्रभ करिसी तूं ही तात
होसी जनकाचा[1] जामात
करुनी घात इंद्र—धनुचा मे० १

---

१ जनक जो सूर्य तदंशभूत अग्निज्वाला—विद्युल्लता तिचा पति.

सोडुनि तूंही जन्मस्थान
हिंडसि भटकत रानोरान
करिसी वनासहि जनस्थान
जीवन प्राण सृष्टीचा मे० २
सुवर्ण मृग जो नक्षत्रांत
गुंतुनि तच्छरसंधानांत
तुझाहि झाला दिसतो घात
शून्य प्रांत हृदयाचा मे० ३
मुकतां प्रिय कांतेला कांत
तैसा करिसी तूं आकांत
विरहें दुःखद तुज एकांत
म्हणुनी पात अश्रूंचा मे० ४

---

## ‘ भांडवलशाही. ’

**चाल** ( भूपती खरें तें )

जी निसर्गांतली मूळ भांडवलशाही
ती संसर्गानें मानवांतही राही धृ०
संपूर्ण जलाचा, रत्नांचा, मोत्यांचा—
संग्राहक झाला सिंधु एकटा त्यांचा
‘तेजार्थ,’ ह्मणे तो तेजोराशि नभांत
‘पसरावा कुणिही माझ्या पुढतीं हात’
‘श्वासोच्छ्वासांनीं जीवमात्र जगवावे’
ह्मणतसे वायु, ‘हें माझ्याकडुनिच व्हावें’

चाल—'बहुमोल हिरे, बहुरंगी—माणिकें'
भू ह्मणे, 'रसांचीं तैशीं—तीं पिकें
मद्विना व्हाल यां साऱ्यां—पारखे'
हीं सारीं देती याच गोष्टिची ग्वाही
कीं निसर्गांतही पूर्ण भांडवलशाही १

पाहून असें हें, क्रांति कराया आले
पर वैभव घ्याया हरुनी तत्पर झाले
रवितेज हरोनी नक्षत्रांना द्याया
वाढता किती उत्साह पहा शशिराया
निर्दोष शोषुनी तेविं सिंधुचें पाणी
हा मेघांचा गण सरित्तडागां न्हाणी
चाल—वंश हे वनींचे श्वासा—कोंडुनी
जगविती जीव निश्वासा—सोडुनी
नियम हा पूर्वींचा ऐसा—मोडुनी
अग्निही त्यांसवें सिद्ध, उभारी संप
घडवितो अवर्षण, तसाच धरणीकंप २

त्यांतुनी वाढतो परस्परांतहि हेवा
वैषम्यें चाले स्पर्धा केव्हां केव्हां
ते सरित्तडागहि मेघावरती रुसती
'तुजवरिच आमुचें जीवन कां ?' हें पुसती
वृक्ष हे तटाकीं सरितांना पुसतात
'कां तुम्हावांचुनी व्हावा अमुचा घात ?'

चाल–' तेज हें असे का आम्हां–नेमकें ?
तुजपुढें पडावें आम्हीं–कां फिके ? '
उडुसंघ पुसे चंद्राला–सारखें
जरि यत्न चालला क्रांतिकारकांचाही
तरि पुन्हां जशीच्या तशी भांडवलशाही ! ३

---

## गगनास—

पद–( चाल माझा राम० )

गगना ! कां न ह्मणूं तुज सांब ?
अंबा सांग कुठे ? धृ०

विलसे स्वर्गंगा ती शिरीं
भालीं चंद्रकोर साजिरी
व्याघ्रांबर ते पाठीवरी
चिन्हें सारीं तारांची १

धूसुर विरल पसरले घन
तनुचें तेंच भस्म–लेपन
कंठीं वासुकिचें वेष्टन
शोभे चिन्ह सप्तऋषिचें २

अंबाविरहित पाहुनि तूंतें
सांब असे संबोधायातें
चित्तीं धरूनी संकोचातें
ह्मणती ज्ञाते 'शून्य' तुला ३

विद्युत्प्रभा न—दक्षिणभागीं
ज्वाला—त्या दक्षाच्या यागीं
कोपुनि अंबा तव अर्धांगीं
        घेते वेगीं त्यांत उडी    ४

परि तव पाहुनि शोभा—नारी
कविची शंका गेली सारी
नटसी सदाहि नानाकारी
        अर्धनारी नटेश्वरा !    ५

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि ...

## —३—

## जागृति.

[ चाल–उघडिं नयन. ]

ऊठ ऊठ जागृत हो त्वरित हिंदमाते !
ज्ञानरवी तव तनुवरि पसरि निजकरांतें
बहु अज्ञानांधकार
जाणुनि निद्रा सुखकर
तनुतलिं आलस्यांबर
अहंकार उशि त्यावर
पूर्व–ज्ञान–दिन विसरुनि घेसि गमत मातें
त्यजुनि 'धर्म' अलंकार
सोडुनि व्यवहार–सार
फेंकुनि निज नीति–पदर
पसरुनियां भिक्षा–कर
पांघरसी रूढिरूप शवसम वसनांतें
विप्रवर्ग वदनकमल
विमल परी दिसत समल
कुंकुम–वेदान्त विरल
घेउनि सुविचार–सुजल
वेद–दर्पणांत बघुनि शुद्ध करि तयातें
बलयुत तो क्षत्रियगण
बाहू तव सत्वहीन

त्यांस करी शक्तिमान्
धैर्य हेंचि तद्भूषण
धैर्य वरुनि कार्यदक्ष करिं निजहस्तांतें
वैश्य, शूद्र वर्णद्वय
आवरणीं लुप्तप्राय
जाणुनियां योग्यसमय
त्यांस करी चेतनमय
अचल ऊरुचरणां दे नूतन चलनातें
ज्यावरि तनु अवलंबित
चरण तेचि चलनरहित
त्यां करि स्वातंत्र्ययुक्त
होउनि अभिमानगलित
स्वमुखें प्रेमें उन्नत करि निज चरणांतें
'सर्वं खल्विदं ब्रह्म'
तव मनिंचें गुह्य परम
सर्व धर्मि तें अनुपम
अर्पण करि सोडुनि 'मम'
मग मोदें धारण करिं संताभरणांतें
ह्मणुनि ऊठ तूं झडकरि
'जागृतिचें' स्नान करी
भौतिक–पट नेसुनि परि
पूर्वालंकार वरीं
सुर–सुंदरि ! मिरव, हिणव विश्वसुंदरींतें

देसि न कां मजसि भांक
विस्मय किति मारुं हांक
दाखविं झणिं निजशशिमुख
सकल सुतां होइल सुख
घे तर उचलुनि कडे जननि बालकातें.

---

## उषा–रवि–विवाह.

दिंडी

ऊठ रसिका ! त्यज झोंप झणीं ताता !
जागृतीच्या स्नानास करी आतां.
काव्य–तिलकें करि भाल शोभिवंत
स्मरुनि चित्तीं प्रथमतां श्रीअनंत.

उषा––रविच्या सुखदायि विवाहाला
कविच होती कीं उपाध्याय त्याला
निसर्गाच्या अतिगूढ हृद्गताची––
अन्य लोकां जाणीव तरि कशाची ?

प्रभातानें सीमांत–पूजनाचा
विधिहि सारुनि घेतला प्रथम साचा
विवाहाची आतांच वेळ आली
पळ न घटिका चुकणार कदा कालीं
नभःपात्रीं तारका ठेविलेल्या
लग्नकालीं त्या पीतवर्ण झाल्या

प्रभातानें अक्षता करुनि त्यांच्या
दिल्या वांटुनियां करी प्रेक्षकांच्या
अरुण घेउनि येतसे वधुवरांतें
उभयतांवरि उधळूनि गुलालातें
कवि पुरोहित ह्मणतांच 'सावधान'
मंगलाष्टक ह्मणण्यास पडे वाण

वेदवेत्ता द्विज एकही न येथें
रीघ न मिळे जाण्यास लवहि जेथें
तुजसि रसिका ! हें गूढ कळे काय ?
शयनिं घोरति ना कारणाशिवाय.

मला रसिका ! कळलाच हेतु त्यांचा
तुजसि करितों मी विदित भाव त्याचा
धर्मबाह्या—कृति मुळिं न रुचे त्यांतें
म्हणुनि झाले ना साह्य विवाहातें

वधू आधीं वर असे जन्मलेला
धर्मशास्त्रीं क्रम असा मान्य केला
उलट येथें स्थिति असे विवाहाची
वरा आधीं जन्मली वधू साची

उषादेवीचा प्रथम जन्म झाला
तिच्यामागुनि जन्मास भानु आला
बघुनि ऐसें द्विज-वर्ग रुष्ट झाला
ह्मणुनि सत्याग्रह आज असा केला

निसर्गाला पर्वा न मुळिंच त्यांची
बघुनि कृति ही प्रतिकूल या द्विजांची
निसर्गाचे द्विज मंगलाष्टकांना–
ह्मणति, करुनी गर्जना, मोद त्यांना.

होतो सांग विवाह जेथ निवसे प्रेमामृताचा झरा
त्यांचें दिव्य चरित्र फोडित सदा पाषाणिंही पाझरा
नाहीं लौकिक; त्यां रुचे निरुपमा प्रेमान्विता सत्यता
दांपत्यास अशा जगत्पतिहि तो कूर्यात् सदा मंगलम्.

निसर्गाच्या द्विजगणें घोष केला
विवाहातें देऊनि मान्यतेला
अभाग्यांनीं या अशा वधुवरांशीं
काय द्यावा तरि गड्या ! सांग आशी

नम्रभावें जोडूनि उभय पाणी
निराशेची पसरुनी दीनवाणी
करूं प्रेमें प्रार्थना उभयतांना
मार्ग सुखकर हा दिसे उपकृतांना

'एक जागीं करुं नका मुळीं वास
भरत भूमीस्तव जगाचा प्रवास–
करुनि, आह्मां संदेश सुखद सांगा
त्वरित जेणें होईल देश जागा.'

पूर्व गोलार्धा आक्रमूनि वेगें
पश्चिमेच्या चालले सरळ मार्गें

उषा–दृष्टि स्त्री–वर्गी नित्य राही
पुरुष–वर्गा रवि परिक्षूनि पाही

करुनि यापरि हा जगाचा प्रवास
उभयतांही पातले स्वस्थलास
पहा उदयाचळिं पुन्हां सूर्य आला
भारताला संदेश सांगण्याला.

'पूर्व–पश्चिम–गोलार्ध पाहुनीयां
खिन्न झालें मच्चित्त भारतीया !
पश्चिमेचें मी भाग्य काय वानूं ?
विप्र अससी तूं राग नको मानूं ?

पश्चिमेच्या मागेंच पूर्व–देश
त्यांत भारतिं चैतन्य नसे लेश
आर्य त्यांतुनि चैतन्यहीन होती
विप्र त्यांतुनिया स्वस्थ झोंप घेती.

विवाहाचा संस्कार जो पवित्र
त्यास झाला द्विजवर्ग हा अपात्र
विषयलंपट होऊनि वधूसंगें
शयनिं घोरति हे, मुळिं न होति जागे

भारताचा उद्धार व्हावयातें
नसे जागृतिविण अन्यमार्ग यातें
जागृतिस्तव आलस्य लया नेतों
तुम्हां आशिर्वच निश्चयेंचि देतों.'

व. ति.

देती उषारवि पहा उपरोक्त भांक
विश्वासतां भरतभूस करील नाक
दावूं प्रयत्न करुनी विजयार्थ मात्र
सत्या ! असो नित तुझ्या करुणेस पात्र

---

## पोपटाची परवशता–

चाल–चंद्रकांत राजाची कन्या.

स्वतंत्रतेचा वनप्रदेशीं प्रवास ज्या पटतो
पारतंत्र्यपंजरीं पहुडला परवश पोपट तो
सुखसंवादा सीतापति जणु सांगे सौमित्रा
ऐका ऐका कथा शुकाची कवि कथितो मित्रा

स्वतंत्रतेच्या वातावरणें वैभवयुत जें का
वसंतादि ऋतु विवश जयाला अशा वनीं एका
विविध जातिचे, त्रिविध वृत्तिचे विहंग सुखलेशा
होते विहरत विश्वासानें वर्णित विश्वेशा

फणसादिक फळफळावळांचा फलाहार करिती
निर्झर झुळुझुळु वाहुनि त्यांची तृषा सदा हरिती
निसर्ग योगक्षेम निश्चयें चालवि नित्याचा
निष्कारण मग जीवनकलहा स्पर्श नसे त्यांचा

अशा प्रदेशीं शूर शिपाई शिरे शिकारीला
स्वार्थ स्वीकारुनी स्वयें जो आला स्वारीला

विराजती वनिं वसुधेवरती वृक्ष तशा वेली
वेलीवेलीमाजी विलसे एकेक हवेली

विहगांच्या चिमुकल्या हवेल्या विश्रांतिस्थान
स्थान पाहुनी स्थिर होउनि तो ठेवी प्रस्थान
काकशुकाकोकिलादिकांचा किलकिलाट कर्णी
पडतां, पाहे परतुनि पुनरुपि टक्शर आकर्णी

उदरंभरणा भिक्षा, बंदुक बाळगिल्या ठेवी
बंदुकीस भरपूर बहादुर बार भरुनि ठेवी
काक–कर्ण–कटु–तर रव केव्हां ऐकूं ये इकडे
कोकिलकृत कौतुकमय कोमल कूजित तें तिकडे

जिकडे तिकडे झाडें, झुडपें; चढे, उडे; उडती
झडप घालितां पडे; परि न त्या पक्षी सांपडती
नरास–छे ! त्या खरास खेदें खपलें हें नाहीं
खळबळ उडवी खरीच हृदयीं षड्रिपुसेनाही

खवळलाच खल खांद्यावरची बंदुक करिं घेई
खोपीमाजी खुपसुनि दुःखें पाखरांस देई.
खोप्या खालीं पाडतांच तीं पिलें पाखरांचीं
पडती; दडती; उडती, फडफड, धडपड इतरांची

कितीक अंडीं धोंड्यावरती ताडताड पडलीं
किति तडतडलीं, किति तडफडलीं, कितीक फडफडलीं
फडफडलेलीं, तडफडलेलीं सर्वेहि आवडलीं
पडलीं त्याच्या पदरीं झडकर जेव्हां सांपडलीं

उडते पक्षी झडती घेती पडत्या खोप्यांची
पापप्रबळें पडली दृष्टी त्यांवरि पाप्याची
नेत्रकटाक्षें नेम धरी तो नेणति त्या पक्षी
सूं सूं सणणण सुटली गोळी साच उलटपक्षीं

गोळि लागतां गोळा झाले तैं पंचप्राण
प्राणघातकी प्राणचि, करति प्राणी निष्प्राण
दश किंवा शत, सहस्र किंवा संख्या लक्षाची
पडति पिलांच्या प्रेतावरि तीं प्रेतें पक्षांचीं

धडपडतां धरणीवर वाहे रक्ताची धार
'प्राणी' पदवी ज्या पवनें तो तुटला आधार
पक्षांचीं हीं प्रेतें परि त्या पक्वानें गमलीं
आवश्यकता नच अन्नाची; असंख्य तीं जमलीं

दुसरे दिवशीं सुतदारेसह घरदारचि त्यानें
केलें तेथें सत्तेनें कीं सत्यासत्यानें ?
दर्शनमात्रें द्विजवर्गाचा प्रदेश तो हरिला
कळलें कविला कीं रसिकाला किंवा श्रीहरिला

शतकांचे कीं सहस्रकांचे ते वन–सहवासी
वाटत होतें त्यांना आपण तेथिल रहिवासी
परजातीच्या परचक्राची कल्पनाहि परि ती
स्वप्नीं नव्हती; सावधानता जागृति कशि वरिती ?

जीवघातकी जिवजंतुचें यजनकर्म करुनी
कंठित होते काळ कसा तरि करुणेशा स्मरुनी

स्वार्थासाठीं व्यर्थ परार्थी नव्हति अनर्थाची
दृष्टिहि त्यांची पदार्थमात्रावरि परमार्थाची

दिशादिशांना दृग्गोचर हो दैवी द्विजदेश
हृदयीं स्फुरती जगदीशाचे दिव्य सुसंदेश
ज्या मंत्रांनीं, सत्तंत्रांनीं चलित विश्वयंत्र
त्यांच्या साह्यें चाले यांची सत्ता अनियंत्र

सत्ता जातां वित्ता मुकती; शरणागत मत्ता
लत्ता बसता चित्ता चिंता; चळे बुद्धिमत्ता
विहंग वधितां विविध विशेषें वाक्पटु जे त्यांचें
मंजुस्वन माधुर्यें मोहिति मन त्या जेत्याचें

वधितां वधितां विवेक वाटे वारित त्या कालीं
क्रूराच्याही कल्पकतेला कोमलता आली
विहंगमातें वाचा फुटते; वचन वदे वाचें
"देवाचे द्विज परंतु झाले दासचि दैवाचे

प्रतापशूरा ! प्रणताची ही प्रणति असो तुजला
कृपाप्रसादें सांप्रत द्यावें प्राणदान मजला
दानामाजी श्रेष्ठ दान तें प्राणाचें दान
'दानशूर तूं' दाते वदतिल तुझेंच विंदान

देवें दिधली मला देणगी या द्विजदेहाची
तद्गुणगानीं क्षणभंगुरता गमते गेहाची
परि प्रथमचें प्रारब्धहि तें प्रतिकूलचि कालें
प्राणप्रिय त्या प्रभुपेक्षांही प्राण प्रिय झाले

देव तूंच तूं, दास तुझा मी दीनपणा वरितों
आजपासुनी आज्ञापालन आनंदें करितों"
खडतर भावी दुःख खरें, परि खग खदखद हंसला
खंबीरापरि उडुनि खलाच्या खांद्यावरि बसला

कविरायाच्या कपोलकल्पित काव्यकल्पनेची
कविमित्राला कक्षा कळली तत्कल्पकतेची
स्वतंत्रतेच्या वनप्रदेशीं प्रवास ज्या पटतो
पारतंत्र्य–पंजरीं पहुडला परवश पोपट तो.

---

## "जनसेवा ही ईश्वरसेवा–"

[ J. H. Leigh Hunt यांच्या Abu Ben Adhem
या कवितेचें रूपांतर ]

दिंडी.

शुक्लपक्षीं रात्रींस निजागारीं
दूर केली जैं स्वप्नदशा सारी
एक जागृत तैं महाभाग झाला
असो प्रेमानें धन्यवाद त्याला !

शशिज्योत्स्ना पसरली मंदिरांत
धरुनि हेमग्रंथास निज करांत
दिव्य तेजाचा देवदूत आला
बसुनि तेथें लागला लिहायाला.

बघुनि त्यातें, तो पुसे महाभाग—
'काय लिहिसी तें कृपें मला सांग'
वदे "लिहितों मी नाम त्या नराचें
प्रेम ज्याच्या मनिं असे ईश्वराचें"

महाभागें त्या प्रश्न पुन्हां केला—
'मीहि आहे का त्याच मालिकेला?"
प्रश्न ऐकुनि करि शोध दूत जेव्हां
सांपडेना तन्नाम कुठें तेव्हां.

दूत बोले तेधवां महाभागा—
"ग्रंथ सर्वहि शोधून पाहिला गा!
देवभक्तांच्या मालिकेंत कांहीं
मात्र अद्यापी नांव तुझें नाहीं"

दूत—वाणी परिसुनी महाभागें
हास्य केलें; तो नम्रपणें सांगे—
"नांव नसल्याचा खेद मला नाहीं
असे माझी परि तुला प्रार्थना ही—

'असे प्रेमी मी देशबांधवांचा
नसे प्रेमा जरि देवदेवतांचा
देश—भक्तांतरिं नांव तरी घालीं
देशभक्तींतचि ईशभक्ति आली"

बरें म्हणुनी तो दूत गुप्त झाला
पुन्हा रात्रीं परतुनी तिथें आला

ग्रंथ उघडुनि तेधवां प्रेमभावें
देवभक्तांचीं दाखवीत नांवें.
शेवटींचें वाचून नांव पाही
म्हणे " दूता! मन्नाम इथें नाहीं "

दूत ग्रंथाचा दावि अग्रभाग
तिथें पाही निज नाम महाभाग

---

## राष्ट्र-प्रेम.

चाल—हटातटानें पटा रंगवुनि.

अमेरिका प्रत्यक्ष भूवरी विराजते सुरपुरी
अन्य भू कोण साम्यता करी
कुठे सभाग्या अमेरिका ती; कुठे हिंदभू परी
कशाला श्रम तुलनेचे तरी
दिसे विसंगत, दृश्य उभयतां उषा, निशा अंबरीं
परि पहा भूमीद्वय त्यापरी
स्वातंत्र्यदेवता अमेरिका शोभते
हिंदभू तयास्तव अद्यापि हि झगडते
ती वैभवशिखरीं आनंदें नांदते
परी हिंदभू दारिद्र्याच्या क्षयरोगानें पुरी
चालली खंगत वरचेवरी
निश्चय केला, व्यर्थ कशाला श्रम तुलनेचे करूं
परी हें चित्त कसें आवरूं ?

कसें तरी मी हिंदभूमिचें अज्ञ मूढ लेंकरूं
म्हणुनि का वृथाभिमानें मरूं ?
मातृ–भक्त तो करी प्रतिज्ञा पुनः पुन्हा ती स्मरूं
'आपणचि आपणास उद्धरूं'
सत्यास पराङ्मुख होतां ही वैखरी
मग निरयाचा मी होइन वांटेकरी
आधींच बुडतसे शोकाच्या सागरीं–
सत्यवंचना होइल ऐसे विचार चित्तीं भरूं
तरी मग कवण उपायें तरूं ?
असो, अशा त्या अमेरिकेचें भाग्य अल्प वर्णितां
बोधकर हिंदभूमिच्या सुता
मातृभूमिचे शूरवीरसे पुत्र तिला लाभतां
वाढली तिची खरी योग्यता
राष्ट्रोद्धारा याविण आहे अन्य मार्ग कोणता ?
देइना साक्ष कुणी तत्त्वतां
राष्ट्रांत चेतना राष्ट्रभक्त आणितां
प्रेमाभिमानयुत विजयध्वज लावितां
तेव्हांच होतसे पूज्य 'राष्ट्रदेवता'
अमेरिकेच्या शूर सुतांचा रक्तबिंदु शोधितां
नाढळे तिच्या वांचुनी रिता
इतिहासाचें–प्रत्यक्षाचें प्रत्यंतर दावितां
येतसे सिद्धांता सत्यता
विद्यालयिंच्या विद्यार्थ्यांची अनुपम कृतकृत्यता
ऐकतां तनु करि रोमांचिता

१५०७०

प्रत्यंतर कीं प्रत्युत्तर तें अमेरिका दे स्वतां
प्रश्न जरि कुणिहि तिज विचारितां
त्या उद्बोधक वृत्तास ऐकतां क्षणीं
निजवृत्ति संकुचित सर्व लया जाउनी
राष्ट्रीय-भावना जागृत होते मनीं
सद्वृत्तचि तें प्रवृत्त करि मग मी तरि कां स्तब्धता
धरुनियां वाढवूं अतृप्तता
विद्यालयिंच्या विद्यार्थ्यांना अध्यापक निशिदिनीं
पाजवी 'स्वामृत-संजीवनी'
आनंदानें, उल्हासानें, प्रेमानें बाहुनी
प्रेरितो राष्ट्र-भावना मनीं
"ऐका भावी नागरिकांनो ! शिक्षण हें घेऊनी
जगा नच भारभूत होउनी
राष्ट्रीय भावना वेगें ऊर्जित करा
कसल्याहि संकटीं राष्ट्राला उद्धरा
शूर हो ! प्रसंगीं राष्ट्रापायीं मरा
राष्ट्रासाठीं जगा; नातरी मरा राष्ट्र-सेवनीं
शेवटीं उरा कीर्ति ठेवुनी
शिक्षण कीं चैतन्य उज्ज्वलित विद्यार्थी मिळविती
'विजयी' प्राप्त कर्मीं ह्मणविती
नानापरि सच्छास्त्राभ्यासीं तत्पर त्यांची मति
हिंद-विप्रास घमेंडी अति
प्रामाणिक वरि चतुर बुद्धिनें व्यापारीं वर्तती
हिंद-वैश्यांस प्रमादीं रति

राष्ट्रीय कर्म तें श्रेष्ठ; हीन जरि असे
त्या राष्ट्र-सेवका पर्वा त्याची नसे
अधिकार पावती शील अंतरीं जसें
हिंद-शूद्र-छे ! नको नको ती वर्णनिं तरि तद्गति
दिसतसे प्रत्यक्षचि ती स्थिति
विप्र, वैश्य, शूद्रांची कथिली अंतस्थिति वर्णुनी
राहिले क्षत्रिय परि त्यांतुनी
विप्र, वैश्य, वा शूद्र-कर्मिचें शौर्य, वीर्य जें मनीं
प्रसंगीं प्रकट होतसे जनीं
तेंच तयांचें क्षात्र-तेज; ते क्षत्रिय मग होउनी
वर्तती स्वराष्ट्र-संरक्षणीं
राष्ट्रीय भावना जेथें जागृत असे
गुणकर्म-विभागा तेथें वावचि नसे
राष्ट्रीय कर्म तें प्राप्तकर्म होतसे
राष्ट्र-भक्त ते वरिति गुणातें प्रसंग अवलोकुनी
अर्पिती देह राष्ट्र-सेवनीं
अशाच एका शूर मुलाचें वृत्त तिथें वर्तलें
कथानक त्यास्तव आरंभिलें
" शास्त्र-शोधना सजीव द्यावें शरीर कुणि आपुलें "
सहज तें विद्यालयिं समजलें
" अर्ज करा रे ! ज्यास अर्पिणें शरीर तें आपुलें "
गर्जुनी अध्यापक बोलले
ही विद्यार्थ्यांनीं ऐकुनियां गर्जना
बांधिली कमर झणिं विनति-पत्र-लेखना
" मद्देह प्रथमतां चिरा शास्त्र-शोधना "

शास्त्र—शोधका प्रत्येकानें विनति—पत्र धाडिलें
तयासी एकदांच पावलें
' अर्ज कुणाचा मान्य तरि करूं ' कोडें पडलें तया
मनीं उत्साह न मावे जया
त्यांतिल एका विद्यार्थ्यानें अर्ज मान्य व्हावया
युक्ति योजिली शेवटीं जया
' मान्य न झाला अर्ज अजुनि कां ' भीति मनीं धरुनियां—
'प्रतिज्ञा नातरि जाइल लया '
निज वामकरींच्या करांगुलिस कांपिलें
रक्तानें लिहिलें विनति—पत्र आपुलें
त्या शास्त्र—शोधका हर्षें जाउनि दिलें
अर्ज तयाचा मान्य जाहला; शरीर गेलें लया
म्हणावें ' क्षात्र ' ' विप्र ' कीं तया
हिंदभूमिच्या जित—पुत्रांनों ! आर्य—बंधुनों ! मनीं
सोडवा प्रश्न शांत होउनी
" विप्र, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या वर्णांच्यावांचुनी
टिकेना राष्ट्र " मान्य बुध जनीं
अभिमानानें तुम्ही सांगतां तत्त्व हेंच गर्जुनी
बोलतां तुम्हिच उलट खाउनी
" क्षत्रीय, वैश्य, कलियुगीं लुप्त जाहले
द्विज, शूद्रचि केवळ वर्णद्वय राहिलें "
मानितां उलट परि राष्ट्र सजिव आपुलें
राष्ट्र—भावना मरून गेली किति शतकांपासुनी
चाटितां काय वर्ण घेउनी ?

सुशिक्षितांनों ! राष्ट्र–भावना आधीं जागृत करा
मग निज राष्ट्र तुम्ही उद्धरा
‘ विप्र ’ क्षत्रिय ’ ‘ वैश्य ’ शूद्र ’ हा वर्णदंभ नच धरा
तूर्त त्यापासुनि दूरचि सरा
शिक्षक–पालक–संस्थाचालक–प्रबुद्ध नारीनरां
प्रार्थना मदीय जोडुनि करां
“ राष्ट्राचा पाया ‘ विद्यार्थी ’ जाणुनी
आदर्श म्हणुनि उपरोक्त वृत्त सांगुनी
राष्ट्रीय भावना प्रेरा त्यांच्या मनीं ”
उठा ! उठा ! तर विद्यार्थ्यांनों ! मनिं प्रतिज्ञा करा
ठेउनी साक्षी जगदीश्वरा

---

## केवढें आश्चर्य हें !

( वृत्त-गजल )

आमुचें सर्वस्व गेलें केवढें आश्चर्य हें !
जें न व्हावें तेंच झालें केवढें आश्चर्य हें ! धृ०

शास्त्र रक्षाया जयांनीं शस्त्र होतें घेतलें
आज ते निःशस्त्र झाले केवढें आश्चर्य हें ! १

आर्यधर्मी राहुनी अस्पृश्य होते अंत्यज
म्लेंच्छ होतां स्पृश्य झाले केवढें आश्चर्य हें ! २

कांपले पाहून आह्मां तेच आतां कापिती
दैत्य सारे देव झाले केवढें आश्चर्य हें ! ३

भक्तिच्या योगें जयां पाषाण मूर्ती बोलल्या
भक्त ते पाषाण झाले केवढें आश्चर्य हें ! ४
वेळ येतां मायभूमी बायकांनीं राखिली
वीर तेथें षंढ झाले केवढें आश्चर्य हें ! ५

---

## ऐसें जिणें कशाला ?

(वृत्त-गजल)

ना स्वाभिमान अंगीं ऐसें जिणें कशाला ?
प्रेतापरी जळो हें प्राणाविणें कशाला ? धृ०
स्वार्था ! खुशाल आतां थैमान घाल येथें
पापा ! तुझें फुकाचें आतां भिणें कशाला ? १
या शत्रुंनीं लुबाडा सर्वस्व आमुचें हें
शक्तिप्रयुक्ति साऱ्या ह्या योजिणें कशाला ? २
गेली स्वधर्मसत्ता, गेली समस्त मत्ता
आम्ही मनुष्य आहों हें सांगणें कशाला ? ३

---

## नशीबाचा खेळ !

( वृत्त-गजल-दादरा )

असें नशीबिं कसें भोग भोगणें आलें ! धृ०
न नीच ज्यांहुनिया अन्य कुणी शास्त्र वदे
पदोपदींहि तत्पदींच लोळणें आलें ! १

वरून वीज तसा भूमिकंप हा खालीं
मधेंच मात्र निराधार लोंबणें आलें ! २
रणांत गाजविलें शौर्य बळें त्यां आह्मां
बसूनिया घरांत हात चोळणें आलें ! ३
जयांस राज्य-दान होय सदा भूप-करें
तयांस याचकांस भीक मागणें आलें ! ४
'असा प्रसिद्धच इतिहास आमुचा होता'
असेंच केवळ लोकांस सांगणें आलें ! ५

## आतां कुठें ?

वृत्त ( गजल )

रक्षिण्या गोब्राम्हणा स्वाराज्य तें आतां कुठें ?
हिंदुनों ! प्रिय बन्धुनों ! साम्राज्य तें आतां कुठें ? धृ०
वीर पुत्रा जन्म देई वीर्यतेजें संयुत
वीरमाता ती जिजाई माउली आतां कुठें ? १
'मीं गुलामी भोगिली; स्वातंत्र्य पोरा ! भोग तूं'
बोध हा द्याया शहाजी तात तो आतां कुठें ? २
फांसुनीया राख अंगा स्वार्थ सारा सोडुनी
राष्ट्रधर्मा रक्षिती जे साधु ते आतां कुठें ? ३
'शास्त्र झालें मानवास्तव,' तत्त्व हें सांगावया
शास्त्रवेत्ते थोर गागाभट्ट ते आतां कुठें ? ४
'देह गेला जाउंद्या, स्वातंत्र्य देशा लाहुं द्या'
निश्चयी तो श्रेष्ठ तानाजी सखा आतां कुठें ? ५

अक्षराला पारखे शिवबास जीवासारखे
देह ज्यांनीं अर्पिले ते मावळे आतां कुठें ? ६

आर्य धर्माचा सदाचा होय कैवारी खरा
दुष्ट ज्यानें दंडिलें शिवभूप तो आतां कुठें ! ७

---

## भारत भूमाय !

पद ( चाल–रामभजन कर० )

कशि मोकलिते धाय आपुली ही भारत भूमाय धृ०
जिनें अर्पिला सकल जगाला मुक्तीचा सदुपाय
बद्ध होउनी दीनपणानें करूं लागली हाय १
कितीक शिकले जिच्यापासुनी शांतीचा स्वाध्याय
तमोगुणाच्या अतिरेकानें आज चिरडली जाय २
जमूं लागला हिंस्रपशूंचा सभोंवतीं समुदाय
सांपडली खाईत तयांच्या गरीब दुबळी गाय ३
स्तन पाजवुनी सबल बनवुनी निज भक्तांचा काय[1]
शिंगें फुटतां त्यांच्याकडुनी उलट हुंदड्या खाय ४
आज उद्यांची आशा धरुनी होऊनिया निरुपाय
जगन्नायका सदा प्रार्थिते त्वरित कराया न्याय ५

---

१ देह.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ........................ नि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ..............


# विटंबना !

पद ( चाल—सारंगि सा० )

ही विटंबना पाहून सारखा व्याकुळ होतो प्राण ध्रु०

कोण होतों कोण आहों
शोध याचा हाहि राहो
या जीवनार्थ कलहांत आमुची होते ओढाताण १

धीर जितुका शांततेला
ऊत तितुका संकटांला
अपमान साहुनी पदोपदीं ही खालीं होते मान २

मान ह्मणजे प्राण गेला
प्रेत तैसा देह ठेला
देवालय असुनी रम्य, दिसे देवाविण जेविं भयाण ३

काल होता आज नाहीं
मित्र जो तो शत्रु होई
कां आत्मरक्षणापुरतें ही नच उरले बुधहो ! त्राण ४

बांधवांचें सदन पेटे
'काय त्याचें मजसि' वाटे
जाईल कधीं ही आमच्यांतली आत्मघातकी घाण ५

काय चाटावें विचारां
जेथ शब्दां नाहिं थारा
आचार कराया भाग ठेवणें आधीं जीव गहाण

---

# नामदेवाचा निर्धार.

[ बाल भागवत नामदेवानें देवाला दूध पाजवतेवेळीं तो नैवेद्य स्वीकारीत नाहीं हें पाहून भाकलेली करुणा. ]

पद ( चाल-ये धांवत कृष्णा० )

कां गोरस हा गोपाला ! निज वदनाला
नच लाविसि या समयाला ध्रु०
बघुं नकोस मज मतिमंदा श्रीगोविंदा !
सांभाळ आपुल्या ब्रीदा
चाल— 'गोपाल' तुझें अभिधान[1]
गो तुला जीव कीं प्राण
तुजवांचुनि जी निस्त्राण[2]
चोरितां तिच्याच रसाला, अनय न झाला,
त्या प्रेमाला, नेलेंस कसें विलयाला ? १
गोकुळीं करवुनी स्वजनां या रसपानां
केलेंस तुष्ट गोपानां
चाल—गोवत्स होउनी तृप्त
उर्वरीत[3] दुग्ध न गुप्त
ज्या भूमातेला प्राप्त
तिजवरती गोरक्ताला, पूरचि आला,
ह्मणुनी झाला, का खेद सदयहृदयाला २
बालकें तीन वर्षांचीं मृत्युमुखाचीं
जाहलीं भक्ष्य नित्याचीं

---

१ नांव २ निराधार ३ उरलेलें

चाल—जीवनाहि[1] पुरतें त्यांना
गायीचें दूध मिळेना
त्यायोगें त्यजिती प्राणा
पाहुनि मरणोन्मुख बाळां, सुख व्हायाला,
कथिसी मजला, कीं 'पाजिव याच पयाला'[2] ३
तुज अल्प अर्पितां देवा करुनी सेवा
मग मिळेल अगणित मेवा
चाल—तव कृपाकटाक्षें आह्मां
सुख [3]संतत मेघश्यामा
ह्मणुनी करि पूरितें कामा
जरि वंचिसि[6] दीनदयाला ! समज मनाला,
अर्पण झाला हा देह तुझ्या पायाला ४

## धेनुजागृति !

[ दिल्लींत महाराष्ट्रीय भागवत धर्मीय मंडळी गेली असतां नामदेवाच्या कीर्तनांत राजानें गायीचा वध केला; व ती गाय जिवंत करण्यास सांगितलें. त्यावेळीं नामदेवानें गायीला केलेली विनवणी ऐकून गोमाता जागृत झाली, तो धांवा. ]

पद ( चाल–पाळणा )

जागृत हो आतां अमृतयुते ! ऊठ ऊठ गोमाते ! जा० धृ०
निज रस पाजवि गे ! वत्सांतें तृप्त करीं क्षुधितांतें
जीवन सर्वांचें तूं असती मग निष्ठुर कां होसी ?
तुजविण विप्रांचें कर्म अडे, क्षत्रिय बल नच वाढे

१ जिवंत राहण्यापुरतेंहि. २ दुधाला. ३ नेहमीं. ४ पूर्ण. ५ इच्छेला. ६ उपेक्षिसी.

त्यापरि कृषिकर्म वैश्यांचें क्षणहि न चालायाचें
बाळें बाळपणीं स्वप्राण त्यजिती तुजवांचून
ऐसें असतां कां दीनपणें रुचलें तुजला निजणें?
अस्ताव्यस्त तुझी तनु झाली भोंवतिं पसरे लाली
धारा लोपुनिया दुग्धाच्या चिळकांड्या रक्ताच्या
उडती तिजमधुनी नराधमां गोचिंडे[1] समजुनि आह्मां
स्मरण करी चित्तीं यमुनेचें दु:सह त्या समयाचें
डोहीं शिरतांच सर्पाचें विष करि हरण असूंचें
झालिस निष्प्राण ज्याकालीं करुणा देवा आली
मुरली वाजविली कृष्णानें मुरली मनोहरानें
निर्भय जीवन तें तुज दिधलें संकट विलया नेलें
त्यापरि या समयीं वाजवुनी वेणू मंजुल गानीं
तुजला बाहतसे गोपाल ऊठ ऊठ तत्काल जा० १

---

## सीतेचा निरोप.

### पद ( चाल—वीर अभिमन्यु )

[ रामलक्ष्मणांच्या पश्चात् रावणानें हरण करून नेतांना सीतेनें केलेला विलाप. ]

चोरिली **सी**ता नेली कपटानें
पातकी दुष्ट **रा**वणानें
भेटतां आधीं माझ्या **र**घुनाथा
सत्वरी कळवा ही वार्ता चो० धृ०

---

१ वासराला दूध व गोचिंडाला रक्त.

वनदेवींनों ! आहांतच साक्ष
धरा ग ! न्यायाचा पक्ष
निरविली तुमच्या पदरीं ही दुहिता
तिचा अभिमान धरा आतां भे० १
गौतमी गंगे ! थांब जरा बाई !
करुं नको जाण्याची घाई !
धीर मी देत्यें लंकेला जातां
सागरा तुझ्या वियोगार्ता भे० २
तरुलतिकांनों उघडा सुमनयनां
पहा या जानकिची दैना
नका ग ! हिणवूं रागावूं आतां
भंगिलें तुमच्या एकांता भे० ३
चंचला भृंगा ! न करि बुद्धिभेद
"प्रियेस्तव कां करिसी खेद ?
कितीतरि नलिनी मिळतिल तुज कांता
लाडकी काय एक सीता ?" भे० ४
चतुर पथिकांनों ! खगमृगहो ! धांवा
क्षणाचा विलंब नच लावा
भराऱ्या मारा शोधा भगवंता
जनस्थानांत वनप्रांता भे० ५
अगा ! वनराजा ! घे घे उड्डाण
गुंतले जेथे मत्प्राण
आवरुनि शोक प्रेरी बलवंता
कराया शत्रूच्या घाता भे० ६

---

# गोवर्धनोद्धरण.

गीति

ॐकारा प्रणवेशा मायावेषा ! अचिंत्य अविनाशा !
मतिचालक परमेशा ! सदय रमेशा ! अमंगल–विनाशा !

गिरिजावर शिवशंकर झाला रत ज्या अखंड तव नामीं
तें रामनाम घेउनि करितों आरंभ अल्प कवना मी

रिझवाया स्वजनांतें जासि वनातें त्यजूनि निजसद्मा
उद्धरिलें त्यां भक्तां, झाले जे नत अनन्य पद-पद्मा

धनपति कुबेर सेवक, सिंधुसुता त्यापरी तुझी दासी
वर्णूं कसा शके मी ? पार तुझा लागला न वेदांसी

रंजविती तुज जेथें काव्यमिषें 'वाल्मिकी' सह 'व्यास'
तेथें रमवाया तुज काय धरावा मनांत हव्यास ?

वंचुं नको मज आतां पतित जरी मी असे जगन्नाथा !
त्वद्बीद 'पतितपावन,' पावन करिं सत्वरी मज अनाथा

देईं अभय दयाळा ! करितों मी प्रार्थना तुला भावें
सर्व सुखाचें आगर टाकुनि तुज, अन्य काय वांच्छावें ?

धिक्कार असो आह्मां संकट-समयींच तुजसि आठवितों
असतां सुखी कृपेनें, तुज सोडुनि विषय हृदयिं सांठवितों

जेव्हां जेव्हां आलें संकट, होतां त्वदीय विस्मरण
केलें त्यांच निवारण करवुनि आह्मां पदांबुज-स्मरण

पडतो विसर पदोपदिं आह्मां तव परम सुखद चरणाचा
तेणें न चुके फेरा दुःखद संसार-जनन-मरणाचा

अतुल प्रताप पाहुनि वाटे क्षणभरि मनांत आस्तिकता
परि बहु वृथाभिमानें वाढे घातुक पुनश्च नास्तिकता
नेणुनि अगाध महिमा विसरुनियां सतत तुजसि भो! गाया
दंभें तत्पर होतों आपण होऊन दुःख भोगाया.

तुजविण रक्षण-कर्ता अन्य असे कोण सांगणें देवा!
वात्सल्य निजसुताचें पुसणें जाऊनि **नंद-वसुदेवां**

उत्पादक तूं असती स्थिति-लय-कर्ता तसाचि विश्वासी
श्रद्धा न बसे, कारण आम्ही ना साच आत्मविश्वासी
बहुजनसमाज होई अंधश्रद्धेंत चूर हट्टानें
ज्ञानप्रकाश सोज्ज्वल दाविति जरि साधुसंत नेटानें
सत्त्व तुझें सद्रूपा! दंभें कालेंद्र घ्यावया सजला
आपज्जल–वृष्टीनें घात कराया मनामधें धजला
**गो**कुल **भा**रतभूमी होतें विख्यात जें महा राष्ट्र
'**गो**वर्धन' गिरि तेथिल आहे हा आमुचा '**म**हाराष्ट्र'
काय कथूं वाचेनें विदित तुला भाग्य आर्यभूमीचें
हेवा करिती स्वमनीं नित्य जिचा देव दिव्यधामींचे–
"ही धन्य धन्य भूमी सात्त्विक बहु लोक सर्व येथींचें
भगवन्नाम–सुधारस–पानें जे असति धाम शांतीचें
मधुर–श्रुति–वाक्यांनीं आम्हीं स्वज्ञान–दीप मालविला
नरदेह पावुनीही स्वर्गेच्छेनें वृथाच घालविला
वाक्यें निषेधपर जीं लावुनि त्यांतें प्रवृत्तिचा बंध
आपण होउनि झालों सच्चिद्घन–दर्शनाप्रती अंध

करुनी व्रत, तप, दानें, दुष्करसे यज्ञ तेविं योगांसी
झालों आतुर किति तरि नश्वरशा स्वर्ग–सौख्य–भोगासी
इतुकें करुनी आम्हीं केला पुरुषार्थ कोणता नाकीं
धि:कार असो आह्मां! प्रभुपद तें क्षणहि आठवेना कीं,
येथें दशेंद्रियांसीं मुक्त दशदिशा यथेच्छ संचारा
होतां विन्मुख हरिसी, कोण पुसे दुर्विचारसुविचारा?
'रति–सुख–' 'धर्म,' 'अशांती–' 'नीती' ही येथ वाटतें आह्मां
रंभोर्वशिच्या स्मरणीं आठवितो कोण भक्त–विश्रामा?
हस्तस्पर्शाभावीं चरणद्वय अप्सरांवरी रुसती
लत्ता मारायातें अभिमानें सज्ज जाहले दिसती
सद्दर्शनास जाया उत्कंठित पद कदापि परि नसती
दुर्भाग्य आमुचें कीं हरिसह ते संत भूवरी वसती
सोडुनि भगवंतार्चन करयुग आलिंगनापुढें सरती
हरि–गुण–रहित मुखीं ये रंभा–गुण–वर्णनाप्रती भरती
वाटे वृथाच दिधलें ज्ञानेंद्रिय पंचकास उपनामा
आनानींच बहिर्मुख रमती सोडूनि ईश सुखधामा
सोडुनि चिन्मय मूर्तिस बघती देवांगनास नेत्र सदा
तन्मधुगान परिसतां रुचते श्रवणास हरिकथा न कदा
नामामृतास विटुनी मन रंभाऽधर–रसास लोलुप तें
रंभोच्छ्वासापुढती तुलसी–गंधा महत्व ना येतें
ऐसी स्थिति मग होई स्मरण हरीचें कशास आह्मासी
नित चित्त–वृत्ति रमली मद, मत्सर, कोप, मोह, कामासी

जरि कल्प आयु असलें तरि न पुनर्जन्म येथ टळतो कीं
क्षण जरि पावे नरतनु तरि सुविचारें टळेंचि भूलोकीं

ही नरतनु नच जेथें हरिभक्तजनार्चना नसे थारा
जरि विधि–लोकहि असला तरि बुधहो ! त्या स्थलास धिक्कारा''

ऐशा पश्चात्तापें धिक्कारुनि थोर 'देवलोकासी'
वंदिति सुर सद्भावें निजचित्तीं याच 'मर्त्य लोकासी'

त्यांतिल ही भारतभू प्राणाहुनि आवडे प्रभो ! तुजला
संत–श्रेणी येथिल नित्य अशी साक्ष देतसे मजला

त्या भारत–गोकुलिंची जाय यशःश्री लयाप्रती सारी
आली वेळ कठिण ही त्राता तुजविण कुणी न कंसारी !

गो–ब्राह्मण–कैवारी गोप तुझे भारतीय हे लोक
मुकले सर्वस्वासी इह, पर ना एकही मिळे लोक

कालेंद्राच्या कोपें झाला वर्षाव आपदापाचा
सच्चिद्घना मुकुंदा ! मोबदला सांग कोण पापाचा?

भारत–कल्याणास्तव 'गोवर्धन' उचलिला कसा देवा ?
'छत्रपती–शिव–कालीं;' लाजविलें स्वर्गलोकिंच्या देवा ?

परि आम्हीं मूर्खांनीं धरिला अभिमान आपला स्वमनीं
कीं 'आम्हींच उचलिला गोवर्धन आपल्याच हस्तांनीं

हस्तांगुलिनें केला स्पर्श त्वां त्यांत काय थोरपणा ?
ठकविसि, ठकूं परि न रे ! संशय तरि तूंच लाव थोर पणा.

---

[1] महाराष्ट्र ( गीति १७ वी पहा ).

धरितां गर्व असा हा तेणें आला तुझ्या मनीं राग
केली दूर करांगुलि, लोपविला तत्क्षणींच अनुराग
झाला अनर्थ मग जो वर्णुं शकेना तयास मी वाचें
या संकटकालीं हा कैशापरि जीव आमचा वांचे ?

मोठा प्रमाद घडला त्याची जाणीव मानसीं झाली
धांव मुकुंदा ! आतां सत्वरि करुणाच पाहिजे केली
नातरि 'गोवर्धन' हा नाशिल या भारतीय गोपांसी
लाव करांगुलि कृष्णा ! श्रीगोपाला त्यजूनि कोपासी

करितों प्रयत्न बहु परि दुर्धर संकट मुळीं टळेना कीं
पूर्वज ऋषिवर सारे हंसतिल ? रडतील ? ना कळे नाकीं
पाहुनि मूर्खपणासी अंतरिं येईल कीं हंसूं त्यांसी
होईल दुःख अथवा दुःसह पाहूनि पारिपत्यासी
दांभिकपणेंचि सांगूं 'निज पूर्वज ते' ह्मणून लोकांला
परि ते ऋषिवर ह्मणतिल, 'नको नको हा कलंक आह्मांला'
'श्रेष्ठपणें बुडवावें वडिलांचें नांव' तें कुठें गेलें ?
परि मूर्खत्वें भालीं स्वकुलास कलंक लावणें आलें

यास्तव पाव दयाळा ! लाव करांगुलि जवें जगन्नाथा !
अभिमानगलित होऊनि भक्तीनें ठेवितों पदीं माथा

हे भारत बंधूनों ! **गो**वर्धनपर्वतोद्धराख्यांनीं—
भरला बोध, तयासी सुज्ञपणें सर्वदा धरा ध्यानीं
देशोद्धारासाठीं कराल जो जो तुम्ही पुढें यत्न
त्या त्या समयीं ठेवा निज चित्तीं बोधरूप हें रत्न

'संदेश[1]' न विसरावा कदापिहि 'समर्थ रामदासाचा'
अल्पहि होऊं द्यावा हृदयासी स्पर्श तो न दंभाचा

जो जो कल्याणाचा मार्ग तुह्मी आक्रमाल सत्याचा
कर्तव्यीं रत व्हा हो श्रीहरिवरि भार घालुनी त्याचा

दाता संकल्पाचा पूर्ण कराया समर्थ तो आहे
नाम प्रभुचें सुखकर, कल्याणाचें निधान तें पाहे

हृदयाकाशीं आले संशय--घन जे तयांस वारा हो!
मग येईल यशःश्री गुप्त जरी ती दिंगतिंही राहो

'गोवर्धनोद्धरण' हें बोधप्रद आपणां सदा होवो !
या प्रभु--लीला साह्यें सत्कार्यीं यश पदोपदीं येवो !

देवो ईश दयाघन सर्वांसी शांति--तुष्टि--पुष्टीसी
वीरांनीं भारतिंच्या सोडावें लाजवूनि सृष्टीसी

दाता स्वात्मपदाचा श्रीहरि अभिमान आमचा वाहो !
सच्चिद्धन प्रभूची भारतियांवरि कृपा सदा राहो !

---

१. काम आहे चळवळीचें! जो करील तयाचें! परि तेथें भगवंताचें! अधिष्ठान पाहिजे.

# सिंहगड.

( चाल–चंद्रकांत० )

पुण्याईनें भाग्य खरोखर अजि उदया आलें
पवित्र ऐशा सिंहगडाचें दर्शन मज झालें.

पायथ्यास मी उभा राहुनी केली वर दृष्टि
करीत होते गिरिराजावर मेघ वारि-वृष्टि

उंची पाहुनि मज दुबळ्याचें धैर्य खचुनि गेलें
कसें तरी मग घट्ट आपुलें मन तेव्हां केलें

त्रिशंकूस लाभलीं न पूर्वीं, भूमी वा स्वर्ग
साशंकित मी क्रमूं लागलों म्हणुनि हळूं मार्ग

चढतां चढतां प्रांत गांठिला शेवटिं माथ्याचा
दृष्टिपुढें मग उभा राहिला इतिहासहि त्याचा

त्या इतिहासें अंगावरती आले तैं कांटे
त्याच काळचे आपण ऐसें मनामधें वाटे

सिंहापरि निज पराक्रमें जो स्वराज्यार्थ मेला
तानाजीच्या समाधीस त्या प्रणाम तैं केला

त्यापुढतीं मग शेलाराभिध मामाचा हात—
पाहुनि त्यातें नम्रपणानें केला प्रणिपात

पडक्या भिंती पाहुनि आलें डोळ्याला पाणी
बाणी जातां आटुनि गेलें अंगांतिल पाणी

वरचेवर ती वाढुं लागली मेघाची वृष्टि
सृष्टि जाहली जलमय, न बघे अन्य वस्तु दृष्टि

सिंहगडाचें दर्शन ह्मणजे विषयाचि मोदाचा
तसाच आहे परंतु उलटा जनकहि खेदाचा
स्मारक आहे स्वातंत्र्याचें यास्तव आनंद
'काय तयाचें होय आपणा' म्हणुनि गमे खेद

हर्ष–खेद हे विलया न्याया मेघ सिद्ध झाले
निज वृष्टीनें निराश मजला करावया आले

कष्टी होउनि केली तेव्हां मेघासी पृच्छा!
विघ्न आणुनी विषण्ण करिसी, काय तुझी इच्छा ?

साशंकित मीं होउनि केले प्रश्न तदा त्याला
सार तयाचें विषयत्त झाला प्रस्तुत काव्याला

* * *

" नरसिंहाच्या प्रेताचेंही दर्शन घ्यायातें
पाप्याच्या पितरास पात्रता सांग कशी येते ?"

यास्तव करिसी काय वारिदा ! वृष्टीनें विघ्न
बघूं न देसी समाधिरूपें कलिचा शत्रुघ्न

"मनीं आमुच्या शौर्य तयाचें नाहीं ठसणार
इतिहासाचें वैभव आह्मां नाहीं दिसणार"

स्वातंत्र्याचें बीज जळालें, उरलें नच नांव
अंकुर त्या येईल ह्मणुनि का करिसी वर्षाव ?

परस्पर द्वेषाचा वणवा गेला भडकून
त्या विझवाया वृष्टि जलाची करिसी सडकून ?

गोविप्र–प्रतिपालन करितां पडे देह ज्याचा
त्यावरि का अभिषेक जलाचा करिसी नित्याचा ?
स्वार्थाच्या धूलीनें भरला पथ स्वराज्याचा
शुद्ध करावा हाच हेतु का तव वर्षावाचा ?

वंशजास पाहून जाहले मनिं पूर्वज कष्टी
दुःखें करिती काय तेच ही अश्रूंची वृष्टि ?
गोरक्ताचा चुकून पडला एखादा बिंदु
धुऊन नेसी काय तयाला दावाया सिंधु ?

युगायुगाच्या ठायीं घेतो देवहि अवतार
परि भूमीला कष्ट लागती भोगावें फार
धेनूचें ती रूप घेउनी क्षीरसागराला—
जाते तेव्हां येते कोठें दया ईश्वराला !

देवाला अवतार घ्यावया धेनु एक लागे
परि सांप्रत ती राहिल ऐसें कोण तरी सांगे ?
ह्मणूनि का तो बिंदु वाहुनी सिंधूला नेसी ?
अवताराची स्मृति त्यारूपें देवाला देसी ?

असेल ऐसा हेतु तुझा तरि तसेंच होऊं दे
मौजेनें हें दृश्य पाहणें असेंच राहूं दे
येणें देवा अवताराची होऊं दे स्फूर्ति
पुन्हा शिवाजी–तानाजीच्या पाहूंदे मूर्ति

तसाच मी परतून उतरलों तदा गडाखालीं
मेघ तरी होईल काय हो ! दीनांचा वाली ?

---

# कृतज्ञतेचे अश्रु !

[ जनतात्मवासी लो. टिळकांच्या निधनप्रसंगींचें कृतज्ञतापूर्वक अश्रुसिंचन. ]

[ मालिनी. ]

नर–तनु मुळिं आहे नश्वरा मृत्यु–लोकीं
अमर सतत आत्मा, ज्ञानवेत्ता विलोकी

परि सुख, बहु दुःख प्राणयोगें–वियोगें
सहज अनुभवा ये जन्म–मृत्यु–प्रसंगें

किति तरि जन आले आणि गेले फुकाचे
कधिं नच कुणि घेई नाम त्या आणिकांचें

परि 'टिळकचि' आला 'बाळ गंगाधराचा'
खचित तिलक झाला आपल्या मातृ–भूचा

सकलहि वय ज्याचें देश–सेवेंत गेलें
व्रत निज मनिंचे तें शेवटा पूर्ण नेलें

नच समय विशेषीं कष्ट कारागृहाचें—
सहज सहन व्हाया कांचलें चित्त त्याचें

खचितचि परकीयां नित्य ज्याचा दरारा
हलवुनि निज देशीं सोडिला लोक सारा

जनहित–करणीं त्या 'लोकमान्यत्व' आलें
कृतियुत हितकर्त्या नाम तें सार्थ झालें

स्वजन शिथिल झालें 'कर्मसंन्यास' योगें
भरत–तरुण–वंशा जागवी कर्म–योगें

धृतियुत कृति ज्याची निश्चयीं मेरु झाला
परि लव करुणा ती केविं येईल काला
अदय–हृदय–कालें रत्न चोरून नेलें
सकल तरुण लोकां आश्रयें हीन केलें

जवळ समय हेतू पूर्ण व्हायास येतां
गमन करि महात्मा हिंददेशीय–नेता
हतबल निजदेशा व्हावया बंधमुक्त
अनुदिनिं झटला जो होउनी कर्म–युक्त

हर! हर! अजि गेला तोच सोडूनी लोक
अतुल पसरलासे भारतीं थोर शोक
तनु, मन, धन त्यातें अर्पिलें ज्या जनांनीं
कठिण समय कैसा पाहिला आज त्यांनीं

परिसुनि कटु वार्ता पावलें चित्त भंग
त्यजित सुख तयांना, दुःख झालें अभंग
स्वचरित–अनुसारें ठेविला दिव्य–पाठ
गिरवुनि ठसवीतां तोच राखील पाठ

उमजुनि कृति आतां दुःख हें आवरावें
कठिण समय येतां तच्चरित्रा स्मरावें
जय सदय रमेशा! पावना लोकनाथा?
तव चरण–सरोजीं ठेवितों नम्र माथा

तव सकरुण दृष्टी देविदासीं वळावी
सुखकर टिळकांच्या शांति आत्म्यास द्यावी.

# साशंकित शारदा.

[ श्री संतकवि **दासगणूंचे** शिष्य श्री. **दामोदर वामन** आठवले यांच्या चिरवियोगाच्या प्रसंगीं **दासगणूंना** पाठवलेली विनयपत्रिका. ]

( गीति-वृत्त )

भूवैकुंठीं ठेवुनि नश्वरसा मर्त्य मानवी-काय
कालें ओढुनि नेलें **दामूअण्णास** शेवटीं काय ?
गेले दामूअण्णा नच, तुमचा पुत्र पोटचा गेला
केला भग्न मनोरथ, कर उजवा तोडुनी तयें केला
स्वरमाधुर्य-गुणास्तव दैन्यांतुनि जो समूळ काढविला
त्यजिला तुम्हीं प्रपंचहि परि उलटा तत्प्रपंच वाढविला
झाले कष्ट तुह्मा जे, ते सारे तन्मुखें मला कळलें
त्याचेंहि चित्त तिळभर तुमच्या पदसेवनांत ना चळलें
श्रीहरिकीर्तनरंगीं अनुपम तुमचीच पाहिली जोडी
परि आपुल्या स्वभावें अदयपणें काळ हा तिला तोडी
प्रेमळ, निरुपम, सुखकर, निश्रेयस्करहि एक अंगाला
आतां मुकणार दिसे जनता तुमच्या कथाप्रसंगाला
शतशां व्याख्यानांनीं जो का परिणाम अल्पसा न घडे
एकाच कीर्तनानें तुमच्या होतो, मला दिसे उघडें
करती रसिक सुहृज्जन कौतुक मम अल्प काव्य पाहून
कारण अन्य नसे त्या, तुमच्या प्रिय काव्यकीर्तनाहून
परि मत्कृति जलकणिका युष्मत्काव्योदधींतली खचित
मीं प्रार्थना करावी नम्रपणें, हें असें मला उचित
द्वारांत मंदिराच्या बसुनि यथामति जिच्या पदा सेवीं
साशंकिता दिसे ती आज **महाराष्ट्र**-शारदादेवी

होउनि अनन्य पुसतां हेतु तिनें जो निवेदिला मजला
तो याचना–स्वरूपें कळवाया नम्र दास हा सजला
"माझी निवासभूमी संतकवींनींच शोभली सारी
माझ्या सेवेपुढतीं ज्यांना सुख वाटलें न संसारीं
मागें महीपतीनें गाजविला संत–कीर्तिचा डंका
वाङ्मय–तप त्यापरिचें कोण करिल हीच वाटली शंका
ऐशा खरतर कालीं कारण झालें असे महत्वाचें
जड संस्कृतिच्या पुढतीं उरलें नच नांव आत्मतत्त्वाचें
सांप्रत मजभोंवतिं ही माझी जी भक्तमंडळी जमली
शृंगाररसीं ह्यांची वाणीसह वृत्ति सर्वदा रमली
मन्मंदिर जें होतें गजबजलें थोर थोर संतांनीं
गेलें भरूनि आतां प्रेमाच्या वैषयीक गीतांनीं
श्रीसाईबाबांच्या योगानें योग हा असा जुटला
मनिं आशेचा अंकुर उत्तेजन–वारि–सिंचनें फुटला
सीनातटीं गणूनें लावणिची लावणी स्वयें केली
फंदी किंवा जोशी जणुं यांनीं मांडिली पुन्हां केली
त्यांनीं संतचरित्रें दासगणूकडुनि नित्य गावविलीं
प्रतिकृति महीपतींची जड संस्कृतिच्या युगांत दाखविली
परि कोसळला त्यावरि सांप्रत जो का प्रसंग दुर्धरसा
तो अग्नितुल्य घेइल वाटे शोषून काय काव्यरसा ?
कवितालतिका त्याची एकाएकीं अशी जरी सुकली
तरि मात्र वृत्ति माझी पुढतीं सच्चरितसंग्रहा मुकली"

यापरि सरस्वतीचें झालें साशंक चित्त कविराया !
कोण तुह्माविण सांगा या शंकेतें दुजें निवाराया
प्रल्हाद तालधारी, रमती हरि–कीर्तनीं शुकाचार्य
प्रल्हाद तुह्मा मुकला झालां जरि कां असाल गतधैर्य–
गेला तरि जाऊं द्या–न ह्मणे मी–हरिकथेंतला रंग
तदभावीं नच होइल परि तितुका शारदा–मनो–भंग
त्यागाल जरि चिपोळ्या वाम करांतिल तरी त्यजा, मात्र
सव्य करीं राहूं द्या काव्यास्तव लेखणी अहोरात्र
न ह्मणा, 'लेखक नाहीं ह्मणुनी ही लेखणी बसे स्तब्ध'
प्रक्षुब्ध करितसां कां कवितादेवी तुम्हावरी लुब्ध
लेखक निज भाग्यें गुरु–काव्य–विलेखनिं समर्पिती काय
परि कवि–काव्यें असतीं अवलंबुनि लेखकावरी काय ?
ज्ञानेश्वरी लिहाया होता जरि शिष्य सच्चिदानंद
'अमृतानुभव'–विलेखन तदभावीं काय जाहलें बंद ?
वेडें पोर ह्मणा मज परि माझा शब्द हा नका मोडूं !
सेवा सरस्वतीची कांहीं झालें तरी नका सोडूं !

---

## गडकरी.

[ गीति ]

केशवसुत शिवतुल्यचि तानाजी सिंह, तेवि गड करिसा
करि साम्य कोण यांशीं गडकरि हा एक होय गडकरिसा
विद्याप्रेम जयातें तदधिक जरि 'घे' ह्मणे 'स्वपद' कमला
पदकमलास वदे "दे सरस्वति ! तुझें कृपाख्यपदक मला"

पदवी कवीस द्यावी कीं हा कवि ईश शब्द–सृष्टीचा
दृष्टीं चातक भासे, परि गडकरि जलद सरस वृष्टीचा
विधि–हरि–हरसम लेखक–कवि–नाटककार एकचि गुणांत
त्रिगुणात्मक दत्तापरि परि गडकरि निपुण त्या त्रय गुणांत
श्रीपादकृष्ण गुरुतें अर्जुनसा शिष्य शोभतो राम
तोरा मनिं मिरविति जे इतर, नसे तद्विनोदिं तो राम

---

# आधुनिक काळ व कवि.

[ शा. वि. ]

आहे हा अनुकूल काल कविला विख्यात व्हाया जनीं
राहो नीरस काव्य वा सरस तें वेडें तसें वाकडें
ओळी चार, तशांत फार चवदा झाल्या जरी मोजुनी
द्याव्या धाडुनि त्या कुणा न कळतां संपादकाच्याकडे
त्यामाजी परि गोम एक उरली सांगावयाची खरी
योग्यायोग्य कुणीहि पाहुनि तया काव्या कसा लाविना
आहे ही अनुभूत थोर कविची विख्यातशी वैखरी
साहित्यांतहि अल्प डाळ न शिजे कोठें वशील्या विना
होतां मुद्रित काव्य केवळ पहा नांवामुळें वाचक
घेई त्यावरती उडी, व्यय तसा मोदें धनाचा करी
टीकाकारहि त्यांत कीर्ति कविची पाहूनियां जाचक
व्यक्ति–द्वेष करावयास पुरता टीकास्त्र घेतो करीं

* * *

साहित्यांतहि मान सात्विक गुणा, बागेंत मोरा जसा
सारा जाउनियां लया परि मिळूं लागे तमोराजसा.

---

# आर्या सती.

( स्त्री–गीत )

**पद** ( चाल–प्रशांत किति या० )

कथा वघूं संप्रति
कशि असते आर्या सती गडे ग ! कथा० ध्रु०

ते विधिहरिहर येउनी
अनसुयेस दारांतुनी
इच्छिलें अन्न मागती गडेग ! कथा० १

चिंतुनी पतीच्या पदां
वाढिलें तिनें त्या तदा
बालकें तिथें रांगती गडेग ! कथा० २

मृग–वधास जातां पति
रावणें धरुनि दुर्मति
चोरिलें जानकीप्रति गडेग ! कथा० ३

सोडवी तिला रघुपति
तोंवरी जरी शुद्ध ती
तरि अग्नींतुनि काढिती गडेग ! कथा० ४

भारती सती द्रौपदी
गांजतां खल–सभेमधीं
टकमकां पती पाहती गडेग ! कथा० ५

चिंतिता तिनें प्रभुपदा
दुरवल्या तिच्या आपदा
दशदिशा तिला झांकिती गडेग ! कथा० ६

श्रीमती अहल्या कशी
झांशिचीहि लक्ष्मी तशी
वीरही जिला कांपती गडेग! कथा० ७
पळविती, स्त्रिया मळविती
आजही छळा ना मिती
दुर्दशा चालली किती गडेग! कथा० ८
पूर्विंचीं चरित्रें जरी
कां निराश व्हावें तरी
करुनियां दाखवूं कृति गडेग! कथा० ९

---

## वाचनालय.

पद ( चाल—सुटला पितृ० )

पूर्वीं युगत्रयाच्या ठायीं
होतें ज्ञान—सत्र जें कांहीं
आश्रमीं ऋषींच्या चहूंकडे नदितिरीं
तें कलित एक वाचनालयाभीतरीं धृ०
स्वर्गीं एकच कवि[1], गुरु[2] असती
एक्या कलाधराची[3] महती
कवि बृहस्पति कलाधरांप्रती ना मिती
या वाचनालयीं कितीतरी नांदती १
दोवां लेखकांत रोकडा
असला छत्तिशिचा आंकडा

---

१ शुक्राचार्य. २ बृहस्पति. ३ चंद्राची.

मानुनी अबोला बरा भांडणाहुनी
त्रेसष्ठ बनति ते शांत इथें राहुनी २

येथें सर्व रसांना थारा
स्त्रीपुरुषांना तैसा पोरां
अधिकार तसा उपदेश असावा वाटे
स्थल दुजें वाचनालयाविना नच कोठें ३

ज्याला ज्या विषयाची गोडी
त्यानें घ्यावी येथें उडी
त्या दीपपतंगापरी अशा निश्चयीं
लय होइल तरि हो सुखें वाचनाल्यीं ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
अनुक्रम.................. दि: ..................
श्रीकृष्णसंशोधन ..................

पद ( चाल–नृपममता० )

सुर वंदिती यत्पद–रेणु वृंदावनिं वाजवि वेणू कृष्ण तो धृ०
जो मधुर रवें मुरलीच्या मोहितो वृत्ति सकलांच्या कृष्ण तो
माध्यान्हि भुकेला झाला करि गोपालासह काला कृ०
चाल–जीवनीं मत्स्य होऊनी, लपति येउनी,
देव यमुनेला सांगतो 'न जा' गोपांला कृ० १
पेंद्या पळतां यमुनेसी धेनूंसह पाही त्यासी कृ०
सर्वही गोपगण गेला एकला एक तैं उरला कृ०
अज्ञानें पडली भ्रांति हातींचा सोडुनि जाती कृ०

चाल—कालिया—विषानें तयां प्राशितां पया
मूर्छना आली विंदान[1] करी त्या कालीं कृ० २

कर्माचें फल दें आधीं मग हरी व्यसन जें बाधी कृ०
जाउनी स्वयें त्या ठायीं मृत पाही गोपहि गायी कृ०
उठवि त्यां फिरवुनि दृष्टि करुनिया कृपेची वृष्टि कृ०
चाल—तांतडी, जळीं घे उडी, देउनी बुडी,
कालिया सर्प— मर्दुनी उतरि तद्दर्प कृ० ३

वृत्तांत गोकुळीं आला गो—गोपांसहित निमाला कृ०
तैं हाहा:कार उडाला जन निघती पहावयाला कृ०
मन विटलें व्यवहाराला सर्वांसी प्रियतम झाला कृ०
चाल—राधिका, गोपगोपिका, बाल बालिका,
यशोदानंद बधुं ह्मणती श्रीगोविंद कृ० ४

नवविधा भक्तिच्या वाटा— शोधिल्या; पाहिला हाटा कृ०
श्रुतिस्मृतिचा ठावठिकाणा घेतां न सांपडे जाणा कृ०
दाखवी दर्शनार्ताला प्राप्तीच्या सुलभपथाला कृ०
चाल—गोष्पदें[2], पाहती मुदें, चिन्ह जणुं वदे,
मार्ग हा साचा निश्चयेंच भेटायाचा कृ० ५

---

१. लीला. २. गायीचीं पाउलें.

# गोमातेची पृच्छा.

पद ( चाल फुलें वेलींची )

जन्माष्टमिसी आनंद होय गायीसी धृ०

श्रीकृष्णाच्या अवताराचा
करी महोत्सव प्रेमभराचा
समूह हरिच्या भक्तवराचा
गोकुलवासी राहती सदा उपवासी १

गो-विरहित कुल ज्याचें भरलें
त्यानें मृण्मय गोकुल रचिलें
'कृष्ण कृष्ण' गर्जनें पूजिलें
भावें त्यासी वाहुनी गंध-पुष्पांसी २

होती जी-छे असो कुणाची
किंवा वधिकाच्या वांट्याची
हंबरडा ती फोडित साची
धेनू ऐसी पातली अशा सदनासी ३

'कृष्ण'-गर्जना पडतां कानीं
पुच्छ उभारी उभी राहुनी
इकडे निघते श्रीधर-वाणी-
' मध्यरात्रीसी जन्मला कृष्ण मथुरेसी ' ४

निघतां श्रीहरि गोकुलाकडे
बंदि-गृहाचे द्वारहि उघडे
उघडें असुनी लागे इकडे
ज्या दारासी उभि धेनू गोग्रासासी ५

मरणोन्मुख ती धेनू झाली
पवित्र देहांताच्या काळीं
निर्वाणीची वाचा फुटली
करि पूजेसी गोकुल–पूजन–कर्त्यासी ६

'कृष्ण जन्म तो झाला आतां
बाळा ! तो जरि खराच असतां
मरती का ही तव गोमाता
पृच्छा तुजसी दे उत्तर याचें मजसी ' ७

---

## सहानुभूति.

[ C. Mackay यांच्या Simpathy या इंग्रजी कवितेचें रूपान्तर ]

पृथ्वी.

विषण्ण धनहीनता करित चित्त माझें यदा
मदांध धनिकें दिलें मज सुवर्ण–नाणें तदा
कळे मजसि त्यामधें लव सहानुभूती नसे
प्रदर्शुनि कृतज्ञता परत मीं दिलें त्या तसें.
अनाश्रित अनाथशा मजसि निर्धनें पाहिलें
करूनि मम शुश्रुषा निज शरीरही वाहिलें
परंतु न कळे मला 'तदुपकार फेडूं कसे ?
धनाहुनिहि थोर ती जगिं सहानुभूती असे !

---

# अंगाईगीत.

[ Sir Walter Scott यांच्या The Lullaby of an Infant Chief चें भाषांतर. ]

शा. वि.

बाळा ! व्यर्थ रडूं नकोस, जनिता शूरांमध्यें अग्रणी
तेजस्वी जननी सती, उभयतां प्रेमार्द्र होतीं जनीं
रानें जीं बुरुजावरूनि दिसती, मोठ्या गुहा त्यांतल्या
या साऱ्या छकुल्या तुझ्याच करितां देवें पहा निर्मिल्या
वेड्या ! तूं दचकूं नकोस बिगुला, वाजे जरी भीषण
पाचारी तव रक्षका, करिति जे विश्रांति–संरक्षण
शत्रूची तव पाळण्याजवळ ती चाहूल लागे जरी
त्यांचे वांकुनि चाप, त्या असिलता आरक्त होती तरी
आतां स्फुंदुं नकोस सत्वरि पहा येईल रे ! वेळ ती
गर्जोनी रणशिंग, दुंदुभि यदा निद्रा तुझी भंगिती
यासाठीं तुज घेववेल तितुकी विश्रांति घे संप्रति
तारुण्यासह युद्ध येइल, तशी युद्धासवें जागृति !

---

# तिळगूळ.

दिंडी.

करीं घेउनियां अमित जड तिळांसी
मिश्र केले आत्मत्व–शर्करेसी
जल–प्रेमाचें साह्य तयां होई
चेतनानल त्यां ऐक्यरूप देई

देह–लोभाच्या तीव्र कंटकांना
पाहुनीयां त्यागाल तुम्ही त्यांना
सुज्ञ रसना आत्मीय शर्करेतें
दावुनीयां करवील ग्रहण त्यांतें
भिन्न तिळ परि पाहतां एक गोडी
कुठें वाटे बहु, कुठें गमे थोडी
भिन्न देहीं त्यापरी एक आत्मा
ह्मणुनि भिन्नत्वीं व्याप्त सदा प्रेमा
स्पर्श दंताचा ग्रहण–समयिं होतां
त्याज्य पुनरपि ते वाटतील चित्ता
परि ध्वनि तो 'संदेश' तुह्मा सांगे
भाव त्याचा मी विदित करीं वेगें–
तुम्हापाशीं सामर्थ्य मम न चालें
स्वसामर्थ्यें पाहिजे नष्ट केलें–
मदिय कंटकपण, चित्त मुळिं न लेखो !
रसिक रसना ती प्रेमरसा चाखो !

व. ति.

संक्रांतिचा हा तिळगूळ सेवा
प्रेमें करा मान्यहि अल्प सेवा
चित्तीं सदा प्रेम असेंच ठेवा
होऊं न द्या नष्ट निसर्ग–ठेवा.

## —४—

# मातृ—हृदय.

( प्रस्तुत पूर्वार्धांत 'Mother's love' या इंग्रजी कवितेंतील कथानकाच्या आधारें नैसर्गिक मातृ—हृदयाचें शब्दचित्र रेखाटलें आहे. )

पृथ्वीवृत्त.

प्रवास करितां जणूं रवि-तनू बहू भागली
ह्मणूनि किरणांसवें करि विराम अस्ताचलीं
अशांत-विधवा धरा तिमिर-वस्त्र घेई करीं
सुखांत पहुडावया स्वतनयावरी पांघरी
प्रविष्ट जरि होतसे, परि 'निशा' तिला ना कळे
अहेवपण तें करी गमन कृष्णपक्षामुळें
क्षणीं उधळिलें तिनें भ्रमुनि कंठिंच्या मौक्तिकां
प्रकाशमय मौक्तिकें बनलिं तीं नभीं तारकां
अशा समयिं चालली निबिड काननीं एकली
गरीब विधवा भली त्यजुनि झोंपडी आपली
प्रभातिं तिज भाकही सुखदशी उषेनें दिली
प्रवास करितां तदा, परि न पूर्णता पावली
कदाचित धरेवरी गगन-मौक्तिकें सांडलीं
करील विधवा निशा सहज दग्ध कोपानलीं
तसें पतित मौक्तिकां मुळिं न दुःख बाधो कदा
दयार्द्र बनुनी नभीं म्हणुनि मेघ आले तदा
गळोत किती मौक्तिकें, किति जळोत तीं भूवरी
अशांत विधवा-दशा परि कळो स्त्रियांना तरी

ह्मणूनि जलदासवें रिपु बनूनि झंझानिलें
क्षणांत घनघोर तें तुमुल युद्ध आरंभिलें

'समस्त समरीं लढूं विजय व्हावया सत्वरी'
ह्मणूनि पडती तदा जलद एकमेकांवरी
निनाद रणभेरिचा कडकडारवें गर्जतां
गमे तळपती किती असिलता, न विद्युल्लता.

सुशीतल निजास्त्र तैं हळुंच वायुनें फेकिलें
न तोय जणुं रक्त तें जलदहि स्रवूं लागले
हताश निज शत्रुला गणुनि वायु फोंफावला
परी उलट त्यावरी पडति बर्फरूपी शिला

अचेतन गिरी परी वडिल पृथ्विचीं लेंकरें
असह्य जरि वेदना करिति मान्य अत्यादरें
'कृतांत कटकामलध्वज—जरा' तयां लाधली
वडील म्हणुनी शिरीं धरिति शुभ्र बर्फावलि

क्रमूनि अबला अशा गिरिपथा बहू भागली
नसे जवळि खावया जरि तिला क्षुधा लागली
तशांत वरूनी अशा कठिण संकटें घेरिलें
जगत्पति दयाघनें हि न कळे कसें प्रेरिलें ?

तदीय पति जाउनी दिवस ते किती जाहले
निवेदन करी तिला घडिंघडीं तिचें तान्हुलें
द्वयाब्द तनयाप्रती उचलुनी उराशीं धरी
कसें व्यसन हें टळे म्हणुनि फार चिंता करी

पडे धडधडा शिरीं वरुनि बर्फ तो सारखा
हताश बनुनी तदा बघतसे मुलाच्या मुखा
तथापि करुनी जरा पुनरपी मनाचा धडा
पळे त्वरित आश्रया बघुनि पर्वताचा कडा

परंतु बहु वाढला पुढति बर्फ–वर्षाव तो
प्रसंग पडतां अशा व्यसनिं कोण तो धांवतो ?
बघूनि लव आश्रया निजवुनी तिथें बालका
तिनें सहज झांकिली मग दया जगत्पालका–

ह्मणे " करुं तरी कसें समुळ धीर माझा खचे
अनाथ, दुबळी, मला नच उपाय कांहीं सुचे
बुडो ! व्यसनिं शेवटीं जननि मी बुडाल्यें जरी
परंतु मम लाडक्या छबकड्यास रक्षीं तरी "

असें ह्मणुनि ती प्रभूवरिच पूर्ण विश्वासली
स्ववस्त्र मग फेडुनी सुत–तनू तिनें झांकिली
निजाश्रुजल सिंचुनी प्रथम लाडकें स्नापिलें
पुनश्च मग चुंबुनी तनुसि आपल्या ओपिलें

व. ति.

झाली प्रभात, नभ निर्मल पूर्ण झालें
पांथस्थ ते सहज त्या स्थलिं सर्व आले
प्रेतासमीप बघतांच तदीय पुत्र–
पाही सुहास्य–वदनें उघडूनि नेत्र

# मातृ-हृदय.

[ उत्तरार्ध ]

[ आवश्यक अशा सामाजिक बंधनांतील निष्ठुरपणाचा अतिरेक झाल्यामुळें बनलेल्या कृत्रिम मातृ-हृदयाचें शब्दचित्र, चंद्रभागेच्या वाळवंटांतील प्रत्यक्ष घडत असलेल्या दृश्याधारें या उत्तरार्धांत रेखाटलें आहे. ]

( दिंडी-वृत्त )

सृष्टिसति-पति-दिनमणी रवि निमाला
किरण-केशालंकार लुप्त झाला
बनुनि विधवा ती शुभ्र वस्त्र नेसे
पुसट कुंकुम शशि-तिलक गोल भासे

वैभवाच्या शिखरास सृष्टि जातां
प्राप्त झाली तिज विधवदशा आतां
जनक-विरहें जड होति सकल बाळें
तोंच घडलें कटु वृत्तही निराळें

अंधकारें व्यभिचार-कर्म केलें
एकनिष्ठा-व्रत बळें लया नेलें
दीनभूता करि शोक 'किर्र' नादें
कृष्णकर्मी तो संचरे प्रमोदें.

प्रसवि सृष्टि पुढें एक एक तारा
उलट लज्जेनें होय कोंडमारा
उत्तरोत्तर चिरडून हळू बाळें
लपवि-पाहिल कुणि ह्मणुनि-तोंड काळें

दवाश्रूंच्या नव शुद्धशा प्रवाहीं
नखें विकृतचि तें बाळ पडुनि राही
'अमर निज पति जरि येउनियां पाही
रक्तमय जल त्या दिसो दिशां दाही'

बघुनि हत्या ही सारखी ग्रहांची
खिन्न झाली मति तदा ज्योतिषांची
पुढें त्यांनीं निर्माण संघ केला—
बाल–हत्या–प्रतिबंध व्हावयाला !

प्रकट होई जंव पुंज तारकांचा
पुत्र–मोहें करि अमर देह त्यांचा
स्वर्ग–गंगेचें रूप तेच घेती
कुणी 'सप्तर्षी' 'ध्रुवहि' कुणी होती

पुढें पोटीं ती अरुंधती आली
बघुनि तिजला भयभीत सृष्टि झाली
सर्प वेष्टिल कीं लता चंदनाची
भीति पडली स्त्रीजाति–निर्बलेची

सृष्टि झालेली व्याप्त मोह–जालें
नवग्रहही त्यापुढें प्रकट झाले
दु:खदायक परि मोह तिचा झाला
भूमिवरच्या हतभागि बालकांला.

पौर्णिमेच्या त्या ऐन मध्यरात्रीं
चंद्रभागेच्या त्या पुनीत पात्रीं

एक जिज्ञासू मनन करित चाले
अंधकाराचें कृत्य दृश्य झालें.

करी हत्या जंव पोटच्या मुलांची
पाहवेना कृति सृष्टि–राक्षसीची
ह्मणुनि डोळें जैं अधोमुख जहाले
श्रवणिं त्याच्या तैं पुढिल शब्द आले–

"रूप–सौंदर्यें मोहिसी कशाला ?
हास्य–वदनानें रिझविसी कशाला ?
बाहु हालवुनी बाहसी कशाला ?
मींच झाल्यें उद्युक्त तव वधाला !"

शब्द ऐकुनि जिज्ञासु चकित झाला
"काय हत्या ?" संशयें स्तब्ध ठेला
लक्ष्य देई श्रवणार्थ पुढिल गोष्टी
तिथें पहुडे तो हळुंच वाळवंटीं.

पुढें बाळाचा रुदन–शब्द आला
परी मध्यंतरिं बळें स्तब्ध झाला
स्वहस्तांनीं सुत–वदन रुद्ध केलें
काय विधवा त्या बालकास बोले–

"क्रंदनानें परिणाम काय होतो ?
मृत्युपासुनि तुज कोण सोडवीतो ?
मम व्यसनीं मीं कंठशोष केला
कोण साह्यास्तव धांवुनियां आला ?

ऊर्ध्व शंकेनें नेत्रभाग झाले
प्रश्न सारे तव कळुनि मला आले
तुझ्या प्रश्नांच्या उत्तरास देतें—
नको—रात्रीं परि कोण इथें येतें ?

'क्रूर माझें कां मातृ-हृदय झालें ?'
हेंच बाळा ! मनि नाहिं काय आलें ?
परी उत्तर मीं काय तुला द्यावें ?
उलट धर्माला तूंच विचारावें.

कसा झाला तव जन्म बालका रे !
विदित करित्यें कटु वृत्त तुला सारें.
परी वेडी मी-भ्रमचि मला झाला
कळे कैसें तें तुला तान्हुल्याला ?"

खरी विधवेची भ्रमित वृत्ति झाली
भ्रमामाजी करि विदित तया कालीं—
भूतकालाचें वृत्त तया बाळा
परी जिज्ञासुच ऐकता तयाला—

"जाउनीयां पति बहुत दिवस झाले
बाळपणिं हें वैधव्य मला आलें
पुढें वडिलांनीं केश-वपन केलें
अल्प काळांतचि तेहि मरुनि गेले.

करुनि बल्लवपण कठिण काल कंठीं
कधीं जावें मीं देव-कथेसाठीं

बघुनि मजला अशि दीन एकटीच
भेटला-मेला-दुष्ट एक नीच

साधु-वृत्तीचें ढोंग फार केलें
पदीं त्याच्या मच्चित्त जडुनि गेलें
दया येइल मजविषयिं देवदेवा
शुद्ध भावें करिं ह्मणुनि नित्य सेवा

'विषय सांडुनियां पांडुरंग गाई'
'षडरि जिंकावे' ह्मणुनि 'मायबाई !
मधुनि एकांतीं काळ बहुत जावा—'
असा मेल्यानें बोध मज करावा.

मीहि एकांतीं बसुनि करी सेवा
म्हणें 'गुरुजी ! मज पांडुरंग दावा'
'देव दाविन तुज चाल पंढरीला'
आणिलें मज फसवुनी या स्थळाला

कथा करुनी मजलाहि त्याच रात्रीं
चंद्रभागेच्या याच—अशा पात्रीं
आणुनीयां—छे ! कुणि न सोडवीलें—
दुष्ट मेल्यानें भ्रष्ट मला केलें

अंतरिक्षींचा चंद्रदेव तोही
हाल माझे अति शान्त मनें पाही
स्वयें जो का व्यभिचारि तयाला हें
सौख्य अन्य व्यभिचार-कर्मि लाहे

वृत्त ऐकुनि जिज्ञासु वदे वर्मी
"काय विधवांची दशा आर्यधर्मी
धर्म बाळांचा कसा बळी घेतो ?
दया नाहीं तो धर्म कसा होतो ?

जरी जाउनि थांबवूं बाल–हत्या
तरी विधवा ती करिल आत्महत्या"
असें वदतां वदतांच शांत झाला
कर्णि विधवेचा पुन्हां शब्द आला–

"भ्रष्ट केलें, परि नष्ट नाहिं केलें
उलट तुजला नवमास वाढवीलें
करुनि बल्लवपण कसें तरी पोट–
प्रथम भरिलें; परि पुढें तेंच 'पोट'–

बघुनि जवळी मज कुणिं न देइ थारा
उत्तरोत्तर मनिं होय कोंडमारा
नष्ट मेला तो फिरे राजरोस
मात्र झालें मजलाच गांव ओस

तुझ्या 'मृत्यूचा जन्मदिवस' आज
जन्म घेउनि केलेंस काय काज ?
'कासया गा! मज जन्म दिला वायां ?'
जन्मदात्या त्या पूस देवराया

आर्यधर्मी तूं, जन्म तुज पुन्हांही
ह्मणुनि सावध यापुढें तरी राहीं

हट्ट धरुनी प्रभुपदीं बैस कैसा !
'आर्यधर्मीं तरि जन्म नको ऐसा "

बाळ ऐकुनि हें करी क्रंदनाला
वदे जननी घेऊन चुंबनाला
" स्वयें सांपडुनी अशा घोर कर्मीं
प्रेम आहे का अजुनि आर्यधर्मीं ?"

पुन्हां बाळानें हर्ष लया नेला
भाव तेणें तरि काय विदित केला
" असें वदण्यापूर्वींच कां न माते !
कंठिं देउनि नख मारिलेंस मातें ?

आर्यधर्माचा दोष मुळीं नाहीं
'दोष त्याचा हा' मूर्ख कल्पना ही
स्वार्थवाद्यांनीं लपंडाव सारे—
करुनि रचिले हे रूढिचे पसारे "

"प्रेम बाळा ! जरि आर्यधर्मि आहे
हीन जातीचा गर्भवास साहे
तिथें होइल नच मृत्यु जन्मतांच "
बाळ उत्तर दे जननिला स्वतांच—

" काय केलें मीं पाप असें सांग
हीन जातीं व्हावया धेड, मांग
वर्णगुरुच्या पोटींच जन्म घेतों
देव दाता दीनास दान देतों "

" नको बाळा जन्म हा ब्राह्मणाचा
पुरा मातेरा जाहला गुणांचा
'नको विधवेच्या पोटिं तरी बाळ '
ह्मणुनि आळविं जगदीश तो दयाळू "

कठिण हृदयानें दुग्ध आटवीलें
दुधावांचुनि सुत–वदन शुष्क झालें
वदे जननीला बाळ जणुं तदा तें
"दिसे कृत्रिम तव हृदय जन्मदातें

भूतकालाचें वृत्त विदित झालें
भविष्याचे सदुपाय कळुनि आले
वर्तमानाचा प्रश्न सोडवावा
उत्तरासी त्वां वेळ ना करावा "

तदा विधवेनें हळुच नदीकाठीं
नेत्र झांकुनि नख दिलें बाल–कंठीं
" तुझ्या प्रश्नाचें तूर्त हेंच आहे
अशुभ उत्तर हतभागि मुला! पाहे "

तिच्या निष्ठुर घातकी समाजानें
हरिलि कुंकुम–रक्तिमा दुरभिमानें
नखें तितुका करि बाल–रक्त–शोष
अश्रुविरहित नुसतांच असंतोष

अर्ध घटिका लोटली परी कांहीं
शब्द कोणाचा ऐकुं येत नाहीं

म्हणुनि जिज्ञासू जाउनियां पाहे
बाळ विधवेचा प्रवाहांत वाहे

प्रवाहांतुनि मृत बाळ करीं घेई
मुखें आशीर्वच त्यास असें देई—
"तुझ्या मृत्यूनें कितीतरी बाळां
मार्ग होइल चुकवावयास काळा"

निरुपयोगी तें प्रेत पुन्हां त्यानें
जळीं त्यजिलें, वाहलें प्रवाहानें
करी जिज्ञासू बेत निश्चयाचा
'बाल-हत्या–प्रतिबंध करायाचा'

आस्तिकांनों ! जा पंढरीस आतां
पहा प्रत्यंतर राउळास जातां
बाल-हत्त्या-प्रतिबंध व्हावयाला
मीहि बघतों करि कोण साह्य त्याला ?

---

# 'एकान्त' व 'मृत्यूचें मागणें'

## ( अन्य दर्शन. )

[ श्री. राजेश्वर यादव मुळावेकर ऊर्फ मोंगलाईंतील बालकवि **यादवसुतांच्या** वरील दोन कवितांचें अन्यदर्शन या कवितेंत आहे. त्यापैकीं 'एकांत' ही कविता '**म**हाराष्ट्र शारदें'त प्रसिद्ध झाली आहे. ]

आर्या.

**यादवसुत**—बालकवे ! नूतन तव बघुनि काव्य '**ए**कांत'
त्यापरि निर्वाणीचें '**मृ**त्यूचें मागणें'हि साद्यंत——
सुचले विचार जे जे ते ते मी स्पष्ट सांगतों सारे
अप्रिय पथ्यकरोत्तर मानावें त्वां तयांप्रती बारे !

भरला पूर्ण निराशावाद जरी त्यामध्यें प्रसंगानें
होउनि रसपरिपोषहि चाले अर्थौघ फार वेगानें
प्रेम, प्रसाद, तैसी प्रतिभा, उत्कृष्ट काव्य—गुण जे हे
सहज प्रसाद त्यांतुनि या तव काव्यास लाधला आहे

या विरहित काव्याचे मानितसे मी प्रकार जे दोन
स्पष्टीकरण तयांचें करितों, घे तेंहि पूर्ण ऐकोन
तत्त्वज्ञानाचें जें काव्याशीं ऐक्य दाविती सुज्ञ
संपूर्ण तें पटेना कारण मी त्यामध्येंहि अनभिज्ञ

स्पष्टपणें परि मज हें ऐक्यहि भावार्थ दीपिका दावी
अविरोधता न त्यांची वाटे मग किंन्निमित्त मानावी ?
'सत्याभास' असें हें काव्याचें व्यंग्यतेमुळें नाम
तत्त्वज्ञानामाजी सत्याविण अन्यथा नसे काम

सिद्धान्त–तत्त्वबोधा दिधले दृष्टांत काव्यरूपाचे
हें साध्य–साधकत्वें ज्ञानेशें ऐक्य दाविलें त्यांचें

हें ऐक्य मान्य करितां द्विस्वरूपें काव्यरूप बीज रुजे
'बुद्धि–प्रधान' पहिलें; ह्रदूतहि 'भावनाप्रधान' दुजे

बुद्धि–प्रतिभेमाजी साम्यानें प्रेम–भावना मिळतां
तत्काळ तो प्रसादहि अवतरुनी श्रेष्ठतेस ने कविता

परि हा प्रसाद पावे, केव्हां केव्हां बळेंच एकांग
जंव बुद्धिभावनेच्या साम्यांतरिं अल्प येतसे व्यंग

एकांगीपण करितें बुद्धिहुनी भावनेप्रति प्रबल
बुद्धीस उलट तिजहुनि सबल परि न राहुं देत तुल्यबल

पहिली 'विकारवशता' त्यापरि दुसरी 'विचारवशता' ही
काव्य–विभाग कराया तिसरी उपलब्ध भावना नाहीं

* * * * *

यापरि निरीक्षितां जरि आतां उपरोक्त पद्य काव्यातें
निश्चित 'विकारवशता' पूर्णत्वें त्यांत आढळे मातें

बुद्धि–प्रधान काव्यीं जेविं नये भावना प्रतीतीला
या भावना–प्रधानीं तेविं मिळे अर्धचंद्र बुद्धीला

'एकांत–वास सुखकर' संतांचा जरि तुझ्या मनीं गमला
तरि हें अकांडतांडव जनतेवरि कासयास सांग मला ?

दुःखद गमलें तुजला जनतेचें पाहणें जिणें स्वार्थी
तरि वृत्ति एकट्याची बनली वद का तुझीच परमार्थी ?

'निष्काम प्रेम' तुला न मिळे जरि शोधितां भुवन सारें ?
तरि अपकाऱ्यांनाही लाजविसी नित्य काय उपकारें ?
जरि शुद्ध मित्रतेचा लागेना तुजसि अल्पसा थांग
तरि मग 'अजातशत्रुच' वृत्ति तुझी काय जाहली सांग ?
तुज 'सत्यता' दिसेना जनता-संसर्ग जेधवां राही
तरि वद काय असत्या स्वप्नामाजीहि पाहिलें नाहीं ?
'खरतर अपमानाचा शर' घुसतां दुःख वाटतें मोठें
वद मानमान्यतेचा झेंडा त्वां लाविला तरी कोठें ?
फिरतां दिशाहि दाही, गिरीकंदरिं, सागरीं गृह त्यजुन
तरि तुज शांति मिळेना, जीव अशांतचि तुझा असे अजुन
ह्मणुनी शांति मिळाया जनतेचा स्वमनिं मानुनी हेवा
त्वां सहज नम्रभावें केली एकांत-याचना देवा ?
बालकवे! निज काव्यें त्वां जी एकांत याचना केली
झाली काय सफल ती, किंवा निष्फल तशीच ती गेली
मज आश्चर्यचि वाटे पूर्ण करावी कशी तुझी इच्छा
'एकान्त कुठें देऊं' ? ह्मणुनि उलट तो करील ही पृच्छा
कारण या भूलोकीं स्वार्थी जन वाटले तुला सारे
गिरीकंदरींही विजनीं शांतिसुखाचें न लाधलें वारें
कीं द्वापारयुगींचा आठवला त्या असेल पूर्वींचा
दुष्टांच्या सुष्टांच्या मिश्र सभेचा प्रसंग मौजेचा
दुर्योधनास दुर्जन सज्जन जन दिसति धर्मराजाला
झाले स्पष्ट परस्पर विरुद्धसे बुद्धि-धर्म हे त्याला

अंतरिं वृत्ति असे जी तीचें प्रतिबिंब भासतें बाह्य
बाह्यानुभवा आहे अंतर्वृत्तिच मुळामध्यें साह्य
याच विचारें केली पृच्छा उलटी तुलाच देवानें
'करिशील काय वेड्या ! एकांताच्याहि पूर्ण लाभानें' ?
आपण अंतरिं जैसे, तैसा दिसतो जगद्बहिः प्रांत
बिंबप्रतिबिंबापरि हा तरि केव्हांहि सत्य सिद्धांत
षष्ठिर्वर्षसहस्रें तपोवनीं लोहपिष्ठ भक्षुनिया
विश्वामित्रें नेली एकान्तीं मेनकेसवें वाया
होते पराशरादिक मुनि तैसे ब्रह्मनिष्ठ ते मुक्त
त्याहि वसिष्ठालागुनि झाला एकांत काय उपयुक्त ?
ऐसे कितीक सांगूं याहि निरूपणमिषें घडे निंदा
निंदावें काव्यीं हा माझा होईल सर्वदा धंदा
राहो ! हें परि जेथें चालेना लव उपाय थोरांचा
एकांत तो तुला का गमला सामान्य खेळ पोरांचा ?
भिन्नचि परिस्थितीची दे सोडुनि पूर्वींचीं उदाहरणें
अर्वाचीन पिढीचीं प्रत्यय देतील तीं दुराचरणें
गादीहि नारदाची, व्यासाचें पीठ त्या परी वारिती
राहुनि उभे परोक्ष ज्ञानाच्या वल्गनाहि जे करिती—
एकांत त्यांस मिळतां ज्ञानावरि फांसतात हरताळ
सर्वज्ञ मात्र ईश्वर अज्ञांची त्यासवें करी माळ
आहे भेद कितीतरि संत तसे जे असंत त्या माजी
एकान्त एक असुनी होतो स्वर्निरय पंथिंचा वाजी

जाऊं दे परि तुजला देवें एकान्त तो दिला काय ?
मज वाटे न मिळाला ह्मणुनि तुझा जीव मोकली धाय !

त्याचें प्रत्यंतर कीं, 'मृत्यूचें मागणें' पुन्हां केलें
तेंहि अशांत मनाचें कृत्य तयालाच शोभुनी गेलें

भूवरि शांति मिळेना म्हणुनि तुला पाहिजे दुजा लोक
तेथें गमन कराया मृत्यूचा मार्ग एकला चोख !

तो मृत्यु मागतांना दर्शविली त्वां कृतज्ञता ज्यांची
त्या मातापितरांची बंधूंची धन्यता गमे साची

सौख्याचे दिन जातां; त्राता, पाता तसाच हितकर्ता
मृत्युविना तुज दिसला नाहिं दुजा काय दुःखसंहर्ता ?

शांतिसुखाचें केणें असतें जरि मृत्युच्याच जबड्यांत
तरि अल्प जीविताशा नसती बहु शोधितांहि वेड्यांत

पोरांना सुख व्हावें म्हणुनी सधवा पतिव्रता ज्या त्या
विगतधवा जारिणिपरि कंठीं नख जन्मताक्षणीं देत्या

परि तें असत्य सारें, मृत्यु असा मागतांहि न मिळेल
जरि आला नैसर्गिक तेव्हां तो टाळितांहि न टळेल

ऐसें असतां जो नर आश्रय करि मृत्युचाच संसारीं
शास्त्र म्हणे त्यालागीं 'निःसंशय तोच आत्महत्यारी'

हाहि विचार न करितां केली त्वां मृत्यु—याचना देवा
सोडुनि भूमीवरची पुण्यप्रद मातृ—देवता—सेवा

* * *

कोकिल कूजित सुस्वर येथें जरि भासतात 'रडगाणें'
तरि मेघगर्जनेंतुनि व्हावें कैसें नभःस्थलीं जाणें ?
पवन–स्पर्श वनींचा 'कष्टप्रद' जरि करी तुझें आयु
तरि साहवेल कैसा हाकारी जलद जो नभोवायु ?
निर्झर शीतल शुद्धहि 'निर्दय' तुज भासतात जे येथें
रवि–किरण उत्तरोत्तर सुखकर गमतील ते कसे तेथें ?
सागर, गंभीर नद्या खळबळ जरि उडवितात चित्तांत
विद्युल्लता भयंकर तुजला गमतील त्या कशा शांत ?
'हीं संकटेंहि सोसुनि तारकपदिं मज मिळेल विश्रांति'
जरि मानिसी असें तरि तीहि खरोखर मनांतली भ्रांति
म्हणशी, 'होउनि तारा आकाशीं मी सुखांत चमकेन'
तरि काव्यकल्पनेविण सत्य दुजें यांत अल्प उमजे न
'काव्य नसुनि हा आहे ध्रुवादिकांचा खरा इतिहास'
ह्मणशी असें तरी ही इष्टापत्तीच जाहली खास
धरिला काय पुढें त्वां ध्रुवचरिताचा पवित्र आदर्श
वैराग्यविवेकाचा झाला ह्रदयास का तुझ्या स्पर्श ?
वैराग्यविवेकाचा झाला ज्याच्या मनासि संस्कार
ज्ञानामृताविण कसा सोडिल तो द्वेष–गरल–फूत्कार ?
भूलोकातें सोडुनि दृष्टि तुझी ऊर्ध्व जाहली सहज
करि येथून निरीक्षण तारांचें काय सौख्य तें उमज
तारांची स्वैरगति प्रथम दिसे परि असे नियमबद्ध
तें पुण्यजन्य जीवित सौख्यप्रद अल्पकाल, हें सिद्ध

होतां क्षय पुण्याचा करुं न शके त्या पदा कुणी जतन
एका मागुनि होतें दुसऱ्याचें भूवरी अधःपतन
निश्चित अधःपतन हें; ध्रुवपद सर्वांस लाभतें कैसें ?
पेरावें बीज जसें येइल अंतीं तयास फल तैसें
हा अंतकाल येतां सहजीं निष्काम त्या तुकारामा
मेलें मरण, निघाला वैकुंठीं तो सदेह विश्रामा
जेथुनि पुनः न येणें, दर्शन घेणें न मृत्यु लोकाचें
त्या वैकुंठीं जाता कामुक तें चित्त होय संताचें !
तेव्हां त्यानें देवा मागितलें दान तें पहा नीट
होशील वाटतें मज, वरहि वरायास त्यामुळें धीट
संत तुकारामानें एकांताची न याचना केली
एकान्तातें सोडुनि त्याची सत्संगिं दृष्टि गेलेली
'दे हेंचि दान देवा ! विसर तुझा निमिषमात्र ना व्हावा
गाइन गुण आवडिनें, हेतु असा सर्वदा मनिं रहावा
नलगे धन, नलगे मज विश्वेशा ! त्या चतुर्विधा मुक्ति
दे गा ! संग सदोदित संताचा,' हीच योजिली युक्ति
हा सफल हेतु व्हाया तत्पर तो गर्भवास भोगाया
'दे दे,' ह्मणे, 'सुखानें,' 'साधूचा संग मात्र दासा या'
संतार्थ अवतराया ज्या देवा मोहजाल नावरलें
त्यास तुकारामानें सत्संगाचेंच मागणें वरिलें
आपण संतचि व्हाया एकांताहून थोर सत्संग
दुर्लभ तोहि मिळाया प्रार्थावा सर्वदा रंमारंग

*　　*　　*

झाला संकल्प पुरा, तात्त्विक चर्चा तशी पुरी झाली
आतां वृत्ति मनाची मित्र–प्रेमाकडे परत आली

झाली जशी मनस्थिति काव्यीं त्वां वर्णिली तशी सहज
तीचेंच अन्यदर्शन सहज दिलें मी करुनि हें समज

तात्त्विक चर्चा केली मित्रत्वाची त्यजूनि मर्यादा
त्या पापास्तव होते प्रायश्चित्तार्ह कल्पना भयदा

अंतर्हेतु परस्पर उमगाया देवभक्त–यांनाही
निष्काम अशा प्रेमावांचुनियां मार्ग अन्यथा नाहीं

मग सांग आपुली ती काय कथा ? हा विचार विवरावा
निष्काम प्रेमाची महति कळाया प्रसंग घडवावा

या हेतूनें प्रेरित होउनिया मी निरीक्षुनी काव्य
तत्काल अन्य–दर्शन दर्शविलें जें तुला असंभाव्य

'ऐकूनि अन्य दर्शन' कोणी करितील कल्पना कांहीं
"निष्काम प्रेमाचा," ह्मणतिल "अल्पांश यामध्यें नाहीं

प्रेमाभावीं दिधला मित्रत्वा काव्यरूप दुर्दंड
अर्वाचीन कवीचें काव्य–प्रांतांतलें असे बंड"

किंवा म्हणतिल "यानें लिहिली 'एकान्तवास' ही कविता
तदुपरिचा यत्न तुझा झाला याच्या मनास तापविता

मतभिन्नता तुझी ही तिळमात्रहि या खलास नावडली
यास्तव यानें तुजवरि कटु शब्दाचीच आग पांखडली"

जरि म्हणतील असें, तरि मुळिंन तुझा बुद्धिभेद होणार
ही खूणगांठ माझी अंतीं मत्प्रत्ययास येणार

मजविषयींची आहे जी तव चित्तांत भावना शुद्ध
ती उक्त कल्पनांतें करणारांना करील हतबुद्ध
**श्लोक**—सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात्सत्यमप्रियं
प्रियंच नानृतं ब्रूयात् एष धर्मः सनातनः
बोलावें सत्य जरी प्रिय होउनि ऐकतांच डोलावें
अप्रिय जरि होइल तरि तें सत्यहि अन्यथा न बोलावें
प्रिय जरि असेल जें परि काढुं नये अनृत तें मुखामधुनी
कथिला पूर्वि **मनूनें** धर्म सनातन असा असें ह्मणुनी
जेव्हां या स्मृति-वाक्यें वर्तन करितां न होय कल्याण
तेव्हां **व्यासमुनीनें** केलें श्री **भारतीं** समाधान
**श्लोकार्ध**—अप्रियस्यच पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः
प्रिय सर्वदा वदावें ऐकावें प्रिय अशी मतें ज्यांचीं
कोठे हि पाहुं जातां उणीव लोकीं न भासते त्यांची
अप्रिय पथ्यकराचा वक्ता दुर्लभ जनामध्यें आहे
श्रोता त्याहुनि दुर्लभ, वक्ता वदतांहि जो तया साहे
अप्रिय पथ्यकरोत्तर ऐकुनि जरि शांतचित्त होशील
तें दुर्लभ पद मजहुनी बहु मानें तूंच मात्र वरिशील
हें दुर्लभत्व वरितां, लोकीं ठरशील तूंच अपवाद
मित्र तुझा हितचिंतक तुजसह मोदें करील संवाद
बालपणापासुनि हें आहे उपयुक्त दुर्लभत्व जनीं
शीलगुणांचें व्हाया अंगीं वास्तव्य दार्ढ्य तें धरुनी
पूर्वींहि पाहतां ज्या पडल्या गांठी अहंममत्त्वाच्या
निश्चित त्याहि अभावीं दुर्लभशा याच 'दुर्लभत्त्वाच्या

व्यक्तीच्या, राष्ट्राच्या असतें जें 'दुर्लभत्त्व' हें अंगीं
तेव्हां मूढपणाची स्वोन्नति—कालीं न लागते गुंगी
आवश्यकता आहे सद्यः कालांत 'दुर्लभत्त्वा'ची
त्यावांचून मिठी ही नाहीं सुटणें अहं—ममत्त्वाची
ह्मणुनी मिठी सुटाया दुर्लभता आज पाहिजे वरिली
उन्नति—शिखर—स्थित त्या राष्ट्रांनीं जी मनांत आदरिली
मुख्यार्थ पाहतां या विवेचनाचा सुबोध तुज व्हावा
अप्रिय पथ्य—श्रोता ह्मणुनि तुला धन्यवादही द्यावा
आला तव काव्याच्या अप्रिय पथ्योत्तरोपसंहार
प्रेमें स्वीकारावा ह्मणुनि तुला सांगणें असे फार
यास्तव मी जें वदलों त्याचा मानूं नको मुळीं राग
मजविषयींचा होवो द्विगुणित तो त्वन्मनांत अनुराग
त्वां लौकिकार्थ सोडुनि चित्तस्वास्थ्यार्थ काव्य जें केलें
त्याचें पथ्यकरोत्तर मजकडुनी हें त्वदर्थ आलेलें
देवो! देव दयाघन चिरकालिक बुद्धि तेविं सुख, शांति
वीर महाराष्ट्रीं जे त्यांची कवनांत गावया ख्याति
दावुनि मी या काव्यीं एकांताहून थोर सत्संग
सप्रेम करीं अर्पण तुज '**आर्या—शतक**' हें करो दंग!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम.................... दि: ..................
क्रमांक ........


## हृद्गत कथनें:

[ परलोकवासी मित्रोत्तम ग. गो. गोळेगांवकर हे एल्एल्. बीच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले त्यावेळीं केलेलें. हे 'रॅशॅनलिस्ट प्रेस असोसिएशन'चे सभासद होते. ]

पद ( चाल भाव धरारे. )

प्रिय शब्दांनीं कथितों मी हृद्गत कानीं धृ०

प्रयत्न करितां विजय मिळाला
हेतु मनींचा फळास आला
परीक्षेंत उत्तीर्ण जाहलों
कथिली कानीं ही शुभ वार्ता मित्रांनीं १

उंच मनोरे आशेचे ते
नैराश्याच्या विद्युत्पातें
नष्ट होति परि आतां त्यातें
जय घोषानीं आणिलें दार्ढ्य जलदांनीं २

बालपणींच्या स्वातंत्र्याची
सीमा ओलांडुनि, विद्येची–
कांस धरिलि, स्थिति त्या समयाची
आहे ध्यानीं कष्टलों कष्ट–भारांनीं ३

असो, गोष्टि त्या गतकालाच्या
विषयिभूत ज्या जणुं स्वप्नींच्या
जीवित–कर्तव्य–क्षेत्राच्या
अंतर्भुवनीं व्हा प्रविष्ट जयद्वारांनीं ४

अवनति झाली निजराष्ट्राची
नसे कुणाही शंका त्याची
उन्नति आतां करावयाची
बहु यत्नांनीं अनुकूल मार्ग शोधूनी ५

सामाजिक वा धार्मिक, नैतिक
राजकीय, औद्योगिक, आर्थिक
सर्वांची उन्नति आवश्यक
त्यांच्या मधुनी घ्या प्रिय कर्तव्य निवडुनी ६

सामर्थ्यचि[1] आहे चळवळिचें
जो जो नर ती करिल तयाचें
अधिष्ठान परि भगवंताचें
असावें म्हणुनी श्रीसमर्थ गेले कथुनी ७

स्पष्टोक्ती या सिद्धांताची
तुम्हास नाहीं पटावयाची
आस्तिक नास्तिक या वादाची
रहस्य–वाणी त्या बालकवींच्या[2] वचनीं ८

जनीं जनार्दन तो जनतात्मा
तो तुमचा ना प्रिय परमात्मा!
आम्ही ह्मणतों काय जडात्मा?
आणा ध्यानीं ही ऐक्य–भावना स्वमनीं ९

गुप्त अशा त्या परमात्म्याला
भिउनि करिति जे कर्तव्याला

---

१ सामर्थ्य आहे चळवळीचे (दा.बो.) २ त्र्यं.बा.ठोमरे यांची धर्मवीर कविता.

नि:संशय हें वाटे मजला
तदधिष्ठानीं नच देव भीतिविण कोणी १०

कर्तव्यास्तव करितो जो का
निज कर्तव्या, उद्धरि लोकां
नास्तिक वाटो तोहि आस्तिकां
विचार सरणी तशि विदित तयांची करणी ११

जनता मानो तयास नास्तिक
मज वाटे तो एकचि आस्तिक
वृत्ति जयाची बनली सात्त्विक
सत्याचरणीं आस्तिक्य, न दांभिक वचनीं १२

ती आस्तिकता तुम्हांत दिसते
माझें मन मज साक्षचि देतें
कर्मवीर व्हा रक्षायातें
भारत जननी लोकापवाद सोडोनी १३

असो लांबली विचारमाला
कंटाळाही असेल आला
'कर्मवीर' हें नाम तुम्हाला
द्यावें ह्मणुनी आतुरता वाटे स्वमनीं १४

भविष्य सांगे ही आतुरता
" पाहुनि तुमची कर्मवीरता
' धर्मवीर ' ही संज्ञा देतां
धजेल वाणी या प्रिय मित्राची" ह्मणुनी १५

—५—

# महाराष्ट्र गीतांजलि.

[ जगद्विख्यात वंग कवि सम्राट् डॉ. रवींद्रनाथांच्या गीतांजलीच्या अनुवादांतील कांहीं उतारे. ]

१

अलंकार ते काढुनि झालें साधें माझें गीत
वस्त्रभूषणें यांचा नाहीं थाटमाट त्याच्यांत
तदात्मता जातांच विघ्न मग उभयतांत येईल
त्यांचा ध्वनि तव मंद मधुरशा ध्वनिस लया नेईल
लज्जेनें तुज बघतां गळतो काव्याचा अभिमान
ह्मणुनि राहिलों अगा कवींद्रा ! तत्पद कवटाळून
शुद्ध सरळसे जीवित माझें मजसि करुं दे तूर्ण
तेणें होइल मुरलीसम तव मधुर सुरांनीं पूर्ण

२

माळेचा जप, भजन, गान दे सोडुनि नांवहि यांचें
देव–द्वारें लावुनि करिसी ध्यान तरी कोणाचें ?
पहा उघडुनी नेत्र, तुला मग कळेल सर्वचि कांहीं
ध्यान करिसि तूं ज्याचें तो प्रभु तुझिया सन्निध नाहीं
कठोर भूमी नांगरितों निज शेतकरी जेथून
तेथें आहे देव तुझा तो, जीवा ! जा येथून
मजूर तो बघ रस्त्यासाठीं खडी फोडितो जेथें
देव पहाया जीवा ! सत्वर ऊठ ऊठ जा तेथें

उन्हांत, तैसा पावसांत तो असे सदा त्यांच्यांत
मळलीं वस्त्रें त्याचींही बघ त्यांसह धूलिकणांत
धूळीनें भरलेल्या भूवरि उभा रहा दिनयाम
उंचीचा हा वेष टाकुनी तूंहि तिथें करि काम
निर्माया ही सृष्टि मानवी सहजचि आनंदानें—
स्वयें वाहुनी असे घेतलें आपणास देवानें
जन्ममृत्युच्या चक्रीं घाली गिरक्या तो प्रत्यक्ष
तुलाच जीवा ! प्राप्त होय मग कसा कोठुनी मोक्ष ?
मळून गेलीं वस्त्रें किंवा फाटुन गेलीं पार
हानि कोणती ? ध्यान—धारणा सोडुनि ये बाहेर
धूप, फुलें हीं दूर सार, जा सत्वरि त्याला भेट
घाम गळे तों कष्ट करी तूं त्यांसह धरुनी नेट

३

हे परमात्मन् जेथें न शिवे भीति मनाला कांहीं
डोकें करुनी वर चालाया शंका वाटत नाहीं
जेथें असती मार्ग मोकळे ज्ञानाच्या प्राप्तीचे
संकोचानें तुकडे तुकडे झाले नच जनतेचे
शुद्ध अशा त्या सत्यावांचुनि शब्द न जेथें वायां
हात पसरितो उद्यम जेथें पूर्णतेस मिळवाया
मृत रुढीच्या भयाण पुलिनीं पावुनियां लोपाला
प्रज्ञेचा तो निर्मल निर्झर लुप्तप्राय न झाला
कृपा—प्रेरणा तुझीच कारण ज्या आचारविचारां
होउनि तद्विस्तार मनाच्या प्रगतिस मिळतो थारा

प्रभो ! अशा त्या स्वतंत्रतेच्या स्वर्भूमाजी ताता !
होवो माझा देश सदाचा जागृत सत्वरि आतां

४

कोपऱ्यांत मी बसुनि एकटा होतों भजन करीत
मद्भजनाचा पडला तेव्हां सूर तुझ्या कानांत
निज सिंहासन सोडुनि तत्क्षणिं खालीं तूं आलास
माझ्या दारीं हळूंच येउनि प्रभो ! प्रकट झालास
हे भगवन् तव मंदिरिं अगणित थोर भक्त जमतात
प्रहर आठही एकसारखे भजन तुझें करितात
परंतु देवा ! भक्ति-पथाचा नवा पाठ मी घेईं
हें वेडें वाकडें कसें तरि गान तुझ्यास्तव गाई
करुण स्वर मम भरतें आणी त्वत्प्रेमा हृदयांत
मिश्र होतसे भजनाच्या या प्रचंड गोंगाटांत
पुष्प अर्पिलें मीं जें, त्यानें तुष्ट मनीं झालास
माझ्या दारीं उभा रहाया खालीं तूं आलास

५

मृत्यु आणखी जीवित दोन्हीं भावंडें हीं ऐशीं
विश्वाच्या या रंगभूमिवर खेळति परस्परांशीं
उल्हासाच्या भरें पावतां वादळासवें वृष्टि
जागी होउनि करूं लागत्ये हास्यहि सजीव सृष्टि
फुलून जातें पृथ्वी हिरव्यागार अशा गवतानें
घडून येती चमत्कार हे एका आनंदानें
अश्रूंनीं अति आर्द्र होउनी गेलें जें उमलून

दुःखरूप त्या रक्तकमलिं जो राहे स्वस्थ बसून
असलें नसलें सर्व जवळचें धूळिंत दे फेकून
अवाक्षरहि जो काढित नाहीं कधींच वदनांतून–
हृदयवल्लभा ! देवा ! माझ्या शेवटच्या गाण्यांत
दिव्य अशा त्या आनंदाचे सर्वहि सूर मिळोत !

६

माझ्या बाळा ! तुला खेळणीं रंगित देतों जेव्हां
रंग ढगावर, पाण्यावर कां ? कळतें मजला तेव्हां
स्वरसंयोगें कसे वीचि–रव गीत, नृत्य करितात
धरा कशी तल्लीन होतसे त्यांच्या श्रवण–सुखांत
त्वां नाचावें ह्मणुनीया मी गाणें गातों जेव्हां
तरु–पर्णी संगीत असे कां ? कळतें मजला तेव्हां
तुझ्या बुभुक्षित हातीं देतों पदार्थ जेव्हां मिष्ट
फुलांत मध कां ? पक्व फलीं रस तेव्हां कळतें स्पष्ट
प्रकाशसंगें मोद नभांतुनि वाहुनि कैसा येतो
झुळुक सोडुनी वायु कसा तो उष्णकालिं सुख देतो
हंसावेंस तूं ह्मणुनि तुझें मी चुंबन जेव्हां घेतों
या सर्वांच्या सद्रूपाचा बोध तदा मज होतो

७

शारदीय तो मेघ निरर्थक भटके आकाशांत
तशीच माझी असे अवस्था देवा ! या लोकांत
स्पर्शे तव नच पाणी झालें घनत्व तें वितळून
तुझ्या प्रकाशें झालों नाहीं समरस मी मिसळून

तुझ्या वियोगें महिने, वर्षें बसलों मी मोजीत
आयुष्याचा काळ राहिलों कसा तरी कंठीत
अखंड वैभवशाली भगवन् माझ्या प्रियतमसूर्या !
ऐकुनि घे या प्रार्थनेस मम सत्वरि तेजोवर्या !
अशीच लीला करूं इच्छिसी देवा ! जरि तूं चित्तीं
जीवित–पट हा असार नश्वर सत्वरि घे निज हातीं
रंग चढवुनी विविध, मुलामा सोन्याचा दे त्यास
वाऱ्यावर तो सोड, पाहशिल विविध चमत्कारांस
आटोपाया खेळ इच्छिशिल रात्रींच्या समयांत
जाइन मी तें पूर्ण वितळुनी दाट अशा तिमिरांत
उषःकालचें हास्य धवल जें समरस होइन त्यांत
किंवा होइन अदृश्य निर्मल सूक्ष्म अशा अनिलांत

# मानसविहार.

[ श्रीरामचरित मानस अर्थात् तुलसी रामायण यावरील विहारिणी टीकेंतील कांहीं प्रसंग. ]

## जानकी प्रथमदर्शन--

कंकण किंकिणी नूपुर यांचा ऐकतां सुस्वर
राम करून विचार काय ह्मणे--
" लक्ष्मणा ! वाटे मजला कामें दुंदुभी वाजविला
विश्व सर्व जिंकायाला मनो-द्वारें "
ऐसें बोलून मधुर दृष्टि फेकी सीतेवर
वदनचंद्रीं चकोर नेत्र त्याचे
स्तब्ध झाले नेत्र दोन्ही पापणीस न भिडे पापणी
निमीनें दिली सोडुनी दृग्वसनें
तिचें सौंदर्य पाहुनी राम तुष्ट झाला मनीं
मनींच करी वाखाणणी लावण्याची
परि झाला जो आनंद बाह्य कराया विशद
कांहीं केल्या तया शब्द सुचेचिना
जणुं सीतेस निर्मून सृष्टिकर्ता चतुरानन
करीतसे प्रदर्शन नैपुण्याचें
शोभागृहाची मूर्त शोभा वाढवीते दीपप्रभा
जानकी दे सौंदर्य-लाभा सौंदर्यातें
कवीच्या उपमा सकळिक झाल्या उच्छिष्ट निःशंक
मग उपमा निष्कलंक काय देऊं ?
तिच्या लावण्याचें वर्णन मनीं करी रघुनंदन

विचारें घेई जाणून स्वस्थितीतें
रामचंद्र शुद्ध चित्त समय जाणूनि उचित
प्रेमें निजानुजाप्रत काय ह्मणे–
" बा लक्ष्मणा जिच्यास्तव धनुर्यज्ञ करी राव
ती जानकी स्वयमेव हीच आहे
दुर्गा–पूजनानिमित्त सखींसह आली येथ
फिरूनिया उद्यानांत प्रभा पाडी
हिचें लावण्य लोकोत्तर मी स्वभावेंचि पवित्र
परि दर्शनें अस्थिर चित्त माझें
याचें खरें जें कारण जाणे एक चतुरानन
माझीं शुभांगें स्फुरण पावती हीं
रघुवंशीय स्वभावगुण लक्ष्मणा ! जाणसी पूर्ण
कदापि कुमार्गीं मन वळेल ना
जेणें स्वप्नाहिभीतरीं ना पाहिली परनारी
त्या मन्मनाचा अंतरीं विश्वास मज
जे शूरवीर रणरंगीं पाठ न दाविती अरिलागीं
दृष्टि न फेकिती वाउगी परस्त्रीवरी
जे आल्या अतिथीप्रति नकार न देती कल्पांतीं
ऐसे नरश्रेष्ठ असती विरळ जगीं "
यापरी लक्ष्मणालागुन राम करी संभाषण
परि गुंतलें तन्मन सीतेपाशीं
भृंग होऊन तें मन तिच्या मुखाब्जामधून
सौंदर्य–मकरंद–पान करीतसे

## जानकी-सभाऽगमन—

योग्य समय जाणून आणाया सीतेलागून
भूप तेव्हां दे धाडून बोलावणें
ऐसें आज्ञापितां जनक चतुर सख्या सकळिक
आणिती आदरपूर्वक जानकीतें
जानकी रूपगुणखनि श्रीजगदंबा भवानी
तिच्या सौंदर्य-वर्णनीं शक्यता कैची ?
विश्वींच्या सर्व उपमा वाटती अधमाधमा
वर्णितां प्राकृत रामा योजिती ज्या
योजूनि त्या उपमांस वर्णूनिया जानकीस
असत्कवीचें अपयश कोण घेई ?
जानकीस वर्णावया उपमाव्या अन्य स्त्रिया
तरी कोठें रमणीया तत्समान
उपमेस ध्यावी पार्वती शिवार्धांगीं तिची वसती
अर्ध तनु उपमेप्रति योग्य नव्हें
उपमेस ध्यावी रति देहहीन तिचा पति
ती दुःखी अनंग-सती योग्य नव्हे
गरल आणि मदिरा यांची प्रिय सहोदरा
उपमेस ती इंदिरा योग्य नव्हे
लावण्य-सुधा-सागर मूळचा असेल जर
माजी कच्छप सुंदर रम्यतेचा
श्रृंगाराचाच मंदर शोभा-रज्जु मनोहर
प्रत्यक्ष मंथी पंचशर स्वकराब्जें

यापरी करितां मंथन सुख–सौंदर्याची खाण
नवीन लक्ष्मी निर्माण होय जेव्हां—
तैं तीच लक्ष्मी साक्षात् तुलनेस ये कदाचित्
हेंहि कवि भीत भीत सांगतसे
मंजु स्वरें गीत गात घेऊनि जानकीप्रत
सुज्ञ सख्या मंडपांत प्राप्त झाल्या

## जनक–विषाद.

पाहूनि भूपां सकल जनक झाला व्याकुल
निराशेनें वदे बोल क्रोधयुक्त—
"मीं जो का लाविला पण त्याचें ऐकून वर्तमान
द्वीपद्वीपींचा भूपगण पातला असे
कपटें होऊन नर येथें आले सुरासुर
अन्यहि रणधीर वीर उपस्थित
मत्कुमारी मनोहर तैसा विजयहि थोर
कीर्ति अतीव सुंदर त्याच परी—
चाप भंगूनि या ठायीं जो मिळवील हें सर्वहि
ऐसा विधीनें एकहि निर्मिला ना
कीं हें कन्यारत्न भलें कुणासहि नसे रुचलें
कुणीहि नाहीं चढविलें शिवचाप हें
चढविणें कीं तोडणें हें राहूंच द्या बोलणें
शक्य न झालें हालविणें जागचेंहि
आतां अतःपर कोणीं 'वीर' न घ्यावें ह्मणवोनी

निर्वीर झाली मेदिनी जाणिलें मीं
यास्तव भूपहो ! संप्रती आशा सोडून पुरती
आपाआपल्या गृहांप्रती गमन करा
जानकीच्याच दैवांत विवाह-सुख व्हावें प्राप्त
न गमें लिहिलें खचित विधात्यानें
जरी मी सोडूं पणास तरी होईल पुण्य-नाश
कन्या राहो ! कुमारी; त्यास काय करूं
कळतें 'निर्वीर मेदिनी' तरी मी पण लावोनी
घेतला नसता करोनी उपहास हा
जनकाचें निराश वचन ऐकतां सर्वेहि जन
दुःखाकुल झाले, पाहुन जानकीतें

---

**लक्ष्मण-प्रकोप—**

जनक-वाक्यें शेवटीं लक्ष्मणाची चढे भृकुटी
क्रोधें आरक्त होय दृष्टि स्फुरती ओष्ठ
भूपाचें सहजवचन[1] झोंबलें जैसे तीक्ष्ण बाण
परि रामभयें लक्ष्मण बोलूं न शके
शेवटीं सोडून मौन राम-पदाब्ज वंदून
बोलता झाला वचन समयोचित
" एकादा रघुवंशांतुनी असतां ज्या सभास्थानी
तेथें अनुचित वाणी न वदे कुणी
रघुकुल-मुकुटमणी येथें प्रत्यक्ष असुनी
कां ही अयोग्य वाणी बोलला नृप ?

---

१. 'निर्वीरमुर्वीतल.'

हे रवि–कुलकमलार्क ?
मुळीं अभिमानपूर्वक
तुमचें अनुशासन
तरी ब्रह्मांड उचलीन
आणि कांच–घटासमान
पद्मनालासम तोडीन
युष्मत्प्रतापापुढती
पाहूं जातां जीर्ण अति
प्रभूंनीं हें ओळखून
दावीन कौतुक करून
कमल–नालासमान
त्यास घेऊन पळेन
तुमचेंचि प्रताप–बळ
तद्दंडकापरी तत्काळ
प्रभुपदाचीच शपथ
पुन्हां धनुष्य हातांत
ऐसें लक्ष्मण क्रोधयुक्त
कंप सुटे दिग्गजांप्रत
घाबरले राजे लोक
मात्र वाटला हरिख
रामासह विश्वामित्र
रोमांचित वारंवार

मी बोलतों स्वाभाविक
नाहीं नाहीं
असेल मजलागून
कंदुकापरी
टाकीन मी विदारून
मेरुप्रति
पिनाकाची कथा किती ?
बापुडें तें
मज द्यावें अनुशासन
तेंहि पहा
शिवचाप हें चढवीन
शत योजनें
जेविं का छत्रकफूल
तोडीन हें
हें न घडतां निश्चित
न धरीन मी"
बोलतां समयोचित
धरा ढळे
मनीं ओशाळला जनक
जानकीतें
तेवि सर्वेहि मुनीश्वर
हर्षभरें

## धनुर्भंग.

जाणूनि उचितावसर अति प्रेमपुरस्सर
तैं बोलती विश्वामित्र राघवातें
"रामा ! सत्वरी उठून शिवचापातें भंगून
जनक–चिंतेचें हरण करीं बापा !"
गुर्वाज्ञा पडतां कानीं तत्पद वंदी चापपाणी
हर्षविषाद तन्मनीं कांहीं न गमे
तैं उठून स्वाभाविक ठाकला रघुनायक
ऐट लाजवी निःशंक सिंहच्छाव्यातें
सिंहासन उदयगिरी श्रीरामरूप त्यावरी
उगवला त्या अवसरीं बालसूर्य
संत–सभा पद्मावलि तेव्हां विकास पावली
तेणें सर्व लोचनालि[1] हृष्ट झाले
देव, मुनि, चक्रवाक जाहले पूर्ण विशोक
करिती होऊन सेवक पुष्पवृष्टि
श्रीराम रघुनंदन प्रेमें गुरु–पद वंदून
घेतसे अनुशासन मुनींद्राचें
तो निखिल जगत्पति चाले कैसा सहजगति
जणुं सुंदर मत्त अति गजश्रेष्ठ
चालतां रघुनंदन सर्व नरनारी–गण
होतसे रोमांचपूर्ण सौख्यभरें
देवपितरां वंदून ह्मणती पुण्यातें स्मरून

1 नेत्ररूपी भृंग.

‘आमुचें सुकृन्महिमान असेल जरी–
तरी देवा ! गणाधिपते ! श्रीराम शिवचापातें
पद्मनालपरी येथें भग्न करो !
सप्रेम पाहतां राघवा जानकी–माता तेधवां
पाचारी सखींस सर्वां स्वसन्निध
होऊनियां प्रेमवश तळमळ वाटे जीवास
ते समयीं स्वसखींस काय म्हणे––
“सख्यांनों ! हें आश्चर्य किती जे हितचिंतक म्हणविती
तेहि कौतुक पाहती स्वस्थपणें
परि कुणीहि जाऊन सांगेना भूपालागून
बरा नव्हे कठिण पण बालक हें
रावण–बाणापरिस स्पर्शले नसती ज्यास
भूपहि करुनि सायास निराशले
तें चाप कुमाराहातीं देऊं पाहतो भूपति
मंदर बालहंसाप्रति उचलवेल का ?
एवंच भूपाल श्रेष्ठ वाटे झाला मतिभ्रष्ट
दैवगति कांहीं स्पष्ट कळूं न शके”
चतुर सखी तत्क्षणीं राज्ञीस वदे मृदु वाणी
“न गणावें असमर्थ कुणीं तेजस्व्यातें
कोठें अपार सागर कोठें अगस्ति ऋषीश्वर
परि शोषूनि जगभर कीर्ति करी
रवि–बिंब कंदुकप्राय परि पावतांचि उदय
त्रिलोकींचा तमोलय करीतसे

विधाता, विष्णु, महेश
असती लघु निःशेष
मदोन्मत्त कुंजरास
ऐसा तो तीक्ष्ण अंकुश
पुष्पाचेच धनुर्बाण
परि तेणें त्रिभुवन
यास्तव राज्ञि ! हें जाणून
रामचि करील भंजन
ऐकून सखी--वचनातें
दाटे प्रेमाचें भरतें
असो, जानकी तेधवां
करी देवतांचा धांवा
अति व्याकुळ होउनी
ह्मणे, " हे शिवभवानि !
मत्सेवेचें सार्थक करा
काठिण्य तें आधीं हरा
हे अभीष्ट वरदायका
तुझी सेवा केली जी का
ती जाणून वारंवार
करी हलका धनुर्भार
पुनः पुन्हां राघवातें
जानकी निजमनातें
तरीहि तैं प्रेमाश्रूंनीं

ज्या मंत्रांनीं होती वश
मंत्रहि ते
आकळूनि करी वश
लघुच असे
कामदेव करी धारण
तदंकित
निश्चिंत असावें आपण
धनुष्याचें"
विश्वास वाटे राज्ञीतें
विषाद जाय
विलोकून श्रीराघवा !
भीत मनें
स्तवीतसे मनींचे मनीं
प्रसन्न व्हा हो !
मद्धित आणूनि अंतरा
धनुष्याचें
प्रभो श्री गणनायका !
आजवरी
प्रार्थना ऐक सत्वर
आधीं आधीं "
पाहूनी स्तवी देवतांतें
धीर देई
येती नेत्र डबडबुनी

तनु सारी रोमांचांनीं कंपाकुल
रूप पाही डोळे भरून स्मरतांच पित्याचा पण
पुन्हां जानकीचें मन कासावीस
" हा ! हा ! ताता आपण पण मांडिला दारुण
निज कल्याण, अकल्याण कळे न कसें ?
सचिवहि दिसती भ्याड सांगती न बुद्धि प्रौढ
पंडित-सभेंत उघड अन्याय हा
वज्राहूनहि कठोर कोठें हें चाप दुर्धर
ही सांवळी सुकुमार मूर्ति कोठे ?
कोणत्या प्रकारें दैवा ! मीं मनीं धीर धरावा
हिऱ्याचा वेध व्हावा शिरीषें कसा ?
सभेची गुंगली मति बा ! शिवचापा मजप्रति
आतां तूंच एक गति निर्वाणीची
रामातें पाहून तरी जडता टाकी सभेवरी
सूक्ष्म हो या अवसरीं तूंच बापा ! "
सीतेच्या हृदयांतरीं दुःख दाटलेसें भारी
जाई शतयुगापरी निमिष एक
एकदां पाही रघुवीरा पुन्हां अवलोकी धरा
तेणें तच्चंचल नेत्रां शोभा चढे
जणूं जानकीचे नयन मदनाचे मत्स्य दोन
चंद्रमंडळीं बसून झोंके घेती
तिची वाणी-भ्रमरिणी दडली कमलवदनीं
लज्जानिशेतें पाहुनी प्रकट न होय

कृपणाची ठेव जैशी
दडे तदश्रु–माला तैशी
अति व्याकुलता जाणुनी
पुन्हां धैर्य धरोनि मानी
कायावाचामनेंकरून
राम–पदाब्जीं माझें मन
तरी सर्वांतरनिवासी
करो राघवाची दासी
ज्याचें प्रेम जयावर
त्या तेंचि लाभे, निर्धार
प्रभुमूर्तीतें पाहुनी
ती कृपानिधि चापपाणी
न्याहाळूनि जानकीस
ज्यापरी लघु सर्पास
यापरी रघुवंशमणि
तें विलोकिलें तत्क्षणीं
गात्रें त्याचीं रोमांचित
दाबूनि ब्रह्मांडाप्रत
"दिग्गज कच्छप वराह!
सांवरा ब्रह्मकटाह
शिवचापाचें भंजन
ऐकूनि मदनुशासन
असो भंगावयाकरितां

गृहीं राहे कोपऱ्यासी
नेत्र–कोनीं
सीता संकोचे स्वमनीं
विश्वास हा–
प्रेम माझें सत्य पूर्ण
लीन जरी——
भगवान् मज जानकीसी
निश्चयानें
जडें निस्सीम दृढतर
नि:संशय"
प्रेम प्रतिज्ञा करी मनीं
सर्व जाणे
राम विलोकी चापास
गरुड बघे
पाहतां चापालागुनी
लक्ष्मणानें
करोनि तो पदाघात
काय ह्मणे——
तुम्ही धैर्यें शेषासह
डळमळूं न द्या
करूं इच्छी रघुनंदन
सिद्ध असा."
राम चापासमीप जातां

नरनारी, सुर सुकृता आठविती
सर्वांच्या मनींचें पूर्ण संशय आणि अज्ञान
मूर्ख राजांचा अभिमान त्याचपरी—
परशुरामाचा गर्व आणि तयाचें महत्त्व
सुरमुनींचें भीरुत्त्व त्याचपरी—
सीतेचा शोक अमूप जनकाचा पश्चात्ताप
दुःख-दावाग्नि-ताप राज्ञीचा तो—
या सर्वांच्या समवेत त्याक्षणीं श्रीरघुनाथ
शिवचापाच्या नौकेंत आरूढला
रामबाहु बलसागर तरावया नौका तत्पर
परि खलाशी चतुर नसे कुणी
एकदां श्रीरघुनाथ पाही सर्व जनांप्रत
तैं ते दिसले तटस्थ चित्रापरी
कृपायतनें त्या कालीं जानकी ती विलोकिली
व्याकुल दिसून आली विशेषेंचि
जानकीची ऐसी दशा इतुकी दिसली सर्वेशा
कीं मानी एकेक निमिषा कल्पतुल्य
जलाविण जो तृषित प्राण जाऊन होतां मृत
सुधा-पल्वल त्याप्रत काय होय!
सुकतां क्षेत्र-समुदाय पर्जन्याचें काम काय?
टळतां योग्य समय अनुताप तसा
हें जाणूनि स्वमनांत पाहतां जानकीप्रत
राम होय रोमांचित तिच्या प्रेमें

| | |
|---|---|
| स्मरुनीं गुरुकारणें | वंदूनिया राघवानें |
| उचलिलें लाघवानें | धनुष्य तें |
| मेघें व्यापितां गगन | विद्युल्लता चमकून |
| ज्यापरी होतसे लीन | तत्क्षणांत |
| उचलितांचि चापाग्रत | चकाकून तें तद्वत् |
| झालें तेधवां त्वरित | मंडलाकृति |
| धनुष्य कैसें घेतलें | कैसें चढविलें, ताणलें |
| हें कुणींहि नाहीं पाहिलें | तटस्थ सर्व |
| श्रीरामें त्याच क्षणीं | भंगितां चापालागुनी |
| भरला तो घोर ध्वनि | ब्रह्मांडांत |
| भीषण रव ऐकतां | अश्व जे का सूर्य–रथा |
| ते सोडून धांवती पथा | सैरावैरां |
| दिग्गज करिती चित्कार | डळमळे चराचर |
| कूर्म, वराह, धरणीधर | कळमळती |
| देव, दैत्य, मुनीश्वर | त्या नादें झाले बधिर |
| सर्वेहि मनीं चिंतातुर | व्याकुल अति |
| चाप भंगिता रघुवीर | तेथील लोक समग्र |
| करिती जयजयकार | राघवाचा |
| चाप–खंड त्या अवसरीं | रामें टाकितां भूवरी |
| ते पाहून सभा सारी | हृष्ट होय |
| कौशिक–रूप तें केवळ | जणुं समुद्रचि निर्मळ |
| ज्यामाजी प्रेमाचें जळ | अगाध शोभे |
| रामाविषयीं तच्चित्तीं | प्रेम जें त्या जलाप्रति |

रोमांचें येतसे भरती  अधिकाधिक
सखींसहवर्तमान  राणी आनंदली पूर्ण
जणुं पर्जन्य—वर्षन  शुष्क क्षेत्रीं
पोहतां पोहतां थकला  जणुं त्या आश्रय लाधला
तैसा जनक आनंदाला  चिंतामुक्त
महादीपाचा प्रकाश  दिवसा पावतो नाश
भूप निस्तेज अशेष  चाप—भंगें
जणुं तृषार्त चातकी  स्वाती जलें होय सुखी
तैसी सुखावे जानकी  न वर्णवे
ज्यापरी चकोर तान्हें  विलोकी चंद्राकारणें
तैसें पाहिलें लक्ष्मणें  राघवातें

---

## सीतास्वयंवर.

आज्ञापिती शतानंद  जाया राघवासन्निध
निघती झाली सानंद  जानकी ती
चतुर आणि सुंदर  संगें सखींचा परिवार
गात निघाला मधुर  मंगलगीतें
ऐसी ती जनक—सुता  शोभनांगी अपरिमिता
बाल हंसीपरी पथा  क्रमूं लागे
जैसी सौंदर्याभीतरीं  लावण्याची शोभा भारी
तैसी शोभे भूप—कुमरी  सखी जनीं
सीतेच्या हस्तकमलीं  'जयमाला' विराजली

| | |
|---|---|
| जणुं मूर्त शोभा आली | विश्व—विजया |
| संकोच—दिसे शरीरीं | परमोल्हास अंतरीं |
| गूढ प्रेमाची माधुरी | नकळे कुणा |
| समीप जाऊन **सी**ता | बघे **रा**माची सुंदरता |
| स्थिर जणुं चित्रलिखिता | कुमारीच |
| पाहून ती मुग्धा स्थिति | चतुर सखी समजाविती |
| 'जयमाला घाल,' ह्मणती | 'रामकंठीं' |
| हें ऐकतां दोन्ही करीं | जयमाला वरी धरी |
| प्रेमवशें वरचेवरी | स्तब्ध राहे |
| देंठासह पद्में दोन | जयमाला ती घेऊन |
| संकोचें चंद्रालागून | घालिती जणुं |
| ती शोभा अवलोकुनी | सखी गाती मंजु गाणीं |
| माळ घातली तत्क्षणीं | **रा**मकंठीं |
| **श्री**रामचंद्राच्या गळां | पाहूनिया जयमाळा |
| देव करिती त्यावेळां | पुष्पवृष्टि |
| होतां सूर्याचें दर्शन | कोमेजे कुमुदगण |
| तैशीं गेलीं उतरून | भूपवदनें |
| **रा**घवें चाप भंगून | वरिलें **सी**तेलागून |
| यश राहे दुमदुमून | त्रिलोकांत |
| **रा**मचंद्र आणि **सी**ता | शोभती कैसे तत्त्वतां |
| जणुं श्रृंगार, सुंदरता | एकवटलीं |

# नरवानर.

( आर्या )

एके दिनीं प्रभातीं करदर्शनिं विघ्न अशुभसें घुसलें
वृक्षावरिल कपीचें कृष्णवदन त्याक्षणीं मला दिसलें

( दिंडी )

करीं पुस्तक मम हस्त—लिखित होतें
पाहि निरखुनि तो वृद्ध कपि तयातें
नोंद वेच्यांची आठवली मातें
व्यग्र झाले मम चित्त बघुनि त्यातें

( ओवी )

भाकर, फुटाणे देउनि जरि पुस्तक परत मिळवूं तरी
तेहि नव्हते वेळेवरी उपाय कांहीं सुचेना

श्लोक ( व. ति. )

मद्वस्तु अल्पचि परी बहु आवडीची
लाभेल काय मजला कपिच्या करींची
लाभार्थ मी नित जिच्या श्रम फार केले
जाणार ती मजसि ठेवुनिया भुकेले

( ओवी )

त्यांत ग्रंथ प्रामाण्याचीं तशीं विचार स्वातंत्र्याचीं
विशेषें दान—पद्धतीचीं वचनें श्रेष्ठांचीं गोविलीं

श्लोक ( शा. वि. )

अन्यांचीं बहु आर्जवें करुनिया जीं पुस्तकें आणिलीं
त्यांच्यांतूनि कशीं अमोल वचनें वेंचूनि मीं घेतलीं
ऐसा तो इतिहास दृष्टिपुढतीं माझ्या उभा राहिला
देखावा दुसरा पुढील नयनीं प्रत्यक्ष मीं पाहिला

( दिंडी )

वस्तु कपिनें घातली निज मुखांत
बघुनि चिंता वाढली अतोनात
त्यजुनि शय्या जाउनी जवळ वेगें
युक्तिनें त्या मर्कटा वस्तु मागे

श्लोक ( शा. वि. )

दे दे दे ! मज वस्तु दे कपिवरा ! माझी मला घेउं दे !
आहे रे ! उपयोगि ती परत दे ! छेडूं नको नेउं दे !
दे दे दे ! करितों विनंति तुज दे ! वेगें तिला मान दे !
दे दे दे ! गरिबास या झडकरी हें एवढें दान दे !

( आर्या )

केविलवाणें करुनी निज मुख मीं याचना अशी केली
परि त्या वृद्ध कपीच्या कर्णपुटीं वाटतें न ती गेली

श्लोक ( व. ति. )

तें वृद्ध मर्कट असेल खरें बधीर
आला असें समजतां स्वमनांत धीर
उच्च स्वरांत वदलों मग मर्कटाला
मित्रा ! पुढेंहि असुंदे श्रुति—संपुटाला

( दिंडी )

" कपिवरा ! तूं आहेस रामदास
म्हणुनि करितों मी प्रार्थना पदास
दासबोधाचे असति कीं उतारे
कां न देसी मग दीन मागतां रे !

श्लोक ( स्रग्धरा )

आहे मी रामदासी म्हणुनि तरि तुला येउंदे कींव कांहीं
कीं भाऊबंदकी तूं उलट मजसवें साधिसी आज का ही
छे छे ! घेऊं नको तूं लवहि कपिवरा ! यापरी सूड वायां
देतों शाई निराळी जरि निज वदना लागली सारवाया

श्लोक ( व. ति. )

सोडी न वस्तु कपि तो जरि बोललों हें
धार्मीक ना, कपि सुधारक वाटताहे
जाणूनि मी वदत बोल सुधारकाला
दे वस्तु 'आद्य[1] पुरुषा ! निज बालकाला

( आर्या )

'पूर्वज' वदतां कपि तो काढुनि मुखिंचीं करामध्यें घेई
मज भास पूर्ण झाला 'वंशज' म्हणुनी मलाच ती देई

श्लोक ( कामदा )

घेउनी करी दृष्टि रोधुनी
बारकाइनें पाहि शोधुनी
गुप्त हेर कीं चित्तिं वाटलें
त्यांत तत्क्षणीं पत्र[2] फाटलें

---

१ उत्क्रांतिवादानें माकडापासून मनुष्याची उत्पत्ति. २ पान.

श्लोक ( शा. वि, )

ऐसें पाहुनि दुष्ट कृत्य कपिचें रोषोनि त्याच्यावरी
बोले मी, ' न करी ! कराप्रति पुढें हेरा ! त्वरें सांवरीं
वेड्या ! शोध तसा तुला वद मला कांहीं जरी लागला
राजद्रोह घडेल कोठुनि खुळ्या ! राजा जरी चांगला ?

( दिंडी )

उत्तराच्या करि पथ–प्रतिक्षेसी
पात्र झालों मी त्वरित सुशिक्षेसी
पत्रें[1] एकामागून एका फाटे
काव्य–सरिता क्रोधानलेंचि आटे

श्लोक ( शा. वि. )

नोहे धार्मिक तो, सुधारक न तो, ना गुप्तसा हेर तो
सामान्यापरि एक मूर्ख कपि तो, लोकां करी जेर तो
वृक्षासन्निध गेहिंच्याच उघड्या वातायनीं[2] येउनी
गेला तो पळुनी हळू निजकरें मद्वस्तु ती घेउनी

( साकी )

संतापानें हात उगारुनि त्यातें भय दाखवितां
पुस्तक घेउनि अन्य तरुवरी झाला देह लपवितां
कपि तो अभिमानें पत्र फाडितो नेमानें

श्लोक ( शिखरिणी )

तदा माझा गेला त्वरित खचुनी धीर सगळा
त्वरें दु:खें आला सहज मम तैं दाटुनि गळा

---

१ पान. २ खिडकींत.

स्वयें दोषी आहे ह्मणुनि वदलों, ' काय रडुनी
वृथा गेला होता प्रथम तव का मेंदु सडुनी ?'

आर्या.

त्या ऐवजि का नेला नाहीं त्वां 'विश्वबंधु'[1]चा अंक
'घाण पुराणामधली'[2] योग्य; तुला काय बोध--पर्यंक
माझा सारा गेला तव नादें मर्कटा वृथा यत्न
तुज लाभ काय झाला ? ह्मणीपरी लाधलें तुला रत्न

श्लोक (व. ति.)

डोकावुनी कपि पुन्हां मजसीच पाही
वाटे तयास धरुं तोडुनि पादपांही[3]
पाषाण फेंकुनि तयावरि मारितांना
शाखांवरूनि कपि मारितसे उड्यांना

श्लोक (पृथ्वी)

मतिभ्रम. कपि तो उडे फिरुनि वृक्ष--शाखीं दडे
मदीय वदनाकडे हळुंच पाहुनी ओरडे
तशांत कृति तीं घडे, गळुनि पत्र[4] खालीं पडे
न युक्ति लव सांपडे, जरि पडे असें सांकडें

श्लोक (चामर)

मूर्ख तो कपी पळे समोरुनीच जेधवां
एक पत्र त्यांतुनी पडे गळूनि तेधवां
होइ आतुर प्रसन्न तत्क्षणींच धांवलों
घेउनी तयास पाहतांच मी बुझावलों

---

१ सत्यशोधकी पत्र. २ पुराणांतील घाण-लेख. ३ झाडासच. ४ पान.

आर्या.

होतें मला मिळालें पत्र[1] जसें वृद्ध चांगदेवाचें
त्याचें कारण मित्रा ! सविस्तर असेंचि सांगुं दे वाचें

दिंडी.

निसर्गानें उत्क्रांत वडिल आहे
म्हणुनि आशीर्वचनास योग्य नोहे
परी पूर्वज कपि असे मानवातें
ह्मणुनि लिहिला ना नमस्कार मातें

साकी

निराश होउनि वदलों कपिसी 'कृष्ण—वदन' करि आतां
'पहिलेंचि असें तसें वदन मम,' यापरि जातां जातां
मजसी कपिच ह्मणे 'त्वांचि कृष्णमुख करणें'

श्लोक ( व. ति. )

रामावतारिं जंव जाहलि दग्ध लंका
तैं लाविलें स्ववदनीं कपिनें कलंका
माझा मनोरथहि दग्ध समूळ झाला
नैराश्य—धूम्र करि कृष्ण तदा मुखाला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0014070

१ कोरेंच पान.

# विहंग-माला

येथील **शारदाश्रमानें** केवळ लोकाश्रयावर चालवलेली व निवडक साहित्यविषयक लेख व कविता प्रसिद्ध करणारी माला. वा. व. १॥। ( ट. ख. सह )

**व्य. शारदाश्रम**
होळी मु. पो. नांदेड, ( निजामस्टेट )

# सम्पूर्ण-भूषण
अथवा
# सुप्रसिद्ध भूषण कवीचें समग्र काव्य.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांच्या दरबारीं असलेल्या बाणेदार व हिंदुधर्माभिमानी कवि-भूषणाची कविता सरळ भाषांतरासह महाराष्ट्रासमोर 'संपूर्ण-भूषण' या नांवानें प्रथमच येत आहे. ग्रंथ काव्य आणि इतिहास दोन्हीं दृष्टींनीं महत्त्वाचा असल्यामुळें सुप्रसिद्ध अलंकारशास्त्रज्ञ श्री. **खुपेकरशास्त्री** यांची **अलंकार-प्रस्तावना** आणि **भारत** इतिहास-संशोधक-मंडळाचा **इतिहास-परिचय** जोडला आहे. त्यामुळें ग्रंथाची उपयुक्तता अधिकच वाढली आहे. आरंभीं कवीचें **जीवन-चरित्रहि** दिलें आहे. भाषांतरासंबंधीं कै. **शिवराम महादेव परांजपे**, श्री. **गोविंद सखाराम सरदेसाई** रियासतकार, श्री. **तिवारी** ( जळगांव ) श्री. **त्रिपाठी** ( प्रयाग ) आदि विद्वानांचे व **नवाकाळ**, **चित्रमय जगत्**, **निजाम-विजय** आदि नियतकालिकांचे उत्तम अभिप्राय आहेत. श्रीशिवाजीमहाराजांच्या पराक्रमाचें वीररसात्मक व अलंकारबद्ध वर्णन कवि भूषणावांचून दुसऱ्या कोणींहि केलेलें नाहीं. प्रत्येक हिंदुधर्माभिमान्यानें कवि भूषणाची कविता एकवार तरी अवश्य पाहावी.

**सुमारें २४० पृष्ठांच्या पुस्तकाची किंमत अवघी १॥ रु.**

अनुवादक व प्रकाशक—**रामचंद्र गोविंद काटे.**
इतिहास-मंडळ, पुणें.
किंवा **मु. पो. सेलु,**
जि. परभणी, ( निजामस्टेट )